५. डॉ. अर्चना सिन्हा, समाजविज्ञान शोध पत्रिका २०११-१२.



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule



# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण


मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे


अथर्व

अथर्व पब्लिकेशन्स

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8
Book No. : 603

प्रकाशक
युवराज भटू माळी
अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाईट : www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती : २० ऑक्टोबर २०१८
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स
मूल्य : ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*



डॉ. सुभाष भामरे
Dr. SUBHASH BHAMRE

Gr

NijampurJaitaneS
"Adarsh college o
seminar on Ge
Empowerment"
It is the first
considering curren
such subjects are v
I wish every succ
good suggestions.
Thanking Y

114A, South Block, New Delhi - 110011
Tel. : 011-23792126, 23794621 Fax : 011-23016255

वर्ण व्यवस्थेला छेद देणारी भुलाबबाई .................. २६५
– प्रा.डॉ. माधव कौतिक कदम
स्त्री सबलीकरण .................. २६९
– प्रा.डॉ. रवींद्र पोपटराव ठाकरे
फासेपारधी समाजातील महिलांची स्थिती .................. २७३
– प्रा. राजेंद्र बैसाणे
ग्रामीण विकासात महिलांच्या सबलीकरणात .................. २७७
शासनाची भुमिका
– प्रा. राठोड मदनसिंग सुपडू
अनुराधा पाटील यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणीव ........ २८१
– प्रा. संभाजी बाबाराव सावंत
शहरी आणि ग्रामिण महिलांतील सुधारणा .................. २८५
– प्रा.जी.जे. पावरा
स्त्री, शिक्षण आणि मानवी हक्क .................. २८८
– प्रा. मंगेश भावराव पाटील
स्त्री–पुरुष विषयक असमानतेची भुमिका .................. २९३
– प्रा.डॉ. मधुकर आत्माराम देसले
शिवरायांचा स्त्रीविषयक सुरक्षितता व स्त्री–पुरुष समानता ... २९९
– प्रा. पाटील रोहिदास चैत्राम
स्त्री भ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या .................. ३०३
– प्रा.डॉ. राजधर चैत्राम बेडसे
प्रसार माध्यमातील स्त्री (पुरुष) .................. ३०८
– प्रा.आर.एस. पाटील
भारतीय स्त्रीचे समाजातील स्थान .................. ३१२
– प्रा.डॉ. सतीश मस्के
स्त्री सुरक्षा : एक आव्हान .................. ३१८
– प्रा. प्रवीण बाबूराव मोरे
स्त्री–पुरुष समानतेचा गोफ : काळाची गरज .................. ३२३
– श्रीराम दाऊतखान



PRINCIPAL
I.G.S.'s Smt. U. Patil Arts &
Science College
Dist. Dhule

कविता विशिष्ट भाषाशैलीसह जन्माला घातली आहे. स्त्री जीवनातील वेगळेपणानी त्यांच्या कवितेचा मोठा भाग व्यापला आहे. त्यांच्या कवितेविषयी डॉ. प्रभा गणोरकर म्हणतात, अनुराधा पाटील यांच्या प्रतिभा धर्मातच एक मनस्वी भावउत्कटता आणि आर्तता आहे. वास्तवाचे भान बुद्धगम्य वा तर्कनिष्ठ आहे. तसेच डॉ. भालचंद्र नेमाडे दुःखकेंद्री काव्यिक जाणीवेची परात्मतेत सापडणारी विषण्णता हे अनुराधा पाटील यांच्या कवितेचे प्रमुख आशयसूत्र आहे.. अनुराधा पाटील यांची कविताही स्वत:च स्वत:शी संवाद साधत असते.

**संदर्भसूची**


१. पाटील, अनुराधा, दिवसेंदिवस, कुषा प्रकाशन, औरंगाबाद
२. जाधव, रा.ग., कवितारती
३. मराठी वाङमयाचा इतिहास खंड सातवा १९५० ते २०००
४. दादा गोरे, अनुराधा पाटील यांची कविता, प्रतिमा प्रकाशन, पुणे



T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule




## शहरी आणि ग्रामिण महिलांतील सुधारणा


– प्रा.जी.जे. पावरा
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ.बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे


**प्रास्ताविक**

भारतीय समाज मुख्यतः पुरुष प्रधान राहिला आहे अर्थात केरळ मधील नायर, मंगळूर मधील शेट्टी, बंगाली समाज व काही भटक्या जमातीचे स्त्री प्रधानतेचे प्रमाण दिसते परंतू सर्वसामान्यपणे विचार करता भारतीय समाजामध्ये स्त्रीयांना दुय्यम स्थान असल्याचे प्रवर्षाने जाणवते त्यातच अनेक रुढी, परंपरा यामुळे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विभक्तीकरण झाल्याचे दिसते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील सहभाग नाकरण्यात आला. या पार्श्वभुमीवर भारतात स्त्रीयांची भूमिका त्याचे शोषण, न्याय अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या भारतातील स्त्री चळवळीचे तीन टप्पे करण्यात आले. पहिला टप्पा म्हणजे (१८३०–१९१५) दुसरा टप्पा (१९१५–१९४७) आणि तिसरा टप्पा (१९४७ पासुन पुढे) हा कालावधी शोध निबंधासाठी वापरण्यात आला आहे.

**१) पहिला टप्पा**

पहिल्या टप्यामध्ये मुख्यत: काही पुरोगामी पुरुषांच्या पुढाकारामुळे महत्वाचे बदल घडतांना दिसतात. या मध्ये सती बंदी(१८२९) विधवा पुर्नविवाह कायदेशीर मान्यता (१८५६) स्त्री भ्रुणहत्या प्रतिबंधक (१८७०) आंतर जातीय विवाहास मान्यता (१८७२) संमती वयामध्ये वाढ (१९८१) याचा समावेश होतो. यामध्ये ईश्वचंद्र विद्यासागर, राजाराम मोहनरॉय, रमाबाई, राजा, धोंडो केशव कर्वे, सुब्बलक्ष्मी, जोतिबा सावित्रीबाई फुले यांचे कार्य महत्वाचे ठरते

**२) दुसरा टप्पा**

दुसऱ्या टप्यामध्ये भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया, ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स या संघटनांचा उदय होतो या संघटीत चळवळीद्वारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार (१९२१) स्त्रीयांना मर्यादीत प्रमाणात मालमत्तेचा हक्क (१९३७) यासारखे महत्वपूर्ण बदल झाले. या स्वातंत्र्यानंतर स्त्री. चळवळीचे पुन्हा तीन टप्पे केले आहेत. १९४७ पासुन ते १९७० दशकापर्यंत राष्ट्रबांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले, अर्थात संविधानात अंतर्भूत मुलभूत हक्क व राज्याची

मार्गर्शक तत्वे या मध्ये स्त्रीयांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. पण या तरतुदीच्या अंमलबजावणीतील अपयशामुळे १९७० च्या दशकात स्त्री चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरु झाला या टप्प्यामध्ये असमान वेतन स्त्रीयांचे अकुशल कामगारात वर्गीकरण विना मोबदला श्रम सामाजिक संस्थामधील सत्तेच्या रचनेतील पुरुषी वर्चस्व या समस्यांवर भर होता.

### ३) तिसरा टप्पा

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील २१ व्या शतकातील टप्यामध्ये स्त्री चळवळ स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रीयांची वैयक्तिक जीवन ठरविण्याची सत्ता व त्याचे सक्षमीकरण यासारख्या मुद्यावर प्रकाश टाकते.

भारतामध्ये स्त्री चळवळीचा एक प्रवाह वरील आढाव्यावरुन स्पष्ट होतो आजही अनेक गंभीर स्त्री समस्या भारतातील समाजासमोर उभ्या आहेत. रुढी परंपराचा पगडा प्रत्येक धर्मातील खाजगी जिवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे, विपरित स्त्री-पुरुष प्रभाव, समान नागरी कायद्याचा अभाव, कौटूंबिक हिंसा, हुंडाबळी, बलात्काराच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रश्न या सारख्या समस्यांना स्त्री समाजाला आजही तोंड द्यावे लागते. या समस्यांचे आवलोकन व त्यातील उपाय यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजामध्ये स्त्री समस्यांना इतरही आयाम आहेत. वेगवेगळ्या वर्गातील जाती-जमातीतील प्रदेशामधील स्त्री समस्यांचे स्वरुप वेगळे आहे. शहरी समस्यांच्या समस्या ग्रामीण व शेत मजूर असणाऱ्या स्त्रियांच्या समस्या, भटक्या व आदिवासी समाजातील स्त्रीयांच्या समस्या वेगवेगळ्या स्वरुपाच्या आहेत., समाजातील स्थितीचा अभ्यास व स्त्रियांच्या समस्येची कारणे व उपाय यावर भर देणे आवश्यक ठरते तेव्हाच स्त्री-सक्षमी करण, सार्वजनिक क्षेत्रातील स्त्री-सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना, स्त्रीयांचा राजकीय प्रतिनिधीत्वामध्ये वाढ होण्यासाठीचे उपाय, समाजाची मानसिकता बदलण्यासाठीचे उपाय या सारख्या बाबींचा अभ्यास आवश्यक ठरतो २१ व्या शतकातील नवीन घटकांचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर मुलगामी परिणाम होत आहे. माहिती तंत्रज्ञान , जागतीकीकरण नवीन शैक्षणिक संधी , नवे तंत्रज्ञान या घटकांचा अभ्यास आवश्यक आहे. तसेच गरीबातल्या गरीब घरातील मुलीही आज शिक्षणासाठी घरापासुन दुर राहून शिक्षण घेण्याचा खटपटीत दिसतात. अल्पवयातील लग्नाचे प्रमाणही तुलनेने कमी झाले आहे. ताठ मानेने जगु पाहणाऱ्या या स्त्रीला आधार देणे आणि शहरी भागातील स्त्री जीवनातील दरी कमी करणे ही आजच्या काळाची गरज आहे.



### सारांश

भारतात स्त्री चळवळीचे तीन टप्यात अभ्यास करतांना असे आढळून आले की, पुरुषाबरोबर स्त्रीयांचेही कार्य बदलात महत्वाचे दिसून आले. महिलाच्या विविध चळवळीतून महत्वाचे बदल झालेले आहे. संविधानात अंतर्भूत मुलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्वे या मध्ये स्त्रीयांना हक्क व अधिकार, न्याय योग्य मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे व स्त्री-पुरुष समानतेबरोबर वैयक्तिक जीवन ठरविण्याची व सक्षमीकरण या सारख्या मुद्यांवर प्रकाश टाकण्यात आला तसेच ग्रामीण स्त्री व शहरी स्त्रीतील जीवनातील दरी देखील कमी करणे आवश्यक आहे. सदर सदर शोध निबंधात शहरी आणि ग्रामीण महिलांमधील सुधारणा झाल्याचे दिसुन आले.

### संदर्भसूची

१. ॲड. असिम सरोदे - कौटूंबिक हिंसाचार आणि कायदा
२. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी - श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर (२०१५)
३. डॉ. मारोती तेजमपूरे - आदिवासी विकास- हा पर्याय आहे.
४. डॉ. अश्विनी धोंगडे- बदलाच्या शोधातही ग्रामीण स्त्री

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

2018-19

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण



मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे



अथर्व

T.S.S's. Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

## Gender Equality and Women Empowerment


मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

सहसंपादक

प्रा. कांतीलाल सोनवणे

प्रा. अतिश मेश्राम

डॉ. प्रियंका सुलाखे



अथर्व पब्लिकेशन्स



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

अथर्व पब्लिकेशन्स

लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8

Book No. : 603

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.

संपर्क : ९४०५२०६२३०

**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल : atharvapublications@gmail.com

वेबसाईट : www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २० ऑक्टोबर २०१८

**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*



PRINCIPAL
I.S.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

- साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार.......... ८१
  - प्रा.डॉ. संजय राजधर महाले
- स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण.......... ८४
  - डॉ. संभाजी पाटील
- महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन ........................ ९०
  - प्रा. नाईक पी.एन.
- राष्ट्रीय विकास आणि महिला सक्षमीकरण ..................... ९२
  - प्रा. सुरेश रमण देसले
- भारतातील आर्थिक नियोजन आणि स्त्री सक्षमीकरण ........ ९७
  - प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- जात, लिंगभाव आणि हिंसाचार ................................ १०२
  - प्रा. गजेंद्र सोमा जगदेव
- श्रीमती इंदिरा गांधी ........................................... १०७
  : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान
  - प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण .......... ११३
  - प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
- गीता साने यांच्या 'हिरवळीखाली' ........................... ११६
  या कादंबरीमधील स्त्री चित्रण
  - प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
- निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन............................ १२१
  - प्रा. अरुण डी. मोरे
- 'कुलवधु'चे कथानक व सामाजिक स्थिती ..................... १२५
  - प्रा. निलेश एकनाथ पाटील
- महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार ................. १३३
  - प्रा.डॉ. राजू परभत निकम
- महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग ..... १४०
  - प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
  - प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे




T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V. U. Patil Arts &
Late Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist-Dhule

## श्रीमती इंदिरा गांधी : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान

– प्रा. शरद बाबुराव सोनवणे
राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे

### प्रस्तावना

भारताच्या राजकीय इतिहासात ज्या ज्या महान व्यक्तींनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे नाव अग्रस्थानी आहे. आजही भारतीय राजकारण इंदिरा गांधी यांचे नाव घेतल्याशिवाय पुढे सरकतच नाही. मुळात इंदिरा गांधी यांना राजकारणाचे बाळकडू स्वातंत्र्यपूर्व काळात त्याच्या कुटुंबातच मिळाले होते. स्वातंत्र्यानंतर एक प्रभावशाली महिला पंतप्रधान म्हणून भारतीय राजकारणात त्यांनी आपल्या नेतृत्वाची अमिट अशी छाप सोडली. तत्पूर्वी फेब्रुवारी १९५५ मध्ये त्या कॉंग्रेस कार्य समितीत दाखल झाल्या, त्याच वर्षी सप्टेंबर मध्ये त्यांना कॉंग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानंतर १९५८ मध्ये त्या कॉंग्रेसच्या संसदीय बोर्डाच्या सदस्य म्हणून निवडल्या गेल्या तर १९५९ मध्ये त्यांची कॉंग्रेस अध्यक्षपदी निवड झाली. पुढे १९६६ साली देशाच्या पंतप्रधान झाल्यावर भारताच्या व जागतिक राजकारणात इंदिरा गांधींनी स्वतःचा प्रभाव निर्माण केला. म्हणून भारताच्या या प्रभावाशाली महिला पंतप्रधानाच्या कार्यकर्तृत्वाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोधनिबंधात केला आहे.

### श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पंडित जवाहरलाल नेहरु हे भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून विराजमान झाले ते त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९६४ पर्यंत पदारुढ होते. नेहरुंच्या निधनानंतर लाल बहादूर शास्त्री हे भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. इंदिरा गांधींनी आपल्या मंत्रिमंडळात परराष्ट्र व्यवहार मंत्रालय सांभाळावे अशी शास्त्रींची इच्छा होती. परंतू इंदिरा गांधींनी 'माहिती व नभोवानी मंत्री' म्हणून शपथ घेतली. १९६५ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध सुरु झाले आणि युद्धसमाप्तीनंतर सो. रशियाच्या मध्यस्थिने भारत – पाक यांच्यात ताश्कंद येथे शांतता करार झाला व याच दिवशी काही तासातच शास्त्रीजींचे हृदयविकाराने निधन झाले. '१० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे लाल बहादूर शास्त्री यांच्या आकस्मित निधनाने देशापुढे पुन्हा एकदा अनिश्चितता व संकट निर्माण झाले. गुलजारीलाल नंदा यांना पुन्हा दोन आठवड्यासाठी कार्यवाहक पंतप्रधान



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

बनविण्यात आले. पंतप्रधानपदाच्या निवडीमध्ये कांग्रेस अध्यक्ष कामराज यांनी यावेळी प्रमुख भूमिका बजावून पंतप्रधान पदासाठी इंदिरा गांधी यांची बाजू घेतली. मोरारजी देसाई यांनी निवडणूके लढवली. इंदिरा गांधी यांना ३५५ तर मोरारजी देसाई यांना १८९ मते पडली. २४ जानेवारी १९६६ रोजी इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली.'१ पुढे सतत तीनवेळेस म्हणजे १९६६ ते १९७७ पर्यंत त्याच पंतप्रधान राहिल्या. पुन्हा चौथ्यांदा १९८० ते १९८४ या कालावधीत म्हणजे त्यांची हत्या होईपर्यंत इंदिरा गांधी पंतप्रधानपदी आरुढ होत्या.

### इंदिरा गांधींच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या टप्प्यातील कामगिरी

१९६६ मध्ये पहिल्यांदाच पंतप्रधानपदी विराजमान झाल्यावर इंदिरा गांधी यांनी पंडित नेहरुंप्रमाणेच समाजवादी धोरणे राबवण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या धोरणांना आडकाठी ठरणारे उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडून जुलै १९६९ मध्ये अर्थमंत्रालय काढून स्वत:कडे घेतले आणि "लेखणीच्या एका झटक्यानिशी देशातल्या १४ प्रमुख बँकांचे इंदिरा गांधींनी राष्ट्रीयीकरण केले. टाटांच्या अधिपत्याखाली चालणारी सेंट्रल बँक यापैकी सर्वात मोठी त्यात सुमारे चारशे कोटी रुपयाच्या ठेवी होत्या. तुलनेने सर्वात लहान बँक म्हणजे बँके ऑफ महाराष्ट्र प्रा.व्ही.जी.काळे आणि डी.के.साठेंनी १९३५ साली पुण्यात सुरु केलेल्या या बँकेत जवळपास ७० कोटींच्या ठेवी होत्या. याखेरीज बिर्ला समुहाकडे त्या काळी युनायटेड कमर्शिअल बँकेची सुत्रे होती. या सर्वांनाच राष्ट्रीयीकरणाच्या धडक निर्णयाचा थेट फटका बसला. देशातल्या २० अग्रगण्य बँकाच्या तत्कालिन आर्थिक सर्वेक्षणानुसार जे १८८ संचालक या बँका चालवायचे ते देशातल्या अन्य १४५२ कंपन्यांचेही संचालक होते. प्रचंड प्रमाणात खाजगी नफा आणि अधिकार मिळवण्यासाठी या बँकाचा बराच निधी या सर्वांनी बिनदिक्षतपणे वापरला. या बँकाची दारे आता विशिष्ट वर्गाऐवजी जनसामान्यांसाठी खुली झाली. ग्रामिण विकासाला उत्तेजन देणे, शेतीचे आधुनिकीकरण घडवणे, ट्रॅक्टर्स खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना, टॅक्सी खरेदी करण्यासाठी टॅक्सी चालकाना कर्जपुरवठा उपलब्ध करुण देणे हा या बँकाचा नवा प्राधान्यक्रम ठरला."२ याचप्रमाणे इंदिरा गांधींनी तनखेबंदीचा देखिल निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये इंदिरा गांधींची लोकप्रियता खुप वाढली.

इंदिरा गांधींचा देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखिल याकाळात प्रभाव वाढत होता. "१९७१ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात यश मिळाले तेव्हा इंदिरा गांधी या दुर्गामातेचा अवतार आहेत; असे अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते."३ यानंतर "१८ मे १९७४ रोजी राजस्थानातील पोखरण इथे भारतीय



अणुशास्त्रज्ञांनी पहिली अणुचाचणी यशस्वी करुन भारताची अण्वस्त्रक्षमता सिद्ध केली. या काळात देशात राजकीय व सामाजिक आंदोलनामुळे तापलेल्या वातावरणाला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या अणुचाचणीच्या धाडसी निर्णयामुळे एकदम कलाटणी मिळाली. १९७१ च्या बांग्लादेश मुक्तियुद्धातील विजयामुळे इंदिरा गांधी यांची कणखर व खंबीर अशी जी प्रतिमा तयार झाली होती. ती या निर्णयामुळे अधिक उंचावली."४ इंदिरा गांधींनी एकापाठोपाठ एक असे जे धाडसी व धडाडीचे निर्णय घेतले त्यामुळे त्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एक खंबीर नेतृत्व म्हणून प्रतिमा तयार झाली. या सोबतच इंदिरा गांधींच्या विरोधकांची संख्यादेखील वाढत होती.

### इंदिरा गांधी यांच्या अडचणीचा काळ : पराभव व पुर्नरागमन

२५ जुन १९७५ रोजी इंदिरा गांधींनी ३५२ व्या कलमानुसार देशात घोषित केलेल्या आणिबाणीचा निर्णय वादग्रस्त ठरला. १८ जानेवारी १९७७ रोजी आणिबाणी उठवून निवडणूकांना सामोरे जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. १९७७ सालच्या निवडणूकीत इंदिरा गांधींचा दारुन पराभव झाला. लोकसभेच्या ८४ जागा असणाऱ्या उत्तरप्रदेशात कॉंग्रेसला एकाही ठिकाणी विजय मिळवता आला नाही. रायबरेली आणि अमेठी मध्ये इंदिरा गांधी व संजय गांधी दोघेही पराभूत झाले. या सोबतच तत्कालीन कॉंग्रेस अध्यक्ष के. ब्रम्हानंद रेड्डी यांनी १ जानेवारी १९७८ रोजी इंदिरा गांधींची पक्षातून हकालपट्टी केली. या कारवाईस त्यावेळचे जेष्ठ नेते यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, देवकांत बारुआ, सरदार स्वर्णसिंग इत्यादींचा पाठिंबा होता. लगेचच २ जानेवारी १९७८ रोजी इंदिरा गांधींनी 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस (आय)' या नव्या पक्षाची स्थापना केली. तसेच कॉंग्रेस (आय) पक्षाचे मुख्यालय २४ अकबर रोडवरच्या आंध्रप्रदेशचे जी वेंकटस्वामी यांच्या वास्तुत थाटण्यात आले. १९७७ साली कॉंग्रेसचा पराभव करुन मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेवर आलेले जनता पक्षाचे सरकार अनेक विसंगती व अंतर्कलहामुळे अपेक्षेपेक्षा लवकर कोसळले. जानेवारी १९८० मध्ये झालेल्या सातव्या लोकसभेच्या आणि निवडणूकीत कॉंग्रेस (आय) पक्ष ३५३ जागांवर विजय मिळवत पुन्हा सत्तेवर आला आणि श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा चौथ्यांदा भारताच्या पंतप्रधान पदी विराजमान झाल्या.

### ऑपरेशन ब्लू स्टार – इंदिरा गांधींचा धाडसी निर्णय

१९८० साली इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधानपदी आरुढ झाल्यावर एप्रिल १९८० मध्ये झालेली पंजाब विधानसभेची निवडणूक देखिल कॉंग्रेसने जिंकली. त्यानंतर अल्पावधीतच जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांच्या नेतृत्वाखाली पंजाबमधील स्वतंत्र खलिस्तानच्या चळवळीने उग्र रुप धारण केलेलं होतं. पंजाबमधील



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
S.V.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri. Dist.Dhule

वाढत्या हिंसाचारामुळे साऱ्या देशात चिंतेच वातावरण निर्माण झाल होत. अमृतसरमधील शिखांच पवित्र स्थान असलेल्या सुवर्णमंदिरात भिंद्रनवाले आणि अन्य खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी आश्रय घेतल्याने त्यांनी हुसकावून लावून दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी इंदिरा गांधीच्या केंद्र सरकारने लष्करी कारवाईचा धाडसी निर्णय घेतला व ५ जुन १९८४ रोजी 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही मोहिम राबविली. या कारवाईत भिंद्रनवाले यांच्यासह ४९२ दहशतवादी मारले गेले.'५. या कारवाईच्यावेळी पंतप्रधान असलेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांची त्यांचे शरीररक्षक सतवंत सिंग आणि बेअंत सिंग यांनी ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी हत्या केली. या कारवाईचा आदेश देऊन सुवर्ण मंदिरात सैन्य घुसवल्याबद्दल सुड घेण्यासाठी त्यांची हत्या करण्यात आली.६ अशा प्रकारे एका धगधगत्या असिम धैर्य व साहस बाळगणाऱ्या, निर्णय चतुर प्रभावशाली महिला पंतप्रधानाचा शेवट झाला. परंतू त्यानंतर त्याचे दुसरे चिरंजीव राजीव गांधी यांच्या नेतृत्वात डिसेंबर १९८४ साली झालेल्या आठव्या लोकसभेच्या निवडणूकीत लोकांनी इंदिरा गांधी यांच्याबद्दल असलेल्या सहानुभूतीपोटी राजीव गांधींच्या कॉंग्रेसला, मतदान झालेल्या ५१४ पैकी ४०४ जागांवर विजयी करुन विक्रमी बहुमत दिले. १९८५ साली उर्वरित २७ जागांसाठी मतदान झाले त्यातही १० जागांवर कॉंग्रेस पक्ष विजयी झाला.

**पंतप्रधान इंदिरा गांधी – स्त्रीवादी दृष्टीकोन**

इंदिरा गांधी ह्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्यावर बऱ्याच वर्षानंतर कोणीतरी इंदिराजींना विचारले, पंतप्रधानपदी महिला असणे ही उपयुक्त गोष्ट आहे की अडथळा? त्यावर त्या म्हणाल्या, 'मी एक स्त्री आहे, म्हणून कोणताही फरक पडला असे मला अजिबात वाटत नाही. विनाकारण स्त्री-पुरुषांना दोन स्वतंत्र क्षमतेच्या चौकटीत बंदिस्त करणारा असा हा प्रश्न. सारी क्षमता अन गुणवत्ता केवळ पुरुषांकडेच असते, अन स्त्रीकडे नसते, काही कामे पुरुषच करु शकतात, असे मत तुम्ही कोणत्या गृहितकाच्या आधारे बनवले? अशी कोणती विशेष क्षमता अथवा गुणवत्ता असते, जी स्त्रीकडे नाही? केवळ शारीरीक शक्ती? कमतरता आणि मर्यादा तुम्ही शोधत असाल तर स्त्री आणि पुरुष अशा दोघांमध्येही त्या तुम्हाला आढळतील. देशाचे पंतप्रधानपद स्वीकारणाऱ्या व्यक्तीने आपण स्त्री आहोत की पुरुष, आपण कोणत्या जाती धर्माचे याचा विचार सुद्धा मनात आणण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. लोकांनी तुम्हाला स्वीकारले, देशाचे नेतृत्व विश्वासाने तुमच्या हाती सोपवले, हेच सर्वात महत्त्वाचे.'७

ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (बीसीसी) ने १९९९ साली केलेल्या जागतिक सर्वेक्षणाच्या मतदानात एक हजार वर्षाच्या कालखंडातील सर्वश्रेष्ठ महिला म्हणून लोकांनी इंदिरा गांधींची निवड केली. इंदिरा गांधींच्या गौरवपर उद्गार काढताना बीबीसीने म्हटले, 'महिलांच्या हक्कांचा खऱ्या अर्थाने पुरस्कार करणाऱ्या इंदिरा गांधी स्त्रियांच्या समान हक्कांविषयी सतत जागरूक होत्या. भारत अत्यंत कठीण अवस्थेतून मार्गक्रमण करीत असतांना, अतुलनीय धैर्याने, त्या अडचणींना सामोरे गेल्या आणि आयुष्याला सारा कस पणाला लावून त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. नेतृत्वाचे सारे सद्गुण इंदिरा गांधींमध्ये होते. या पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी त्यांनी अविरत लढा दिला.'८ स्त्रियांकडे केवळ सृजनशक्तीच नाही तर निर्णय, नियमन, व्यवस्थापन, प्रशासन व समाजकारण आणि राजकारणाचेही सामर्थ्य स्त्रियांजवळ असते हे श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून दाखवून दिले. ते सर्वांसाठीच स्फूर्तीदायी आहे.

**समारोप**

इंदिरा गांधींचे राजकीय कर्तृत्व प्रचंड धाडसी होते. म्हणून स्त्रिया कोणत्याच क्षेत्रात कमी नाही हे त्यांनी सिद्ध केले. वेळोवेळी अनेक आव्हानांचा धैर्याने मुकाबला करत त्यांची यशस्वी वाटचाल सुरूच होती. कधी म्हणून त्या कोठेही डगमगल्या नाही फालतू तडजोड न करता अदम्य साहसी निर्णय घेत इंदिरा गांधींनी आपल्या सामर्थ्याचे प्रकटीकरण केले. राष्ट्रीय राजकारण असो की, आंतरराष्ट्रीय राजकारण असो. देशहिताचे निर्णय घेण्याची अचाट दूरदृष्टी इंदिरा गांधींकडे होती. बँकांचे राष्ट्रीयकरण, राजेमहाराजांचे तनखेबंद असे समाजहिताचे खंबीर निर्णय त्यांनी कोणत्याही राजकीय नफा तोट्याचा विचार न करता घेतले. बांग्लादेश मुक्तीचा प्रश्न, अणुचाचणी, असे राष्ट्रहिताचे निर्णय त्यांनी आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता घेतले. ऑपरेशन ब्लू स्टार मोहिम राबवताना त्यांनी देशाची एकता व अखंडतेसाठी कणखर भूमिका घेतली. त्याचा सूड घेण्यासाठी त्यांची हत्या झाली. असे धाडसी निर्णय घेतल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबाला धोका निर्माण होऊ शकतो. याची कल्पना इंदिराजींना होती. परंतू त्यांचे नेतृत्व डगमगणारे नव्हते. निर्भयतेने व धैर्याने राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्याचा त्यांचा पिंड होता. म्हणूनच त्यांच्या मरणोत्तर आजही भारतीय राजकारणावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषास माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींचे नेतृत्व हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव निर्माण करणारे ठरले. भारताच्या व जगाच्या इतिहासात त्याला तोड नाही.

अशा प्रकारे स्त्रिया राजकीय क्षेत्रात व जीवनाच्या इतर कोणत्याही क्षेत्रात





T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

पुरुषांपेक्षा कमी नसून काही बाबतीत सरस आहेत हे इंदिरा गांधींनी आपल्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध केले.


संदर्भसूची

१. विश्व प्रकाश गुप्त व मोहिनी गुप्ता, 'भारतीय राजनीति – विकास और विश्लेषण', राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २००९, पृ. ३३१.

२. रशिद किदवई (अनुवाद – सुरेश भटेवरा), '२४ अकबर रोड', चिनार पब्लिशर्स, मुंबई, २०१३, पृ. ६३.

३. पी.एन. धर (अनुवाद – अशोक जैन), 'इंदिरा गांधी आणिबाणी व भारतीय लोकशाही', रोहन प्रकाशन, पुणे, २००६, पृ १४८.

४. सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर (संपा.), 'असा घडला भारत १९४७-२०१२', रोहन प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. ४१८.

५. कित्ता, पृ. ५१०.

६. ले.जन. के.एस. ब्रार (अनुवाद – भगवान दातार), 'ऑपरेशन ब्लू स्टार – जस घडल तस...', रोहन प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. १४८.

७. उपरोक्त, पृ. ६३.

८. कित्ता, पृ. ५०.



T.S.S's Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# प्रसार माध्यम टेलीविजन तथा मध्यम वर्गीय महिलाएँ

– डॉ. ममता नानकचंद पंजाबी
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जिला धुलिया

आज के विश्व के बदलते परिवेश में संचार- माध्यमो, मे जनमाध्यमों की भुमिका मुख्य हो गयी है। हम आज तक कई युगों की यात्रा करते–करते आए है। पहले आखेर–युग, फिर चारागाह एवं कृषि युग, औद्यागिक, वैज्ञानिक युगों के गुजरते हुए हम आज अंतरिक्ष युग में है तथा संचार युग भी इसे कह सकते है। आज प्रत्येक देश, राज्य की संस्कृति भिन्न–भिन्न होकर भी समूह की संस्कृति होकर रह गयी है। लोकवादी संस्कृति वैविध्य और आनंद को एकरस बनाने मे प्रबल भुमिका निभा रही है। इसका प्रभाव केवल संस्कृति एवं भाषा पर ही नही पड रहा है, बल्की विश्व की राजनिती, विश्व का समाज, विश्व की अर्थव्यवस्था एवं अन्य क्षेत्र भी इसमे प्रभावित इसलिए है क्योंकी संचार माध्यम विशेषकर दृश्य–श्रव्य माध्यम इसमें अहं भुमिका निभा रहे है।

प्रसारमाध्यम को हिन्दी मे जनसंचार भी कहा जाता है। घ्जनसंचारडमे डसंचार शब्द की उत्पत्ती संस्कृत के घ्चरड धातू से हुई है, जिसका अर्थ है घ्चलनाड अर्थात जब हम किसी भाव, विचार या जानकारी को दुसरो तक पहुचाते है और यह प्रक्रिया सामुहिक पैमाने पर होती है, वही जनसंचार कहलाती है। संचार के बिना जीवन संपुर्ण नही हो सकता, इसके बिना जीवन अर्थहीन व उद्देश्यहीन हो जाता है। संचार जीवन का आधरभुत सत्य है और यह व्यक्ती के लिए वायू और प्रकाश की तरह अपरिहार्य है। जनसंचार के माध्यम मुख्य रुप से प्रेस, रेडीओ, फिल्म व टेलीविजन है, यह मिश्रीत दृश्य–श्रव्य माध्यम है। यह रेडीओ और फिल्म का मिश्रीत रुप है।

भारत में टेलीविजन का प्रारंभ १५ सितंबर १९५९ में युनेस्को द्वारा चलाई गई एक विशेष परियोजना के अंतर्गत किया गया। उस समय इसका प्रसारण केवल २४ किलो मीटर की परिधी के आस–पास तक ही सिमीत था तब टेलीविजन का उद्देश्य केवल सामाजिक शिक्षा देना था। आज के युग में केवल टेलीविजन का बहूत प्रभाव है अर्थात इसके कई चैनल है, इसका लक्ष्य मनोरंजन, सुचना जानकारी के माध्यम से अधिक से अधिक प्रचार- प्रसार करना है। वर्तमान युग के लोग प्रसार माध्यमों मे से टेलीविजन का प्रयोग सबसे अधिक करने लगे है।



PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri Dist.Dhule

टेलीविजन का महत्व जनसंचार में इसलिए भी अधिक है क्योंकी सुनने के साथ-साथ दृश्य का अवलोकन भी होता है। हमारे देश मे दुरदर्शन का विकास अधिक प्राचीन नही है। टेलीविजन का प्रभाव सभी उम्र के व्यक्तीयों पर देखा जा सकता है। राष्ट्रीय कार्यक्रमों के अंतर्गत पूरे नेटवर्क पर समाचार तथा कार्यक्रम प्रदर्शित किये जाते है। दुरदर्शन पर विभिन्न कार्यक्रम प्रसारित किए जाते है जैसे- कृषि दर्शन, बालकों तथा महिलाओं के लिए कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम, प्रायोजित कार्यक्रम, समाचार तथा सामाजिक घटनाक्रम, यु.जी.सी. के कार्यक्रम खेल तथा अन्य उत्सवों का आँखो देखा हाल, फिल्म, समारोह, तथा प्रतिष्ठित नेताओं के कार्यक्रमों पर रिपोर्ताज आदि। टेलीविजन पर रामायण, महाभारत, शिव पुराण, ओम नम: शिवाय, जय वीर हनुमान आदि कार्यक्रम के साथ साथ अनेक अन्य कार्यक्रम भी अत्यंत सफल हुए है। बच्चों तथा महिलाओं के लिए कार्यक्रम पर्याप्त है। टेलीविजन संवाद का सबसे अधिक शक्तिशाली माध्यम है। तथा इसका भविष्य अत्यंत उज्वल है।

प्रस्तुत शोध निबंध टेलीविजन और मध्यम वर्ष की महिलाओं पर आधारित है। जिसमें जानने की कोशिश की गई है कि मध्यम वर्ग की महिलाएँ किस प्रकार जनसंचार के अत्याधुनिक साधन टेलीविजन से प्रभावित होती है. विभिन्न प्रसार माध्यमों में से अधिकांश महिलाऐं रेडीओ, टेलीविजन, फिल्म, समाचार पत्र की अपेक्षा टेलीविजन को अधिक महत्व देती है। जिसे वे रात्री को २-३ घण्टे के मध्य देखना पसंद करती है। लग-भग सभी महिलाओं के पास रंगीन टेलीविजन है जिसे मनोरंजन के लिए खरीदा गया है। अधिकांश महिलाओं ने केबल कनेक्शन ले रखा है, जिसमे स्टार चैनल को सर्वाधिक देखा जाता है। अनेकविध चैनलों पर जो कार्यक्रम प्रसारित किए जाते है। उनमे विभिन्न प्रकार के कार्यक्रमों में महिलाएँ दिलचस्पी रखती है।

**स्वच्छता, स्वास्थ, सेक्स संबंधी कार्यक्रम**

लगभग सभी महिलाओं का मानना है की टेलीविजन पर स्वच्छता, स्वास्थ, पाककला और सेक्स संबंधी कार्यक्रम आने चाहीए। लेकिन कुछ महिलाओं का मानना था की, सेक्स संबंधी कार्यक्रम नही चाहीए, क्योंकी परिवार में टेलीविजन के कार्यक्रम सभी लोग साथ बैठकर देखते है और बच्चों के इनसे संबंधित प्रश्न पुछे जानेपर माता-पिता निरुउत्तर हो जाते है।

**परिवार नियोजन संबंधी कार्यक्रम**

अधिकांश महिलाओं का मानना था की, परिवार नियोजन के कार्यक्रमों का प्रसारण होना चाहिए, क्योंकी इन कार्यक्रमों के माध्यम से युवा पिढी को परिवार नियोजन के साधनो के बारे में जानकारी मिलती है। यह कार्यक्रम जनसंख्या के



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri,Tal.Sakri

नियंत्रण में भी सहायक हो सकते है तथा अशिक्षीत लोग भी इसके संबंध में जानकारी प्राप्त कर सकते है।

**शैक्षणिक कार्यक्रम**

टेलीविजन पर आने वाले शैक्षणिक कार्यक्रम को अधिकांश महिलाएँ नही देखती है, क्योंकी टेलीविजन पर आनेवाले शैक्षणिक कार्यक्रम नीरस और बोर होते है। अधिकांश महिलाएँ टेलीविजन को मनोरंजन साधन मानती है, इस कारण वे शैक्षणिक कार्यक्रम नही देखती है।

**सूचना संबंधी कार्यक्रम**

अधिकांश महिलाएँ राजनैतिक सुचनाओं में अधिक दिलचस्पी लेती है, लेकीन धार्मिक, तकनिकी व वैचारीक ज्ञान के संबंध के लिए महिलाएँ वार्ता की अपेक्षा समाचारों को अधिक महत्व देती है, इनका यह मानना था की टेलीविजन पर दिखाई जानेवाली सुचनाएँ सत्य होती है।

**धारावाहीक तथा फिल्म**

सभी मध्यम वर्ग की महिलाएँ मनोरंजन के कार्यक्रमों को देखती है, जिसमे अधिकांश महिलाएँ धारावाहिक देखकर अपना मनोरंजन करती है। धारावाहिक की तुलना में फिल्मों को कम प्रतिशत मिला है। खेल को अधिक देखनेवाली महिलाओं का प्रतिशत नगण्य पाया गया है।

**विज्ञापन**

महिलाओं से विज्ञापन के संबंध मे राय जानने पर पाया गया की, अधिकांश महिलाएँ विज्ञापन देखती है, क्योंकी वे टेलीविजन के विज्ञापनो के प्रति आकर्षित होती है। बहुत कम महिलाएँ ऐसी पायी गई जो विज्ञापन को महत्व नही देती है। विज्ञापनों में महिलाओं की भुमिका के संदर्भ में अधिकांश महिलाओं का मानना था कि विज्ञापनों में महिलाओं को नही दिखाया जाना चाहिए।बल्की बहुत कम महिलाओं का मानना था की विज्ञापन में महिलाओं को शामिल किया जाना चाहीए। विज्ञापन में महिलाओं के संबंध मे एक अध्ययन मे बताया गया की टेलीविजन विज्ञापनों मे महिलाओं की शर्मनाक एवं भद्दी तस्वीर प्रस्तूत कर रहा है, यह एक खतरनाक पुंजीवादी धारा है।

**सकारात्मक तथा नकारात्मक प्रभाव**

टेलीविजन ने महिलाओं को सकारात्मक और नकारात्मक दोनों ही रुप मे प्रभावित किया है। अधिकांश महिलाओं का मानना था की टेलीविजन के कार्यक्रमों से विरोध, विद्रोह बढा है, साथ ही अश्लीलता, अपराध, हिंसा में भी वृध्दी हुई है और टेलीविजन ने मद्यपान चोरी को भी थोडा बहूत प्रभावित किया है। अधिकांश महिलाओं ने सकारात्मक दृष्टीकोण रखते हुए माना है की टेलीविजन



PRINCIPAL
Late Dr. V. D. Patil Arts &
Late Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal.Sakri,Dist.Dhule

के कार्यक्रम व्यक्तित्व विकास में सहाय्यक होते है। टेलीविजन के कार्यक्रमों से महिलाओं मे जनजागृती आती है।

टेलीविजन के माध्यम से किशोरावस्था सबसे अधिक प्रभावित होती है और वृध्दावस्था पर टेलीविजन का प्रभाव नगण्य पाया गया। बाल्यावस्था व युवावस्था पर किशोरावस्था की तुलना में प्रभाव कम पाया गया।

टेलीविजन के संबंध में महिलाओं की विभिन्न धारणाएँ दिखाई देती है। अधिकांश महिलाओं ने मनोरंजन के लिए टेलीविजन खरीदा है। वे प्रतिदिन २ से ३ घण्टे टेलीविजन देख लेती है। अधिकांश महिलाएँ टेलीविजन रात्रि को देखना ही अधिक प्रसंद करती है। अधिकांश महिलाओं का मानना था कि परिवार नियोजन के कार्यक्रमों, विज्ञापनों से महिलाओं को इस क्षेत्र में जानकारियाँ प्राप्त होती है। टेलीविजन के संबंध में महिलाओं का मानना था कि व्यक्ती के विचारों में विभिन्नता होने के कारण उनकी पसंद अलग-अलग होती है जो परिवार में चैनलों को लेकर तनावपूर्ण वातावरण उत्पन्न करती है। अधिकांश महिलाओं का मानना था कि दैनिक भाग-दौड , छोटे-मोटे तनावों को दुर करने के लिए वे टेलीविजन का प्रयोग करती है। उसके कार्यकम देखकर नयापन महसूस करती है।

इस प्रकार प्रस्तूत शोध निबंध में निष्कर्षत: कहा जा सकता है कि प्रसार माध्यमों में से मध्यम वर्गीय महिलाएँ टेलीविजन से सबसे अधिक प्रभावित है। रेडीओ का प्रयोग करनेवाली बहूत ही कम महिलाएँ है। जबकी सामान्य रुप से अधिक फिल्में देखती है। और समाचार पत्रों के प्रयोग में महिलाओं की संख्या अधिक है, लेकीन टेलीविजन देखनेवाली महिलाओं से इसका प्रतिशत कम है। अत: कहा जा सकता है कि जनसंचार माध्यमों में टेलीविजन का ही प्रयोग अधिक किया जाता है और समाचार पत्र का स्थान दुसरा है। टेलीविजन पर सभी कार्यक्रम एक साथ देखने को मिल जाते है। जैसे नाटक, हास्य कार्यक्रम सामाजिक, धारावाहिक, समाचार, साहित्यीक कार्यक्रम जो किसी अन्य प्रसार माध्यमों द्वारा संभव नही है।

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science Col.
Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule

# भारतातील
# राजकीय व सामाजिक
# चळवळी

**मुख्य संपादक**
प्राचार्य. डॉ. आय. डी. पाटील
**संपादक**
प्रा. डॉ. आर. एन. शेवाळे
प्रा. पी. एम. सोनवणे

अथर्व पब्लिकेशन्स

I.S.S's. Smt V.U. Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science Col
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned by CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स

# भारतातील राजकीय व सामाजिक चळवळी
# Political and Social Movements in India

© सर्व हक्क

ISBN 13 : 978-93-88544-74-0
पुस्तक प्रकाशन क्र. ६८३

**प्रकाशक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. **संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाईट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १०/०८/२०१९
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ₹ ९९५/-

*विद्याभारती शैक्षणिक मंडळ अमरावती संचलित संत मुक्ताबाई कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दिनांक १०/०८/२०१९ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्टीय चर्चासत्रातील निवडक लेख*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकाकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*



Scanned by CamScanner

# अलिप्ततावादी चळवळ : भारताची भूमिका व योगदान

– प्रा. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)

## प्रस्तावना

तिसऱ्या जगातील आफ्रो–आशियाई व लॅटिन अमेरिकन देशांना आवाज व स्वतंत्र ओळख मिळवून देण्यासाठी अलिप्ततावादी चळवळ उदयास आली. द्वितीय विश्वयुद्धोत्तर तत्कालिन परिस्थितीच्या रेट्यामुळे अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण स्वीकारूनच नवस्वतंत्र देशाच्या सार्वभौमत्त्वाचे व हितसंबधाचे संरक्षण करणे शक्य असल्याची जाणीव नेहरू, नासेर, टिटों, सुकार्नो व एन्क्रुमा यांसारख्या नेत्यांना होती. तसेच आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्षाच्या राजकारणात आणखी भर न घालता; शांतता व सहकार्याला प्रोत्साहन देणे हा देखिल अलिप्ततावादाचा एक हेतू होता.

अलिप्ततावाद ह्या शब्दाचा प्रथम उल्लेख भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केल्याचे मानले जाते. पंडित नेहरूंनी सुरवातीपासूनच भारताच्या परराष्ट्र धोरणाला अलिप्ततावादी वळण दिले होते. भारताच्या पुढाकाराने उदयाला आलेल्या अलिप्ततावादी चळवळीच्या सशक्ततेसाठी भारताने ठरविलेल्या भूमिकेचा व योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन पत्रात केलेला आहे.

## उद्दिष्टे

१. द्वितीय विश्वयुद्धोत्तर जागतिक परिस्थितीचा अभ्यास करणे .
२. शीतयुद्धामुळे नवोदित राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणासमोर निर्माण झालेल्या पेचप्रसंगाचा अभ्यास करणे.
३. अलिप्ततावादी चळवळीच्या उदयास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
४. अलिप्ततावादी चळवळीच्या उदय व विकासामध्ये भारताची भुमिका व योगदानाचा अभ्यास करणे.
५. सद्यस्थितीत अलिप्ततावादी चळवळीच्या प्रासंगिकतेचा अभ्यास करणे.

## द्वितीय विश्वयुध्दोत्तर जागतिक परिस्थिती

दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील साम्राज्यवाद व वसाहतवाद संपुष्टात येण्यास सुरवात होऊन परतंत्र्यातील राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळू लागले. याच प्रक्रियेचा



T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned by CamScanner

भाग म्हणजे हिंदूस्थानचे विभाजन होऊन भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे जगाच्या नकाशावर उदयास आली. भारताप्रमाणेच अनेक पारतंत्र्यातील राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी संयुक्त राज्य अमेरिका व सोविएत रशिया पुरस्कृत गटांमध्ये झाली होती. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा अमेरिका व साम्यवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा सोविएत रशिया यांच्यामध्ये विचारधारेच्या आधारावर सुरू झालेल्या या सत्तासंघर्षामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात शीत युध्दास सुरवात झाली. शीत युध्दाच्या राजकारणामुळे पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला.

### नवोदित राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणासमोरील पेच

दुसऱ्या महायुद्धानंतर पारतंत्र्यातील अनेक आफ्रो-आशियाई व लॅटिन अमेरिकन देशांना स्वातंत्र्य मिळाले असले तरी अमेरिका आणि सोविएत रशिया यांच्यामध्ये सुरू झालेल्या शीतयुद्धामुळे भारतासह सर्वच नवोदित राष्ट्रांच्या सार्वभौम परराष्ट्र धोरणासमोर एक खुप मोठे आव्हान निर्माण झाले. यासंदर्भात माओ-त्से-तुंग यांनी म्हटले होते की, ''जगात दोनच मार्ग आहेत. एक वाशिंग्टनच्या दिशेने जातो तर दुसरा मास्को च्या दिशेने जातो; तिसरा कोणताही मार्ग नाही.''[1]

अशा धोकादायक सत्ता स्पर्धेच्या राजकारणात स्वतःस गुंतवून न घेता आपले स्वतंत्र धोरण ठरवून स्वतःच्या विकासाचा मार्ग स्वतःच ठरवावा आणि जागतिक शांतता व सहकार्याचा पाठपुरावा करावा असा सर्वस्वी स्वतंत्र दृष्टीकोन पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडला होता. त्यांनी २ सप्टेंबर १९४६ रोजी नविन हंगामी सरकारची ओळख करून देत असतांना एका रेडिओ प्रसारणात म्हटले होते की, ''आम्ही असा निश्चय केला आहे की, आम्ही एकमेकांच्या विरूध्द संघटित झालेल्या गटांच्या शक्ती राजकारणापासून स्वतःस दुर ठेवणार आहोत; कारण त्यांनी जगास दोन वेळा महायुध्दाच्या खाईत ढकललेले आहे आणि पुन्हा एकदा अधिकच महाभयानक महायुध्दामध्ये ढकलु शकतात.''[2] याच मताचा पुनरूच्चार त्यांनी एका पत्रकार परिषदेत केला होता. म्हणजेच भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताचे परराष्ट्र धोरण हे अलिप्ततावादी स्वरूपाचे असेल असे नेहरूंनी स्वातंत्र्यापूर्वीच जाहिर केले होते.

### अलिप्ततावादी चळवळीचा उदय : भारताची भुमिका

आंतरराष्ट्रीय सत्तास्पर्धेच्या राजकारणापासून दूर राहण्याच्या नेहरूंच्या विचारातूनच १९६१ मध्ये अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाला. यासाठी जगातील पाच महान नेत्यांनी प्रयत्न केले होते. ज्यामध्ये पंडित जवाहरलाल



नेहरू (भारत), जोसेफ ब्राझ टिटो (युगोस्लाव्हिया), अब्देल नासेर (इजिप्त), जनरल सुकार्नो (इंडोनेशिया), आणि एन्क्रुमा (घाना) यांचा समावेश होता. एका युगोस्लाव्ह स्रोतानुसार अलिप्ततावाद (Non-Alignment) या शब्दाचा प्रथमतः अधिकृतपणे वापर भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९५४ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथिल भाषणात केला होता.[3]

स्वातंत्र्यप्राप्तिनंतर भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंच्या विचारांचा प्रभाव असल्याचे दिसते. नेहरूंची विचारसरणी ही आदर्शवादी स्वरूपाची असल्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण आदर्शवादी बनले. यानुसारच आंतरराष्ट्रीय संबधांना नियंत्रित करण्यासाठी २९ एप्रिल १९५४ रोजी तिबेटच्या संदर्भात भारत-चीन यांच्यात पंचशिल करार झाला. त्यातील पाच तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्त्वाचा आदर करणे.
२. परस्परांवर आक्रमण न करणे.
३. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.
४. समानता आणि परस्पर हितांचे संवर्धन करणे.
५. शांततामय सहजिवन मान्य करणे.[4]

या पाच सिध्दांताचे प्रतिपादन सर्वप्रथम चाऊ-एन-लाए व भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यामधील तीन दिवसांच्या चर्चेनंतर प्रकाशित करण्यात आलेल्या भारत चीन पंतप्रधानांच्या संयुक्त निवेदनामध्ये करण्यात आले होते. १० एप्रिल १९५५ रोजी नवी दिल्ली येथे भरलेल्या आशियाई परिषदेत दोनशे प्रतिनिधींनी भाग घेतला. त्यात पंचशिल सिद्धांताचे समर्थन केले. १८ ते २४ एप्रिल १९५५ रोजी बांडुंग (इंडोनेशिया) येथे भरलेल्या परिषदेत २९ आफ्रो-आशियाई राष्ट्रांनी पंचशिल सिध्दांताचा अर्थ निश्चित करून त्यास मान्यता दिली. एवढेच नव्हे तर संयुक्त राष्ट्र संघाच्या अनेक निर्णयात पंचशिल सिध्दांताचा आधार घेण्यात आला.[5] या पंचशिल सिद्धांतावर श्रध्दा ठेवून भारताच्या पुढाकाराने अलिप्ततावादी चळवळीची स्थापना झाली.

### अलिप्ततावादाचा अर्थ व व्याप्ती

अलिप्ततावाद हे Non-Alignment या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. राजकारणात Alignment याचा अर्थ एखाद्या राजकीय गटाशी निगडीत होणे, सभासद होणे असा होतो. म्हणून Alignment म्हणजे महासत्तांच्या गटात शामिल न होणे होय. परंतू याशिवाय व्यवहारात 'अलिप्ततावाद' याचा अर्थ खुपच व्यापक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात रस असणारे सर्वच लोक अलिप्ततावादास



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

Scanned by CamScanner

त्याच्या खऱ्या अर्थाने समजुन घेतात; असे आजही ठामपणे म्हटले जाऊ शकत नाही. कारण अलिप्ततावादाशी संबधित शब्दावली विषयी अनेक गैरसमज पसरलेले आहेत. युगोस्लाव्हियाचे राजदूत लिओ मॅटस, यांच्या मते ''या जगात जेवढे अलिप्ततावादी देश आहेत, तेवढ्या अलिप्ततेच्या व्याख्या आहेत.''[६] जॉर्ज श्वार्जनबर्जर यांनी,'' संधीपासून अलिप्त राहण्याचे धोरण''[७] अशी अलिप्ततावादाची व्याख्या केली आहे. म्हणजेच अलिप्ततावादाचा अर्थ कोणत्याही गटात सामिल न होता स्वत:च्या राष्ट्राचे धोरण स्वत:च्या राष्ट्रातच आखणे असा होतो.

अप्पादोराय यांच्या शब्दात, ''कोणत्याही देशासोबत लष्करी करारांमध्ये विशेषत: एखाद्या साम्यवादी किंवा पश्चिमी गटातील राष्ट्रांसोबत सैनिकी करारांमध्ये सहभागी न होणे म्हणजेच अलिप्ततावाद होय.''[८]

एम.एस.राजन यांच्या शब्दात अलिप्ततावाद म्हणजे, ''विशेषत: आणि नकारात्मक दृष्टिकोनातून अलिप्ततावाद म्हणजे लष्करी आणि राजकीय गटांना अमान्य करणे होय. सकारात्मक दृष्टिकोनातून अलिप्ततावाद म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात जेव्हा असे प्रश्न सामोरे येतील तेव्हा प्रत्येक प्रकरणापासून मिळणारे लाभ आणि त्याचे गुण यानुसार निर्णय घेणे होय.''[९]

'असंलग्नता' व 'गटनिरपेक्षता' इत्यादी संज्ञा 'अलिप्ततावाद' यासाठी वापरल्या जातात; परंतू त्यातून नेमका अर्थ व्यक्त होत नाही. अलिप्ततावाद म्हणजे पलायनवाद किंवा तटस्थता नाही. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मते ''अलिप्ततावादाचा अर्थ तटस्थता हा नसून अलिप्ततावाद हा आमचा स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा व कार्य करण्याचा दावा आहे. कोणताही मोठा विवाद निर्माण झाला असतांना आम्ही आमचा दृष्टिकोन अभिव्यक्त करण्यास किंवा न्यायाची बाजू घेण्यास कधीच टाळाटाळ केली नाही.''[१०]

पंडित जवाहरलाल नेहरूंनी एकदा म्हटले होते की, ''अलिप्ततावाद म्हणजे एखाद्या देशाने लष्करी करारापासून स्वत:स दुर ठेवण्याचा प्रयत्न करणे होय. याचा अर्थ असा होतो की, वस्तूस्थितीस लष्करी दृष्टिकोनातून न पाहणे, तथापी कधी-कधी असे करावे देखिल लागते; परंतू आपला दृष्टिकोन स्वतंत्र असला पाहिज तसेच सर्व देशांसोबत मैत्रीपूर्ण संबंध असले पाहिजे.'' यावरून असे स्पष्ट होते की, अलिप्ततावाद हे एक प्रकारचे स्वतंत्र धोरण आहे. नवोदित राष्ट्रांनी साम्राज्यवादी व बड्या राष्ट्रांकडे न झुकता स्वत:ची आर्थिक प्रगती करण्यासाठी व स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी निर्धारित केलेली ही एक व्यूहरचना आहे. म्हणजेच आंतरराष्ट्रीय संबधाच्या संदर्भात याला कुटनीतिक स्वरूपातून देखिल पाहिले जाऊ शकते. याआधारावर जेव्हा एक राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करीत असते, तेव्हा अलिप्ततावादाचा संबंध परराष्ट्र



धोरणाशी जोडला जातो.

थोडक्यात शीतयुद्धापासून पृथकता हे अलिप्ततावादाचे मुख्य तत्त्व आहे. परंतु हे धोरण मुग गिळून गप्प बसण्याचे नाही किंवा आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात संन्यास घेण्याचे देखिल नाही. अलिप्ततावादामध्ये स्वतंत्र राष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध स्थापन केले जातात आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात न्यायपुर्ण पद्धतीने सक्रिय सहभाग घेतला जातो. अलिप्ततावादी धोरणामुळेच भारतास आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतंत्र व न्यायपूर्ण भूमिका वठविता आली व वठविता येत आहे.

### सद्यस्थितीत अलिप्ततावादी चळवळ

१९६१ साली उदयाला आलेल्या अलिप्ततावादी चळवळीला आज ५८ वर्ष पुर्ण होत आहेत. सुरूवातीला २५ सदस्यसंख्या असणाऱ्या या चळवळीची सदस्यसंख्या आज १२५ वर पोहोचली आहे. आतापर्यंत अलिप्ततावादी चळवळीच्या १७ शिखरपरिषदा झाल्या आहेत. पहिली शिखर परिषद १९६१ साली बेलग्रेड येथे झाली होती, तर १७ वी शिखरपरिषद व्हेनेझुएला येथे पार पडली. अलिप्ततावादी चळवळीची १८ वी शिखर परिषद ऑक्टोंबर २०१९ मध्ये अझेरबाईजान गणराज्य येथे होणार आहे. अलिप्ततावादी चळवळींच्या वरील सर्व शिखरपरिषदांमध्ये अलिप्त राष्ट्रांच्या जीवनमरणाशी संबंधित प्रश्नांची चर्चा झाली. शीतयुध्दकाळात सत्तागटांपासून अलिप्त राहून नवस्वातंत्र देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे होता. परंतु शीतयुद्धोत्तर अलिप्त राष्ट्रांचा आर्थिक विकास, संयुक्त राष्ट्रामधील अलिप्त राष्ट्रांची न्यायोचित भागिदारी, नि:शस्त्रीकरण, पर्यावरण संरक्षण यासारख्या मानवी अस्तित्त्वाच्या रक्षणाशी संबंधित प्रश्नांची चर्चा अलिप्ततावादी चळवळीच्या व्यासपिठावर होत आहे. त्यामुळे शीतयुध्दोत्तर काळातहीअलिप्ततावादी चळवळीची गरज व प्रासंगिकता कायम आहे.

### सारांश व निष्कर्ष

शीतयुध्दाच्या पार्श्वभूमीवर उदयाला आलेल्या अलिप्ततावादी चळवळीने नवस्वतंत्र देशांना ध्रुवीकरण व आंतरराष्ट्रीय गटबाजी यापासुन दूर ठेवून आंतरराष्ट्रीय शांतता, सहकार्य व सलोखा याला प्राधान्य दिले. अलिप्ततावादी धोरणामुळे नवस्वतंत्र आफ्रो-आशियाई व लॅटिन अमेरिकन देशांना आंतरराष्ट्रीय राजकारणात न्यायोचित भूमिका घेता येणे शक्य झाले. सुरुवातीच्या काळात अलिप्ततावादी चळवळीने साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंशवाद याविरुध्द लढा दिला. शीतयुध्दोत्तर काळात बदलत्या प्रश्नांनुसार अलिप्ततावादी चळवळीची भूमिका देखिल बदलती आहे.

१९६१ साली स्थापन झालेल्या अलिप्ततावादी चळवळीची सदस्यसंख्या



T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned by CamScanner

२५ वरून आता १२५ वर पोहोचली आहे. ही सदस्यसंख्या संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य संख्येच्या २/३ एवढी आहे. जागतिक लोकसंख्येच्या ५५ टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्त्व अलिप्त राष्ट्रे करतात. म्हणून वर्तमान काळातील अमेरिका केंद्रित एकध्रुवीय विश्वव्यवस्थेत अनेक गरीब राष्ट्रांच्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता कायम आहे. तसेच जगासमोर आव्हान निर्माण करणाऱ्या पर्यावरण, वातावरणीय बदल, तापमान वाढ यासारख्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठीही अलिप्ततावादी चळवळीचे अस्तित्त्व आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यायोचित नविन विश्वव्यवस्थेच्या निर्मितीसाठी अलिप्ततावादी चळवळ आजही प्रासंगिक आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. पामर नार्मन डी : इंटरनॅशनल रिलेशन्स, साइंटिफिके हॉवर्ड सी. परकिन्स बुक एजन्सि, कलकत्ता, १९७६, पृ.४६०
२. कुलश्रेष्ठ के.के. : आंतरराष्ट्रीय संबध, एस. चंद अँड कंपनी, नवी दिल्ली, १९८९, पृ. ५२७
३. कित्ता.
४. बाचल वि.मा. : आंतरराष्ट्रीय संबध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७७, पृ.१९१
५. शरद सोनवणे : अलिप्ततावादी चळवळीची बदलत्या संदर्भात प्रासंगिकता, एम.फिल. शोधप्रबंध, डॉ. बा.आ.म. विद्यापीठ, औरंगाबाद २००८, पृ.२३
६. रुबिनस्टेन अल्विन झेड : युगोस्लाव्हिया अँड द नॉन-अलाइन्ड वर्ल्ड, न्यू जर्सि, १९७०, पृ. ११९-१२२.
७. घई यू. आर. : अन्तर्राष्ट्रीय राजनीति : सिध्दांत और व्यवहार, जालन्धर, २००३, पृ.१८२
८. कित्ता, पृ. १८३
९. कोली सी.एम : अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध, जयपूर, २०००, पृ ७२
१०. उपरोक्त-७, पृ. १८२
११. कित्ता.




Scanned by CamScanner

# भारतीय लोकशाहीची वाटचाल

## The Trajectory of Indian Democracy



- संपादक -

डॉ. हनुमंत कुरकुटे । डॉ. वसंत खरात । डॉ. श्रीकांत देशमुख

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science Co...
Sakri, Tal Sakri, Dist.Dhu...

अथर्व पब्लिकेशन्स

**भारतीय लोकशाहीची वाटचाल**
The Trajectory of Indian Democracy

© सर्व हक्क सुरक्षित

P Book ISBN : 978-93-90288-00-0
पुस्तक प्रकाशन क्र. ०००

**प्रकाशक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २६ जानेवारी २०२१ **अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ०००/-

**E-Book** ***available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

या पुस्तकात प्रसिद्ध झालेली मते संपादक आणि प्रकाशक यांना मान्य असतीलच असे नाही. या पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत, तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या - त्या लेखकांवर राहील.



T.S.S's. Late Dr.B.S. Desale Science College, Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# भारतीय लोकशाही आणि आघाड्यांचे राजकारण

– प्रा. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे

**प्रस्तावना**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही शासन व्यवस्था असलेला देश आहे. भारताने संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार केलेला असून, आज भारतात २८ घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आहेत (ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीर राज्याचे विभाजन होऊन जम्मू-काश्मीर, लडाख या केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाल्यानंतर). भारतीय राज्यघटनेने संसदीय शासनव्यवस्था आणि बहुपक्ष पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तरीदेखील भारतीय राजकारणात अनेक वर्षांपर्यंत काँग्रेस हा एकच पक्ष प्रबळ राहिला. केंद्र व राज्यांमध्ये, केरळसारखा एखाद-दुसरा अपवाद वगळता काँग्रेस पक्ष सत्तेवर होता. त्यामुळे इतर राजकीय पक्षांचे अस्तित्व नगण्यच राहिले. स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे करिश्माई नेतृत्व हे काँग्रेसच्या वर्चस्वाचे मूलाधार होते. १९६४ मध्ये पंडित नेहरूंचे निधन झाल्यावर मात्र काँग्रेस वर्चस्वास सुरुंग लागण्यास सुरुवात झाली.

१९६७ मध्ये झालेल्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी बिगर-काँग्रेसवादाचा मुद्दा ऐरणीवर आणला. त्यामुळे आठ राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाची पीछेहाट झाली आणि राज्यपातळीवर बिगर-काँग्रेसी किंवा काँग्रेस पुरस्कृत / पाठिंब्याने आघाडी सरकारे स्थापन झाली. येथूनच भारतीय राजकारणात राज्यपातळीवर आघाडीच्या राजकारणाच्या पर्वाची सुरुवात झाली. १९७७ मध्ये मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली केंद्रस्तरावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व भेदून पहिले बिगर-काँग्रेसी सरकार स्थापन झाले, हे एका अर्थाने आघाडीचे सरकार होते; परंतु केंद्रस्तरावर खऱ्या अर्थाने आघाडी सरकारची सुरुवात १९८९ च्या व्ही. पी. सिंहांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडीच्या सरकारपासून मानली जाते. १९८९ नंतर केंद्रस्तरावर सत्तारूढ झालेली सरकारे ही आघाडी सरकारेच होती. १९९१ च्या पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारचा एक अपवाद वगळला, तर १९९६ ते २००९ या कालावधीत केंद्रात सत्तारूढ झालेली सरकारेही जनता पक्ष, भाजप व काँग्रेस या राष्ट्रीय पक्षांच्या नेतृत्वाखालील आघाडीची सरकारे होती. त्यांच्या आघाड्यांना अनुक्रमे संयुक्त आघाडी, राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) व संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) या नावाने ओळखले जाते, तर १९८९ मध्ये व्ही. पी. सिंहांच्या नेतृत्वाखालील सरकार हे राष्ट्रीय आघाडीचे (नॅशनल फ्रंट) होते.

२०१४ व २०१९ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकार केंद्रात सत्तेवर आले; हे सरकार यापूर्वीच्या सर्वच आघाडी सरकारपेक्षा अगदी वेगळे आहे. कारण, या दोन्ही सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाजपला स्वबळावर अर्थातच नरेंद्र मोदींच्या नावावर पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे भाजपला सरकार स्थापनेसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील घटक पक्षांच्या पाठिंब्याची गरजच नव्हती. त्यामुळे ते मोदी सरकार म्हणून ओळखले जाते. अशा प्रकारे, आघाडी अंतर्गत एका प्रबळ पक्षाच्या वर्चस्वाचा आणखी एक नवीन प्रवाह भारतीय राजकारणात येऊ पाहत आहे; कदाचित तो भाजपच्या एक पक्ष वर्चस्व पद्धतीकडे जाणाराही असू शकतो. भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेमधील आघाडीच्या राजकारणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात आलेला आहे.



PRINCIPAL
T.S.S's Smt. V. U. Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
T.S.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

### भारतातील आघाड्यांचे राजकारण

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात केंद्र आणि सर्व घटक राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले. सर्व विरोधी पक्षांपैकी केवळ कम्युनिस्ट पक्ष १९५७ मध्ये केरळ राज्यात सत्तारूढ होऊ शकला होता. १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या निधनानंतर भारतातील राज्यांच्या राजकारणाचे स्वरूप बदलले आणि तुलनात्मकदृष्ट्या राज्याच्या प्रभावामध्ये वाढ झाली. १९६४ पूर्वी राज्यांचे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ यासंबंधीचे निर्णय दिल्लीमध्ये व्हायचे; परंतु नेहरूंच्या मृत्यूनंतर, लालबहादूर शास्त्री यांच्या निवडीसंदर्भात आणि लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर, इंदिरा गांधींच्या निवडीमध्ये राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका वठवली. तेव्हापासून राज्याच्या राजकारणात स्वायत्ततेची भावना वाढीस लागली.[१]

सामान्यतः असे मानले जाते की, द्विपक्ष पद्धती असलेल्या देशात एका पक्षाचे सरकार स्थापन होते आणि बहुपक्ष पद्धती असलेल्या देशात कोणत्याही एकाच पक्षाला बहुमत प्राप्त होत नसल्यामुळे आघाडीचे सरकार स्थापन होत असते; परंतु भारत दीर्घकाळापर्यंत या सामान्य नियमांना अपवाद राहिलेला आहे. याचे कारण भारतात बहुपक्ष पद्धती असताना देखील; भारतात बराच काळ एकच राजकीय पक्ष वर्चस्वशाली राहिला. १९४७ पासून १९६६ पर्यंतच्या काळात काँग्रेस हा केवळ केंद्रातच नव्हे; तर अधिकांश राज्यांमध्ये प्रबळ पक्ष होता. १९७१ ते १९७६ या कालावधीत आणि पुन्हा १९८० ते १९८८ या काळात काँग्रेसने केंद्र आणि बहुतांश राज्यांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. अशा प्रकारे, भारताच्या संविधानिक इतिहासामध्ये एकाच पक्षाचे सरकार असणे, हे सामान्य स्थितीच्या स्वरूपात होते, तर आघाडीची सरकारे ही अपवादात्मक स्वरूपात राहिली होती; परंतु आता केंद्र आणि राज्यांमध्ये आघाडीची सरकारे ही एक सामान्य स्थिती झाली आहे. आज भारतीय राजकारणातील काँग्रेस वर्चस्वाचा अंत झाला आहे. त्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याच्या दिशेने भाजपची वाटचाल सुरू आहे.[२] परंतु त्याचे स्वरूप फारतर भाजप वर्चस्वाची आघाडी असेच असू शकेल.

### भारतातील आघाडीच्या राजकारणाची वाटचाल

भारतातील आघाडीच्या राजकारणाचा अभ्यास दोन प्रकारे केला जातो.

१) राज्यस्तरावरील आघाडीचे राजकारण.

२) केंद्रस्तरावरील आघाडीचे राजकारण.

भारतात आघाडीच्या राजकारणाचे पहिले पर्व १९६७ पासून राज्यस्तरावर सुरू झाले; तर दुसरे पर्व १९८९ पासून केंद्रीय स्तरावर सुरू झाले.

### राज्यस्तरावरील आघाड्यांचे राजकारण

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रारंभीच्या काळात, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा देशातला एकमेव प्रबळ पक्ष होता. स्वातंत्र्य आंदोलनात काँग्रेस पक्ष अग्रभागी राहिला होता, तसेच प्रामुख्याने काँग्रेस नेत्यांच्या नेतृत्वाखाली भारताचा स्वातंत्र्यलढा लढला गेला होता. त्यामुळे काँग्रेस पक्षाला स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी होती. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काँग्रेस संघटना गावागावांत पोहोचली आणि देशव्यापी बनली होती. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना देशभर लोकप्रियता व ओळख लाभली होती. देशातील सर्वांत जुना पक्ष, स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरी, देशव्यापी संघटना आणि काँग्रेस नेत्यांची लोकप्रियता यांमुळे काँग्रेस पक्षाच्या हाती सत्ता जाणे, हे प्रारंभीच्या काळात स्वाभाविकच होते. स्वातंत्र्यानंतर भारतात अनेक नवे पक्ष उदयाला आले. पण, काँग्रेसला आव्हान देऊ शकेल, असा कोणताच पक्ष निर्माण झाला नव्हता. त्यामुळे केंद्रात व सर्वच घटक राज्यांमध्ये काँग्रेस पक्ष सत्तारूढ होता. म्हणून प्रारंभीच्या काळात भारतातील पक्ष पद्धतीचे स्वरूप 'एक पक्ष, प्रबळ बहुपक्ष पद्धती' असे होते.[३]

काँग्रेस वर्चस्वाच्या राजकारणात केरळ राज्य मात्र सुरुवातीपासून अपवाद राहिले. १९६७ पूर्वीदेखील काँग्रेसला



Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule T.S.S's Smt V.D. Patil Arts &
PRINCIPAL
T.S.S's Smt V.D. Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

केरळमध्ये कधीच बहुमत मिळाले नाही. १९५१-५२ मध्ये काँग्रेसने केरळमध्ये (त्रावणकोर-कोचीन) सर्वाधिक जागा जिंकल्या. पण, बहुमत मात्र मिळू शकले नाही. अखेर काँग्रेसने 'तमिळनाडू त्रावणकोर नॅशनल काँग्रेस'च्या सहाय्याने मंत्रिमंडळ स्थापन केले; परंतु सहा महिन्यांच्या आत नॅशनल काँग्रेसने अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने मतदान करून सरकारला पराभूत केले. त्यानंतर १९५४ मध्ये त्रावणकोर-कोचीनमध्ये मध्यावधी निवडणुका झाल्या; त्यात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. अखेर काँग्रेसच्या पाठिंब्याने प्रजा समाजवादी पक्षाने पट्टमथानू पिल्लई यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले; परंतु मार्च १९५५ मध्ये ते कोसळले. त्यानंतर जी. पी. मेनन यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकार स्थापन झाले; ते एक वर्ष टिकले. त्यानंतर १९६० मध्ये पुन्हा पिल्लई यांच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार स्थापन झाले व ते १९६२ पर्यंत चालले. यावरून असे दिसते की, केरळमधील काँग्रेस नेत्यांनी आणि काँग्रेस श्रेष्ठींनी आघाडी सरकार किंवा साम्यवादी सरकार पाडण्याचे सातत्याने प्रयत्न केले; त्यामुळे तेथील आघाडीची सरकारे नेहमी अस्थिर राहिली.[४]

**१९६७ च्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर राज्यस्तरावर आघाडीच्या राजकारणाची सुरुवात**

भारतात राज्यस्तरावर आघाडीच्या राजकारणाची सुरुवात १९६७ मध्ये झालेल्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांपासून झाली. १९६७ पूर्वी आघाडीच्या राजकारणाचे क्षेत्र केरळपुरतेच मर्यादित होते. मात्र, १९६७ नंतर आघाडीच्या राजकारणाने राज्याचे राजकारण व्यापून टाकले. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांनी आवाहन केले होते की, संयुक्त आघाडीच्या माध्यमातून सर्व विरोधी पक्ष एकत्र आले, तरच काँग्रेस राजवटीचा अभेद्य किल्ला ढासळू शकेल. डॉ. लोहिया यांनी 'बिगर-काँग्रेसवाद' असा राजकीय पवित्रा घेतला. त्यासाठी त्यांनी डावे पक्ष व उजवे पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीपासून भारतीय जनसंघ यासारखा उजवा पक्ष अशा वेगवेगळ्या राजकीय पक्षांना एकत्र आणून; काँग्रेस विरुद्ध संयुक्त आघाडी निर्माण करण्यात यश मिळविले. या संयुक्त आघाडीने उत्तरेकडील काही राज्यांमध्ये यश मिळविले, तरीही काँग्रेस पक्षाला लोकसभेत बहुमत मिळाले.[५] काही राज्यांमध्ये काँग्रेसविरोधी पक्षांची आघाडी सरकारे स्थापन झाली. मात्र, केंद्रातील काँग्रेस पक्षाची सत्ता अबाधित राहिली.

भारतात आघाड्यांच्या राजकारणाचे पर्व सर्वप्रथम भारतातील राज्यांमध्ये सुरू झाले. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बऱ्याच राज्यांमध्ये काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला, तर काही राज्यांमध्ये काँग्रेसला सरकार स्थापन करण्याइतपत बहुमत प्राप्त झाले नाही. म्हणून काँग्रेसला सरकार स्थापनेसाठी इतर पक्षांचे सहकार्य घ्यावे लागले. हे सहकार्यच भारतात आघाडी सरकारच्या उदयाचे कारण ठरले. भारतातील सर्व काँग्रेस विरोधी पक्ष काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी एकवटले होते. त्यांनी काँग्रेस विरुद्ध संयुक्तपणे आघाडी उघडल्यामुळे, काँग्रेसचा प्रभाव कमी झाला. विशेषतः राज्याच्या राजकारणातला काँग्रेसचा प्रभाव घटला. काही राज्यांमध्ये काँग्रेस पक्षात फूट पडली. या सर्व कारणांच्या एकत्रित परिणामामुळे केरळ, ओरिसा, पश्चिम बंगाल, राजस्थान, हरियाना, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब इत्यादी राज्यांमध्ये आघाडीची सरकारे स्थापन झाली.[६]

काँग्रेस पक्ष सुरुवातीला आघाडीचे सरकार स्थापन करण्यास इच्छुक नव्हता; परंतु काँग्रेस पक्ष इतर विरोधी पक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करू शकेल, अशी परिस्थिती राज्यांमध्ये होती. नंतर काँग्रेस पक्षाने देखील विरोधी पक्षांच्या मदतीने काही राज्यांत सरकारे स्थापन केली. काही राज्यांमध्ये काँग्रेसने विरोधी पक्षांना पाठिंबा देऊन सरकारे स्थापन झाली; परंतु काँग्रेस पक्ष मंत्रिमंडळात सामील झाला नाही. अशा प्रकारे १९६७ च्या निवडणुकीनंतर भारतातील राज्यांमध्ये तीन प्रकारची आघाडीची सरकारे स्थापन झाली.

१) काँग्रेस नेतृत्वाखालील आघाडी सरकार
२) काँग्रेस समर्थित आघाडी सरकार



PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

३) काँग्रेसविरोधी पक्षांचे आघाडी सरकार[७]

उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेश या राज्यांमध्ये काँग्रेसविरोधी आघाडीच्या संयुक्त विधायक दलाने सरकार स्थापन केले. पश्चिम बंगाल व केरळमध्ये डावी आघाडी सत्तेवर आली. तथापि, आघाडी सरकारच्या प्रयोगाला मार्गदर्शन करणारे डॉ. लोहिया हे १९६७ च्या ऑक्टोबरमध्ये मरण पावले. त्यानंतर संयुक्त विधायक दलातील मतभेद तीव्र झाले आणि ती सरकारे पडली. तथापि, केरळ व पश्चिम बंगालमध्ये डाव्या सरकारांमध्ये अस्थिरता निर्माण झाली नाही. संयुक्त विधायक दलाच्या पराभवानंतर ज्या ठिकाणी काँग्रेसने बहुमत गमावले होते, तिथे तो पक्ष पुन्हा सत्ता काबीज करू शकला. ही विरोधी पक्षांची मोठीच माघार होती.[८]

**केंद्रस्तरावर सुरू झालेले आघाड्यांचे राजकारण**

भारताच्या राजकीय इतिहासात १९८९ या वर्षाने एक मोठी विभाजनरेषा ओढली आहे. यापूर्वी काँग्रेस हा एक महाकाय आणि शक्तिशाली संघटना असलेला पक्ष होता; परंतु यानंतर एक पक्ष वर्चस्वाचा (काँग्रेस वर्चस्वाचा) अंत झाला आणि अनेक पक्षांच्या आघाडीचा जमाना सुरू झाला. याआधीच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष जवळजवळ पन्नास टक्के मते मिळवून राष्ट्रीय संसदेमधील ६० टक्के जागा जिंकायचा; परंतु आता मोठ्या प्रमाणावर काँग्रेसच्या जागा घटत असल्याचे मुख्य कारण, हळूहळू कमी होत असलेला काँग्रेसचा जनाधार हे आहे,[९] हे स्पष्ट झाले आहे.

१९८९ च्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले, तरी काँग्रेस हा लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष ठरला होता; परंतु काँग्रेसला इतर पक्षांना केंद्रीय सत्तेत सहभागी करून घेणे मान्य नसल्यामुळे; काँग्रेसने आघाडीच्या राजकारणाचा पर्याय वापरून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला नाही. जनता पक्षाने मात्र व्ही. पी. सिंहांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडी स्थापन करून, केंद्रात खऱ्या अर्थाने आघाडी सरकारचे सर्व निकष पूर्ण करणारे, राष्ट्रीय आघाडी सरकार स्थापन करुन, केंद्रस्तरावर आघाडीच्या सरकारचे नवे पर्व सुरू केले. राष्ट्रीय आघाडीची स्थापना निवडणुकीपूर्वीच झाली होती; परंतु या आघाडीला सरकार स्थापनेसाठी आवश्यक बहुमत मिळाले नव्हते. तरीही बिगर-काँग्रेसवादाच्या मुद्द्यावर राष्ट्रीय आघाडीने भाजप व डाव्या पक्षांचा बाहेरून पाठिंबा मिळवून सरकार स्थापन केले. यापुढील काळात कोणत्याही पक्षाला केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी आघाडीच्या राजकारणाशिवाय पर्याय उरला नाही.

१९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या अल्पमतातील काँग्रेस सरकारचा अपवाद सोडला, तर आजपर्यंतचे भारताचे राजकारण हे आघाड्यांचे राजकारण आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत भाजपला नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे घवघवीत यश मिळून, स्पष्ट बहुमत प्राप्त झालेले असले, तरी भाजपचे हे यश त्यांनी वेगवेगळ्या राज्यांमध्ये तेथील प्रादेशिक पक्षांशी केलेल्या आघाडीत दडलेले आहे, हे नाकारता येणार नाही.

१९८९ पासून भारतीय राजकारणात ज्या आघाड्या आकाराला आल्या, त्यांच्या स्वरूपावरून किंवा त्या आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या पक्षांवरून, आघाड्यांचे तीन प्रकारांत वर्गीकरण करता येते.

१) भाजप वर्चस्वाखालील आघाडी (राष्ट्रीय लोकशाही आघाडी)

२) जनता प्रयोगाच्या समाजवादी अवशेषांवर आधारलेली आघाडी (राष्ट्रीय आघाडी/संयुक्त आघाडी)

३) काँग्रेस वर्चस्वाखालील आघाडी (संयुक्त पुरोगामी आघाडी)[१०]

याबरोबरच, प्रादेशिक पक्षांची तिसरी व चौथी आघाडीदेखील आकार घेत असते.

**समारोप**

भारतीय राजकारणात केंद्रस्तरावर सुरू झालेल्या आघाड्यांच्या राजकारणात भाजप हा उजवा पक्ष आरंभीपासूनच अनुकूल राहिलेला आहे. नव्हे; तर आघाडीच्या राजकारणाला स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी



PRINCIPAL
T.S.S's Sant.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

कसे वापरून घ्यायचे, याचे व्यवहारज्ञान भाजपकडे सुरुवातीपासूनच होते. आघाडीच्या राजकारणाच्या माध्यमातूनच भाजप उत्कर्षावर पोहोचला आहे. काँग्रेस वर्चस्वाच्या ऱ्हासानंतर संपुष्टात आलेल्या एकपक्ष वर्चस्वशाली व्यवस्थेचे पुनरुज्जीवन होऊन पूर्वीच्या काँग्रेस वर्चस्वाची जागा भाजप वर्चस्वाने व्यापली जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या प्रयत्नांची सुरुवात करताना भाजपने २०१४ मध्ये केंद्रस्तरावर मिळालेल्या अविश्वसनीय यशानंतर, महाराष्ट्र व हरियाना या राज्यांतील मित्रपक्षांसोबतची आघाडी मोडून; तेथील विधानसभा निवडणुकांमध्ये स्वबळावर सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यांमध्ये भाजपची स्वबळावर सत्तादेखील आली. २०१४ व २०१९ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तारूढ झालेल्या सरकारपासून केंद्रातील आघाडी सरकारचे स्वरूप काहीसे बदलले आहे. कारण, सत्तास्थापनेसाठी आवश्यक असणारे; किंबहुना त्याहून अधिक बहुमत एकट्या भाजपकडे आहे. त्यामुळे या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारवर केवळ भाजपचे (नरेंद्र मोदींचे) सर्वस्वी वर्चस्व आहे; परंतु तरीही एक गोष्ट मात्र नक्कीच विसरता येणार नाही; ती म्हणजे, २०१४ व २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी भाजपला वेगवेगळ्या राज्यांमध्ये मित्रपक्षांची चाचपणी व मनधरणी करावी लागली होती. म्हणजेच, त्यात मिळालेले यश हे एकट्या भाजपचे यश नाही, तर त्यामध्ये भाजपच्या मित्रपक्षांचा देखील वाटा आहे. याचा अर्थ, आघाडीच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करणे भाजपला शक्य नाही व ते कोणत्याच राजकीय पक्षाला शक्य नाही.

अशाप्रकारे, भारतात १९६७ पासून राज्यस्तरावर आणि १९८९ पासून केंद्रस्तरावर सुरू झालेले आघाड्यांचे राजकारण अधिकच व्यापक बनले आहे. १९९१ चा एक अपवाद सोडला, तर १९८९ नंतर केंद्रात आलेली सर्व सरकारे आघाडीचीच होती. खरेतर, आघाडी राजकारण हे भारतीय लोकशाही व्यवस्थेचा स्थायीभाव बनले आहे आणि याद्वारेच भारतीय लोकशाही अधिक प्रगल्भतेकडे वाटचाल करणार आहे, यात शंका नाही.

संदर्भसूची


१. वर्मा गोविंदराम, 'भारतीय राजनीति और शासन', मॅकमिलन कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, नई दिल्ली, तृतीय संस्करण, १९७८, पृ. क्र. ३५५.
२. फडिया बी. एल., 'भारतीय प्रशासन' साहित्य भवन पब्लिकेशन', आग्रा, तेरवा संस्करण, २०१३, पृ. क्र. ९३९,
३. बाचल वि. मा., वराडकर र. घ., 'राज्यशास्त्र', निराली प्रकाशन, पुणे, तृतीय संस्करण, २०१०, पृ. क्र. २२.१८
४. उपरोक्त क्र. २, पृ. क्र. ९४०.
५. प्रधान ग. प्र., 'भारतीय राजकारणाचे दोन पैलू : लोकशाही आणि समाजवाद', साधना प्रकाशन, पुणे, २००८, पृ. क्र. २३.
६. बालेन्द्र सिंह, 'भारत की साझा सरकारे एवं क्षेत्रीय दल', आर. बी. एस. ए. पब्लिशर्स, जयपूर, २००७, पृ. क्र. ५२.
७. सईद एस. एम., 'भारतीय राजनीतिक व्यवस्था', सुलभ प्रकाशन, लखनौ, २००१, पृ. क्र. २९२-२९३.
८. उपरोक्त क्र. ५, पृ. क्र. २६.
९. गाबा ओमप्रकाश, 'तुलनात्मक राजनीति की रुपरेखा', मयूर पेपरबैक्स, नोएडा, चतुर्थ संस्करण, २००४, पृ. क्र. १४४.
१०. कित्ता, पृ. क्र. १४५.




T.S.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri. Dist.Dhule

*ISBN* 978-81-947698-8-0

# *Sustainable Innovative Development in Economics, Environment, Agriculture, Health, Society*

(अर्थशास्त्र, पर्यावरण, कृषी, आरोग्य, समाजातील शाश्वत नाविन्यपूर्ण विकास)

Editor
**Dr. S. M. Mulani**
***Head, Department of Geography,***
***Deshbhakta Sambhajirao Mahavidyalaya College, Mohol (Solapur), Maharashtra***


















Jyotikiran Publication, Pune
International Publication

PRINCIPAL
T.S.S's.Smt.P.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

| | |
|---|---|
| **Title** | : Sustainable Innovative Development in Economics, Environment, Agriculture, Health, Society<br>*(अर्थशास्त्र, पर्यावरण, कृषी, आरोग्य, समाजातील शाश्वत नाविन्यपूर्ण विकास)* |
| **Editor's Name** | : **Dr. S. M. Mulani** |
| **Publishing Agency** | : Jyotikiran Publication, Pune |
| **Publisher Address** | : Santosh Pandurang Mane<br>Sr. No. 204, Sahajeevan Society, Bhekrinagar, Hadpsar, Pune-8<br>Mob- 7058486065<br>Email- jyotikiranpublicationpune@gmail.com |
| **Printed By** | : Amitsons Digital Copier 106, Paras Chamber, 1st Floor, Above Bank Of India, Near Laxminarayan Theatre, Swargate, Pune- 411009. |
| **Edition Details** | : 2nd |
| **ISBN** | : 978-81-947698-8-0 |
| **Copyright** | : **© Dr. S. M. Mulani** |

*The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the book chapter. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their book chapter*

**© All rights reserved with the Editors** **Price: Rs- 600/-**

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : अन्नदात्यांची कैफियत

**शरद बाबुराव सोनवणे**

*सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे*

*ई – मेल-sharadpolsci@gmail.com*

## प्रस्तावना

*भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती व शेतीपूरक व्यवसाय के आहेत. स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी व कृषीउत्पन्न विकासासाठी नियोजनबद्ध योजना राबविल्यामुळे देशात हरित क्रांती घडून आली. याचे संपूर्ण श्रेय तत्कालीन नेतृत्वाच्या राजकीय इच्छाशक्तीला द्यावे लागेल. सन 1991 मध्ये भारताने उदारीकरणाचा स्वीकार केल्यानंतर सर्वच क्षेत्रात तीव्र स्पर्धा सुरू झाली व सरकारने एकाएका जबाबदारीतून अंग काढून घेण्यास सुरुवात केली. शेती क्षेत्र देखील यापासून अपवाद राहिले नाही. सरकारने खते, बी-बियाणे, यंत्रे व शेती अवजारे यामधील सरकारी सबसिडी काढून घेण्यास सुरुवात केली. अशातच जागतिक पातळीवर सर्वत्र निर्माण झालेल्या प्रदूषण, पर्यावरणीय ऱ्हास, तापमान वाढ अशा सर्व परस्पर संबंधित समस्यांमुळे नैसर्गिक ऋतुचक्रात देखील बदल होत आहे. त्यामुळे दुष्काळ, अवकाळी पाऊस, आमली पर्जन्य यांचे प्रमाण वाढत असून या सर्व समस्यांचा दुष्परिणाम शेती व्यवसायावर होताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत चालले असून आत्महत्या हा केवळ एकमेव मार्ग शेतकऱ्यांना दिसत आहे. परिणामतः भारतात व विशेषता महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. याबाबतीत सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष या समस्येवर उपाय शोधण्यासाठी एकत्र येऊन ठोस पावले उचलण्याऐवजी शेतकरी आत्महत्येचे राजकारण करताना दिसतात. या दोषापासून कोणताच राजकीय पक्ष दूर राहिलेला नसून शेतकऱ्यांचे प्रश्न मनापासून सोडविण्यासाठी एकत्र येण्याची भूमिका व राजकीय इच्छाशक्ती कोणत्याच राजकीय पक्षाकडे असल्याचे दिसत नाही. याउलट शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच भिजत ठेवून त्याचे राजकारण करताना सर्वच पक्ष आघाडीवर दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे दाहक वास्तव मांडून त्यावर शासनाकडून अपेक्षित असलेल्या उपाययोजनांची चर्चा केली आहे.*

महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या

महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून प्रत्येक वर्षी वाढणारी ही संख्या धक्कादाक व डोके सुन्न करणारी आहे. कधी दुष्काळ तरी कधी अत्यल्प पाऊस, कधी गारपीट, तर कधी अवकाळी पावसाच्या तडाख्यात राज्यातील शेतकऱ्यांना सातत्याने नुकसानीचा सामना करावा लागत असल्यामुळे हतबल झालेले शेतकरी आत्महत्यासारखा पर्याय निवडून स्वतःचं आयुष्य संपवतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आत्महत्या हा पर्याय नाही, पण शेतकऱ्यांना कोणी वालीच उरलेला नसल्यामुळे वैफल्यग्रस्त मानसिकतेमधून शेतकरी असे टोकाचे पाऊल उचलतांना दिसतात. म्हणून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी शासकीय स्तरावर सकारात्मक पाऊले उचलणे अपेक्षित आहे. मात्र त्याबाबतीत केंद्र सरकारसह सर्वच राज्यातील सरकारे उदासीन असल्यामुळे बी-बियाणे, खते-औषधे खरेदीपासून ते शेतमाल विक्रीपर्यंत शेतकऱ्यांचे शोषण आणि कुचंबना होत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या अनेक सरकारी योजना केवळ नावापुरत्या शेतकरी सन्मानाच्या राहतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सर्वच राजकीय पक्ष केवळ राजकारण करतांना दिसतात.

महाराष्ट्रात पहिली शेतकरी आत्महत्या विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण गावात झाली. चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी त्यांच्या कुटुंबियांसह 19 मार्च 1986 रोजी आत्महत्या केली होती. त्यानंतर अद्यापही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरुच आहे. सततच्या दुष्काळामुळे पीक हाती येईना, याप्रकारे शेतातील उत्पन्नच घटल्याने शेतीसाठी घेतलेले कर्ज त्यांना फेडता येईना. त्यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या करपे यांनी स्वतःसह, पत्नी आणि चार मुलांच्या जेवणात विष कालवून कुटुंबासहित आत्महत्या केली, जी महाराष्ट्रातील पहिली शेतकरी आत्महत्या होती.

राज्यातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढतच आहे. यामध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची स्थिती तर फारचच गंभीर आहे. या भागात पर्जन्यमान कमी असल्यामुळे दरवर्षी पाण्याची प्रचंड टंचाई असते व विदर्भात त्यामुळे येथील शेतकरी कायम त्रस्त असतात. तसेच काबाडकष्ट करुन म्हणावा तसा पैसा न मिळाल्यामुळे

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

येथील शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे विदर्भात अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्या आहे. मागील सहा महिन्यात पूर्व विदर्भातील 290 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून एकट्या जानेवारी महिन्यात तब्बल 22 शेतकऱ्यांनी गळफास घेतला. दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा, सावकारी पाश, आर्थिक विवंचना अशी अनेक कारणे या शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे असल्याचे दिसते.

महाराष्ट्रात मराठवाडा व विदर्भात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण मोठे असल्याचे दिसते. मराठवाड्यात मागील दोन महिन्यांची आकडेवारी पहिली असता जानेवारी व फेब्रुवारी 2021 या महिन्यात एकूण 127 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून जानेवारीत 57 तर फेब्रुवारी महिन्यात 70 शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले आयुष्य संपवले आहे. एकीकडे कोरोनाचे संकट असताना, सुरुवातीला अतिवृष्टी आणि त्यानंतर अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडल्यामुळे जानेवारी-फेब्रुवारी २०२१ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात 26, जालन्यात 11, परभणी जिल्ह्यात 10 हिंगोली जिल्ह्यात 4 नांदेड जिल्हयात 17 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी तर मनाला सुन्न करणारी असून बीडमध्ये जानेवारीत 14 तर फेब्रुवारी महिन्यात 16 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यात 13 आणि उस्मानाबाद जिल्ह्यात 16 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. शेतकरी आत्महत्येचे वरील आकडे हे केवळ जानेवारी व फेब्रुवारी 2021 या दोन महिन्यातील आहेत. 2020 मध्ये मराठवाड्यात झालेल्या एकूण आत्महत्यापैकी औरंगाबाद जिल्ह्यात 122, जालना 18, परभणी 64, हिंगोली 52, नांदेड 77, बीड 175, लातूर 68, उस्मानाबाद 127 अशा एकूण 773 शेतकऱ्यांनी दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून जीवन संपवले होते. 2020 या वर्षात मराठवाड्यात झालेल्या एकूण शेतकरी आत्महत्यांमध्ये सर्वाधिक 175 आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या होत्या.

**कर्जमाफीनंतर देखील शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात चिंताजनक वाढ**

शेतकरी आत्महत्यामागे कर्जबाजारीपणा हे कारण असल्याचे कित्येकदा पाहायला मिळत असल्यामुळे अनेकदा सरकारकडून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाते. तसेच शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी कर्जमाफी किंवा इतर अनेक योजना राबवत असल्याचा दावाही सरकारकडून केला जातो. तरीही 'शेतकरी आत्महत्या' थांबत नसल्याचे दिसत आहे. 2014 मध्ये महाराष्ट्रात सत्तेत आलेल्या भाजपने 2017-18 मध्ये राज्यात 34,020 कोटींची कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दीड लाखांपर्यंत सरसकट कर्जमाफ करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. तरीही 2019 मधील राज्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी धक्कादायक होती. एनसीबीआरने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार देशात 2019 मध्ये 10281 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसते. विशेष म्हणजे यात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक होता व एकट्या महाराष्ट्रात 3927 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. एकंदरीत कर्जमाफी करूनही शेतकरी आत्महत्या थांबत नसल्याचे यातून दिसते.

**शेतकऱ्यांसाठीच्या कागदोपत्री शासकीय योजना**

शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी सरकार विविध योजना जाहीर करत असतात. पण प्रत्यक्षात ह्या योजना कागदोपत्री ठरत असल्यामुळे त्या अपयशी ठरतात. उदा. फडणवीस सरकारच्या काळात सुरू केलेली 'बळीराजा चेतना योजना' होय. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी फडणवीस सरकारने 2015-16 मध्ये बळीराजा चेतना योजने अंतर्गत व्यथित शेतकऱ्यांना शोधणे, शेतकऱ्यांच्या मुला-मुलींसाठी सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे, त्यांना उत्तम आरोग्य सेवा पुरवणे आणि कर्जाचे पुनर्गठन करणे या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ही योजना मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात अपयशी ठरल्यामुळे 2019 मध्ये राज्यात सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने काही दिवसांपूर्वी ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला.

**निष्कर्ष व उपाययोजना**

भारतातील शेतकऱ्यांची दुर्दशा ही अधिकच गंभीर होत चाललेली असून शेती प्रश्नाकडे जेवढ्या गांभीर्याने लक्ष द्यायला पाहिजे तसे आज पर्यंत कोणत्याच शासनाने केल्याचे दिसत नाही. राजकीय पक्ष व त्यांचे अभिजन हे सत्तेवर



T.S.S's Smt. V. D. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.D.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021

असो की विरोधात त्यांचे हितसंबंध मात्र एक सारखेच असतात हे नक्की. अलीकडे तर नवीनच प्रवृत्ती जन्म घेऊ लागली आहे, ती म्हणजे शेतकरी नेते हे सुद्धा सरकारमध्ये सामील होऊन राजकीय अभिजनांमध्ये स्वतःला मिरवून घेऊ लागले आहेत. या प्रक्रियेमुळे व व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या शेतीसमस्येचे निदान होऊ शकलेले नाही. पर्यायाने हवालदिल झालेल्या शेतकर्यांसमोर संकटातून चिरमुक्ती मिळविण्यासाठी आत्महत्या करणे हा एकमेव पर्याय उरतो. निवडणुकीच्या राजकारणामध्ये शेतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी सत्ताधारी व विरोधी अशा सर्वच राजकीय पक्षाकडून शेतकऱ्यांना वेगवेगळी स्वप्ने दाखविली जातात. विरोधात असणारे राजकीय पक्ष तर शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी, समस्यांविषयी खूपच गंभीर (दुःखी) आहे, असे दाखविण्यासाठी विधीमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून शेतकऱ्यांचे तारणहार असल्याचा बेगडी आव आणतात. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कायमची उपाययोजना करण्यासाठी विधिमंडळात व संसदेत गंभीर चर्चाही होत नाही आणि शेतकरी हिताचा कोणताच निर्णय घेतला जात नाही. निर्णय होतो तो फक्त शेतकऱ्यांचे व शेतीचे प्रश्न अभ्यासून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी वेगवेगळे आयोग व समित्या स्थापन करण्याचा. नंतर मात्र नेमलेले आयोग व समित्या यांच्या अहवालास वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. ठोस उपाययोजना काहीच होत नाही. याप्रकारे नैसर्गिक दुष्टचक्र व राजकीय उदासीनता यामुळे हवालदिल व कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांसमोर जीवनयात्रा संपविली याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. आणखी कहर म्हणजे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर त्याच्या कुटुंबाच्या मनावरील वेदना कोणाला दिसू नये, तसेच मायबाप सरकार किती कृपाळू व दयाळू आहे हे दाखवण्यासाठी तुटपुंज्या आर्थिक मदतीची राजकीय मलमपट्टी करण्याचा फार्स केला जातो. परंतु प्रत्यक्षात गरज आहे ती शेती प्रश्नासंदर्भात कठोर शस्त्रक्रिया करून शेतकऱ्यांना लागलेला दारिद्र्याचा समूळ व कायमचा नष्ट करण्याची. त्यासाठी शासनाने पुढील उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे दिसते.

1. शेतीचा उत्पादन खर्च सरकारच्या वेगवेगळ्या धोरणांमळे वाढत असतांना शेती मालाचे भाव बेसुमार आयातीच्या धोरणांमुळे सातत्याने पडत आहे. परिणामी शेती व्यवसाय अधिकाधिक तोट्यात जात दिसत आहे. त्यामुळे जोपर्यंत शेतकऱ्यांच्या शेती मालाला स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे किफायदशीर हमीभावाची हमी मिळत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांच्या खेदजनक आत्महत्या थांबणार नाहीत.

2. शेतकरी विमा, पीक विमा अशा शेतकरी व शेतमालाला संरक्षण देणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजे.

3. अनेक बाजार समित्यांमध्ये हमीभावाप्रमाणे माल खरेदी होत नाही. जो व्यापारी शेतकऱ्यांचा माल हमीभावापेक्षा कमी पैशात खरेदी करेल त्याला शिक्षा व्हावी. या संदर्भात सरकारने कायदेशीर तरतूद करायला हवी.

4. शेतकऱ्याला शुन्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांच्या पिकाला हमी भावाबरोबरच शेती मालावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक प्रोसेसिंग यूनिट देखील शासनाने निर्माण करायला हवे. मराठवाडा व विदर्भात अशा प्रकारचे युनिट पाहायला मिळत नाही. म्हणून शेतकऱ्यांना कोणकोणते शेतीपूरक जोडव्यवसाय करता येतील, याचे नियमित प्रशिक्षण व त्यासाठी भांडवल उपलब्धता करून दिले पाहिजे.

5. शेतकऱ्यांना किफायतशीर भावात शेतीसाठी बी-बियाणे, खते, औषधे, यंत्रे व अवजारे यांचा माफक किमतीत व वेळेवर पुरवठा झाला पाहिजे.

6. शेतीच्या प्रभावी तंत्राचे मार्गदर्शन गावपातळीवर तज्ज्ञांद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे.

7. शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे.

शेवटी सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही तर त्यांच्या कर्जमुक्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न करायला पाहिजे, कारण कर्जमाफी हा काही शाश्वत उपाय नसुन तो शेतकऱ्यांना सलाईनवर जगवण्याचा प्रकार आहे. अन्यथा शेतकरी या दुष्ट चक्रव्युवहातुन बाहेरच पडणार नाही. अशा व आणखी बरेच काही गोष्टी तज्ञांच्या शिफारशी व मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी राबविल्या तर शेतकऱ्यांना दुष्टचक्रातून बाहेर काढून त्यांना सक्षम करता येईल. यामुळे शेतकरी आत्महत्या चा रोग समूळ नष्ट होईल.

**संदर्भ**


*1. बीबीसी न्यूज 19 जानेवारी 2019*

*2. महाराष्ट्र टाईम्स 20 जानेवारी 2020*




PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.K.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

*3. Manoranjitham, S. D., et al. "Risk factors for suicide in rural south India." The British Journal of Psychiatry 196.1 (2010): 26-30.*

*4. Radhakrishnan, Rajiv, and Chittaranjan Andrade. "Suicide: an Indian perspective." Indian journal of psychiatry 54.4 (2012): 304.*

*5. Stallones, Lorann, and Cheryl Beseler. "Pesticide poisoning and depressive symptoms among farm residents." Annals of epidemiology 12.6 (2002): 389-394.*

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.K.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

# भारतातील महिला सक्षमीकरणाचे विविध पैलू

**Peer-Reviewed**

Book Chapter

संपादक

डॉ. संगीता भांगडिया मालानी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा

आधार पब्लिकेशन, अमरावती

T.S.S's, Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's,Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

# भारतातील महिला सक्षमीकरणाचे विविध पैलू

संपादक

## डॉ. संगीता भांगडिया मालानी

प्रथम आवृत्ती - मार्च २०२१

आधार पब्लिकेशन
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळासमोर,
वि.म.वि. कॉलेजच्या मागे, अमरावती
Email- aadharpublication@gmial.com

**मुखपृष्ठ संकल्पना**
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती
अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स, अमरावती
**मुद्रक**
आधार पब्लिकेशन, अमरावती
किंमत रू. २००/-

**ISBN- 978-81-951551-8-7**

**सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.**

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# महिला सक्षमीकरणाची दशा व दिशा : ऐतिहासिक परामर्श

**प्रा. शरद बाबुराव सोनवणे**

सहाय्यक प्राध्यापक- राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.(महाराष्ट्र)

ई-मेल :- sharadpolsci@gmail.com भ्रमणध्वनी :- ९४०५१०८१३५

**सारांश (Abstract) :-**

इतिहासाचे सिंहावलोकन केले असता असे दिसते की, संपुर्ण जगामध्ये महिलांना पुरुषांच्या तुलनेत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत दुय्यम दर्जा देण्यात आलेला आहे. स्त्री-पुरुष यांच्यामध्ये लिंगाच्या आधारावर फरक करुन हजारो वर्षापासुन लिंगभाव करण्यात येऊन महिलांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून दूर ठेवण्यात आले व पुरुषांना सर्वत्र अधिकचे अधिकार बहाल करण्यात आले. यामुळे स्त्रियांच्या शोषणाची प्रक्रिया ही फार प्राचीन काळापासुन चालत आलेली आहे. आधुनिक काळात स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, स्त्रियांवरील हल्ले, अत्याचार व बलात्कार यासारख्या वाढत्या घटनांमुळे स्त्रियांच्या प्रतिष्ठेवर मोठ्या प्रमाणात आघात होत आहे. यापुढे जाऊन असे म्हणता येईल की, स्त्री प्रतिष्ठेला, स्त्री अस्मितेला क्रूरपणे गंभीर जखमी करणाऱ्या स्त्रीभ्रुणहत्येच्या घटना आधुनिक सभ्य संस्कृतीवर कलंक ठरत आहे. अशाप्रकारे लिंगभेदामुळे आणि लिंगभावामुळे स्त्रियांना पुरातन काळापासून दुय्यम दर्जाची वागणुक मिळत आलेली आहे. त्यामुळे स्त्रियांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा आणि आर्थिक स्वंयपुर्णता लाभलेली नाही. ह्या सर्व कारणपरंपरेची परिणीती स्त्रिया ह्या अबला होण्यामध्ये झालेली आहे. लिंगभेदामुळे आणि लिंगभावामुळे अबला झालेल्या स्त्रियांना सबला करण्यासाठी १९ व्या, २० व्या शतकात स्त्रीवादी चळवळी उदयास आलेल्या आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेल्या मानव अधिकाराच्या जाहिरनाम्यात महिला अधिकाराचा मानव अधिकार म्हणून समावेश केलेला आहे. परिणाम स्वरुप जगातील इतर देशांप्रमाणे भारतात देखील महिला सक्षमीकरणासाठी समाधानकारक राजकीय प्रयत्न सुरु झाले आहेत. याचाच आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**महिला सक्षमीकरणाचा अन्वयार्थ :-**

महिला सक्षमीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणारी प्रक्रिया आहे. लिंगभेदावर आधारित विषमतापूर्ण समाजव्यवस्था नष्ट करुन स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे व स्त्रियांना जिवनाच्या सर्व क्षेत्रात प्रतिनिधीत्व व प्रतिष्ठा मिळवून देणे हे या प्रक्रियेचे स्वरुप आहे. महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनण्यासाठी पोषक अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने संथपणे का होईना पण निश्चितपणे वाटचाल करीत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पूर्वीपासून स्त्रियांची उपेक्षा झालेली आहे. त्यामुळे स्त्रियांचा विकास झालेला नाही. 'लिंगभेद आणि शोषणावर आधारित सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलुन स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन देणारी व्यवस्था निर्माण करण्याशी महिला सबलीकरणाची प्रक्रिया संबंधित आहे.' [१] दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर महिला सक्षमीकरण हे स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य, राजकीय आणि आर्थिक धोरण निश्चितीमध्ये भागिदारी तसेच समान कामासाठी समान वेतन आणि कायद्याचे सरंक्षण व अधिकारांची प्राप्ती यांच्याशी संबंधित आहे. अर्थात महिला सक्षमीकरणाच्या राष्ट्रीय धोरणाचा उद्देश स्त्री-पुरुष विषमता नष्ट करणे, स्त्रियांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना स्वावलंबी व स्वयंपुर्ण करणे आणि देशाचे नीतिनिर्धारण व विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवणे हा आहे.

स्त्रीवादी चळवळीच्या असा आक्षेप आहे की, प्राचिन व वर्तमान समाजामध्ये स्त्रियांना लिंगभेदामुळे अन्याय सहन करावा लागलेला आहे व तो आजही चालूच आहे. ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रीवादी चळवळीच्या कालानुक्रमे पुढील मागण्या राहिलेल्या आहेत. १) स्त्रियांच्या अधिकारांना मानवी हक्कांच्या श्रेणीत ठेवण्यात यावे. २) संपुर्ण सामाजिक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता असावी आणि ३) स्त्रियांना पारंपारिक परावलंबित्वापासून मुक्त करण्यात येऊन स्त्रीत्वाची (womannood) नविन व्याख्या करण्यात यावी. [२]



T.S.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**महिला सक्षमीकरणाचा सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक परामर्श :-**

जीवशास्त्रीय दृष्ट्या स्त्री-पुरुषांमध्ये काही नैसर्गिक भेद आहेत. परंतू 'लिंग' (Gender) या संज्ञेशी अनेक सांस्कृतिक पैलू व अर्थ जोडले गेले आहेत. मूलतः नैसर्गिक भेदांमुळेच समाजात स्त्रीच्या दुय्यम दर्जाचे समर्थन केले जाते. जीवशास्त्रीय कारणांचा आधार घेवुन शोषणाच्या अनेक प्रकारांना तत्वज्ञानाचा मुलामा चढविला जातो. नैसर्गिक आणि अपरिवर्तनीय घटनांमुळे शोषण अटळ आहे असे सांगीतले जाते. जातीव्यवस्था तसेच वर्णव्यवस्था ही शोषणाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. दोन्ही व्यवस्थांमध्ये काही विशिष्ट वर्गीय, लोकांना जन्मतः श्रेष्ठ मानले गेले आहे. तसेच त्यांच्याजवळ विशेष बुध्दीमत्ता आणि कौशल्य आहे अशी धारणा समाजात जाणीवपुर्वक निर्माण करण्यात आली. अशाच जीवशास्त्रीय आधारावर शतकानुशतकांपासून स्त्रीवर्गाच्या होत असलेल्या शोषणाचे समर्थन केले जात आहे. त्यामुळे अशा जीवशास्त्रीय समर्थनाला आव्हान देणे गरजेचे आहे. [३] स्त्रिया हजारो वर्षापासून उपेक्षित व पराधीन जीवन जगत आहेत. रामायण, महाभारत यासारख्या प्राचीन धर्मग्रंथांमध्ये देखिल स्त्रियांच 'स्वत्व' कोठेही आढळत नाही. त्यांनी आपले 'स्वत्व' पुरुषांमध्येच शोधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. प्राचीन काळापासून पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रियांना केवळ बंधनात ठेवले. मनुस्मृतीमध्ये एकेठिकाणी स्त्रियांना पुजनिय मानुन म्हटले आहे की,

*'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।*
*यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्रफलाः क्रियाः*

म्हणजेच ज्या कुलामध्ये पिता, पति इत्यादिकांच्या द्वारा स्त्रियांची पूजा होत असते तेथील देवता प्रसन्न होतात व ज्या ठिकाणी त्यांची पूजा होत नाही, तेथील देवता रहात नसल्यामुळे यज्ञादि सर्व क्रिया निष्फळ होतात. [४] याच मनुस्मृतीमध्ये स्त्रियांना स्वातंत्र्य नाकारतांना पुढे असे म्हटलेले आहे की,

*'पिता रक्षती कौमारे भर्ता रक्षती यौवने।*
*रक्षन्ति स्थिविरे पुत्रा न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति*

याचा अर्थ विवाहाच्या पूर्वी पित्याने स्त्रियांचे रक्षण करावे. त्यानंतर पतीने त्यांचे संरक्षण करावे व पतीच्या मागे पुत्रांनी रक्षण करावे. सारांश कोणतीही स्त्री स्वातंत्र्यास योग्य नाही. [५] यावरुन असे स्पष्ट होते की, स्त्री ही अबला असून ती स्वातंत्र्य देण्यास पात्र नाही असे उघड-उघड प्रतिपादन मनुस्मृतीमध्ये करण्यात आलेले आहे. एकंदरीत हजारो वर्षापासुन स्त्रियांच्या वाटयाला असे दयनिय जीवन आलेले आहे. स्त्रियांची या दास्यत्वातुन मुक्तता करण्यासाठी १९ व्या, २० व्या शतकात जे प्रयत्न होऊ लागले त्यामागे अनेक चळवळी, सामाजिक संस्था, समाजसुधारक व स्त्री-मुक्ती विषयी कणव असणाऱ्या सर्वांचे महत्वपूर्ण योगदान लाभलेले आहे. त्यांच्यामुळेच सतीप्रथा, बालविवाह, विधवापुर्नविवाह, स्त्री-शिक्षण, महिला संघटना यासंबंधी कायदे संमत होत गेले आणि स्त्री मुक्ती व महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली.

१९ व्या शतकापर्यंत सामाजिक क्षेत्रात स्त्री ही बंदिस्त होती तिचे पूर्णत्व हे तिच्या पतीवर म्हणजेच पुरुषावर अवलंबुन होते. यामुळे पतीच्या निधनानंतर स्त्रियांना सती जावे लागत होते. स्त्रियांच्या जीवनावर क्रुर आघात करणारी ही अमानुष प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी व स्त्रियांना जीविताचे स्वातंत्र्य देण्यासाठी बंगालमधील थोर समाजसुधारक व भारतीय प्रबोधन चळवळीचे अग्रदूत राजा राममोहन रॉय यांनी आवाज उठवला. त्यांच्यात प्रयत्नामुळे इंग्रजांच्या राजवटीत 'सन १८१८ मध्ये बंगालचे प्रांतिक राज्यपाल विल्यम बेंटिक यांनी बंगाल प्रांतात सतीबंदी केली आणि भारताचे गव्हर्नर जनरल झाल्यावर ४ डिसेंबर १८२९ मध्ये त्यांनी सर्व भारतासाठी सतीबंदीचा कायदा केला.' [६] १९ व्या शतकात स्त्री-मुक्तीच्या दिशेने पडलेले हे पहिले पाऊल होते. स्त्रियांच्या दमनाची व दुय्यमत्वाची कारणीमांसा करतांना महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांचे अज्ञान व पुरुषांचा कावेबाजापणा यांमुळे स्त्रियां पराधीन बनल्याचे सांगितले, ते म्हणतात, "स्त्रियांची जात फार अबला असल्याने, या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करुन कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमतो घेतल्याशिवाय एकंदर पुरुषाने आपलेच घोडे पुढे दामटले. त्यास मागणी हक्क समजू नये या इराद्याने विद्या शिकण्यास प्रतिबंद केला. त्यामुळे एकंदर सर्वच स्त्रियांवर असा जुलमी प्रसंग येऊन ठेपला." [७] अविद्येमुळे जसे बहुजनाचे अहित झाले आहे. त्याचप्रमाणे अविद्येमुळेच स्त्रियांचे शोषण होत आहे याची जाणीव प्रथमतः महात्मा फुले यांना झाली. 'स्त्री ही



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College

माणुस आहे आणि तिला माणुसकीचा हक्क मिळालेच पाहिजे ही जाणीव करुन देण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. हा विचार ज्योतिबांच्या मनात पक्का रुजल्यावर अवघ्या २१ व्या वर्षी (१८४८ साली) त्यांनी मुलींची पहिली शाळा काढुन स्त्री-शिक्षणाच्या कार्यास सुरुवात केली.' [८] महात्मा फुलेंचे हे क्रांतीकारी पाऊल म्हणजे महिला सक्षमीकरणाची पायाभरणी होती. स्त्रियांच्या पराधिनतेला, दुय्यमत्वाला आणि परावलंबित्वाला कारणीभूत असणारा घटक म्हणजे स्त्रियांचे आर्थिकदृष्ट्या पुरुषावर असणारे अवलंबन हे होय. आर्थिकदृष्ट्या स्वंयपुर्ण किंवा स्वावलंबी नसल्यामुळे स्त्रियांना प्रतिष्ठा नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना झाल्यामुळे दि. २५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूरातील निरनिराळया नऊ संस्थातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या समारंभात भाषण करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले, 'आजच्या जगात संपत्तीच स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा मिळत नाही. तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही. त्यादृष्टीने हिंदु कोड बिलात मी तरतुदही केली होती पण ते बिल मंजुर होऊ शकले नाही. यापुढे आता येणारे बिल कोणत्या स्वरुपात येते व त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याची, हक्कांची काय तरतूद आहे याकडे महिला वर्गाने फार बारकाईने पाहिले पाहिजे. इतकेच नव्हे तर आपल्या हक्कांसाठी झगडण्यास त्यांनी आपले मनोदौर्बल्य टाकून कंबर कसून पुढे आले पाहिजे तरच त्यांची सुधारणा व प्रगती होईल.' [९] आर्थिक स्वयंपूर्णता किंवा आर्थिक अधिकार नसल्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा दिला जातो. त्यादृष्टीने स्त्रियांनी आर्थिक सक्षम होणे आवश्यक आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते म्हणून त्यांनी स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीमध्ये कायद्याने वारसा हक्क मिळाला पाहिजे असे मत मांडले. आंबेडकरांनी जेव्हा हे मत मांडले होते तेव्हा त्याचे महत्व शासकवर्गाच्या ध्यानात आले नाही. परंतु कालांतराने का होईना सरकारने महिला सक्षमीकरणासाठी कायद्याने स्त्रियांना वारसा हक्क दिला आहे. अशाप्रकारे भारतात महिला सक्षमीकरणाची सुरुवात समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण व स्त्रियांना वारसा हक्क यापासूनच खऱ्या अर्थाने झाली होती. यामुळेच आजच्या स्त्रिया सर्वच क्षेत्रात पुढे येतांना दिसत आहे. त्याचे श्रेय राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या युगपुरुषांना व सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्यासारख्या क्रांतीज्योतींना द्यावे लागेल.

**महिला सक्षमीकरणाचा ऐतिहासिक-राजकीय परामर्श :-**

प्राचिन ग्रीक तत्वज्ञ प्लेटो याने संरक्षक वर्गामध्ये (Guardian Class) स्त्री-पुरुषांना समान स्थान दिले होते. परंतू ॲरिस्टॉटलने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना हीन (Inferiority) लेखुन त्यांचा समावेश गुलामांमध्ये केला होता. २० व्या शतकात जन्मलेल्या जॉन स्टुअर्ट मिल या ब्रिटीश राजकीय विचारकाने आपल्या 'सब्जेक्शन ऑफ वीमेन' या महत्वपुर्ण ग्रंथामध्ये असे मत मांडले की, स्त्री-पुरुषांचे संबंध हे मैत्रीचे असावेत, वर्चस्ववादी स्वरुपाचे नसावेत. यासाठी त्याने विवाह कायद्यामध्ये सुधारण करण्याचे सुचविले. तसेच स्त्री-मताधिकाराचे समर्थन करुन हुशार स्त्रियांना समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे असे मत मांडले.[१०] आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला सक्षमीकरणाची सुरुवात पाश्चात्य देशांमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याच्या समर्थकांकडून लोकशाही शासन व्यवस्थेच्या मागणीच्या रुपाने झाली. याबरोबरच स्त्री-शिक्षणाच्या वाढत्या प्रमाणाने यामध्ये महत्वाचे योगदान दिले. परंतु महिला सक्षमीकरणाची जाणिव वैश्विक बनण्यास खरी सुरुवात झाली ती संयुक्त राष्ट्र संघाने जाहिर केलेल्या मानवी अधिकाराच्या घोषणापत्रामुळे "१० डिसेंबर, १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून घोषित करण्यात आलेल्या मानव अधिकाराच्या जाहिरनाम्यात महिला अधिकारांचा मानव अधिकार म्हणून समावेश करण्यात आला. या जाहिरनाम्याच्या सरनाम्यात स्त्री आणि पुरुषांसाठी समान अधिकार म्हणून मानव अधिकारांचा उल्लेख करण्यात आला आहे."[११] म्हणून मानव अधिकाराच्या जाहिरनाम्याकडे स्त्रीमुक्तीचा जाहिरनामा म्हणून देखिल पाहिले जाते. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आंतरराष्ट्रीय स्तरावर पडलेले हे पहिले राजकीय पाऊल होते. संयुक्त राष्ट्र संघटनेने ८ मार्च १९७५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला आणि सन १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून तर सन १९७५ ते १९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक घोषित करुन महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला चळवळीचे रुप दिले. स्त्रियांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून आंतरराष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. स्त्री प्रश्नांची चर्चा करण्यासाठी व त्यावर उपाय शोधण्यासाठी १९८५ मध्ये केनियाची राजधानी नैरोबी येथे प्रथम आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात



Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.K.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

आले. यानंतर अनेक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केल्या गेल्या. सन १९९५ साली बिजींग येथे झालेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'जगास महिलांच्या दृष्टीने पहा' अशी घोषणा देण्यात आली. एकंदरीत आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने जगातील अनेक देशांमध्ये महिला सक्षमीकरणासाठी जोरकस राजकीय किंवा शासकीय प्रयत्न सुरु असल्याचे दिसते.

महिला सक्षमीकरणासंदर्भात भारताच्या प्रयत्नांचा राजकीय आलेख मांडतांना असे म्हणता येईल की, भारतीय संविधानाने सुरुवातीपासुनच याबाबतीत पुढाकार घेतल्याचे दिसते. भारतीय संविधानांच्या तिसऱ्या भागात समतेचा मुलभूत हक्क सर्व नागरिकांना प्रदान करतांना कलम-१५ मध्ये अशी तरतुद करण्यात आलेली आहे की, "राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही."[१२] यांबरोबरच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानात अनेक मार्गदर्शक बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत. संविधानाच्या चौथ्या भागात राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांच्या अंतर्गत कलम-३९ (घ) मध्ये संविधानाने राज्याला असा निर्देश दिला आहे की, "पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे."[१३] भारताचे संविधान निर्माण करत असतांनाच घटनाकारांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार प्रदान केले होते. असे असले तरी महिला सबलीकरणासाठी शासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार कायदे केले. "सन १९७६ साली भारत सरकारने समान वेतन कायदा करुन स्त्री आणि पुरुष कामगारांना समान वेतन देण्याचे ठरविण्यात आले. तसेच मजुर मंत्रालयाअंतर्गत स्वतंत्र महिला विभागाची निर्मिती केली."[१४] "चौथ्या पंचवार्षिक योजनेनंतर महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेमध्ये उल्लेखणीय परिवर्तन झाले. महिला विकासाच्या मुद्दयाची जागा महिला सक्षमीकरणाने घेतली. ७३व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायतराज संस्था तसेच नागरी स्थानिक संस्था यांच्यामध्ये महिलांसाठी १/३ आरक्षणाची व्यवस्था या दिशेने सर्वाधिक क्रांतीकारी पाऊल होते."[१५] भारतात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची नोंद घेऊन त्यासंबंधीचा अहवाल शासनाला सादर करुन महिलांवर अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी भारत सरकारने ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. यामुळे वर्षानुवर्षे शोषित, पिडीत, वंचित व उपेक्षित स्त्रियांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर सन १९९४ साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली आहे. हे महिला आयोग दरवर्षी महिलांच्या दर्जाविषयी शासनाला अहवाल सादर करतात. या अहवालाच्या आधारावर केंद्र व राज्य सरकार महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी धोरणे ठरवत असतात किंवा योजना आखत असतात. "२१व्या शतकात पहिल्या दशकात त्रिस्तरीय पंचायत संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% जागा आरक्षित करुन बिहार सरकारने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने क्रांतीकारी सुरुवात केली."[१६] सन २००६ मध्ये यासंबंधीचा अध्यादेश काढण्यात आला होता. दि. १४ एप्रिल, २०११ रोजी महाराष्ट्र शासनाने पंचायत संस्थांमध्ये महिलांसाठी बिहारप्रमाणेच ५०% आरक्षण जाहिर करुन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिने महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. अशा रितीने राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने गतिमान वाटचाल सुरु असल्याचे आपणास दिसते.

**निष्कर्ष :-**

स्त्रियांना आज प्राप्त असलेले दुय्यम स्थान हे भेदभावपूर्ण, सामाजिक-सांस्कृतिक मुल्ये तसेच समाजात लिंगभेदाला प्रस्थापित करणाऱ्या संस्थामध्ये कायम आहे. या स्थितीचा जीवशास्त्रीय भेदांशी कोणताही संबंध नाही. स्त्री-पुरुष भेद आणि स्त्रियांचे दुय्यमत्व हे मानवनिर्मित आहे. म्हणून आजच्या काळात स्त्रियांना समान दर्जा, समान संधी, व समान वागणूक देण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरुषांची म्हणजेच पर्यायाने मानवनिर्मित संस्था, संघटनांची आहे. याच तर्कशास्त्राला अनुसरुन महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरु असलेल्या शासकीय व अशासकीय आणि राजकीय व बिगर राजकीय प्रयत्नांमुळे जगातील अनेक राष्ट्रांच्या प्रमुखपदी महिला विराजमान झाल्याचे व होत असल्याचे चित्र आज आपणास पहावयास मिळत आहे. भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्ष नेत्या, लोकसभा अध्यक्ष, मुख्यमंत्री, राजकीय पक्ष प्रमुख, पराराष्ट्र मंत्री, परराष्ट्र सचिव, राजदूत, कॅबिनेट मंत्री अशा अनेक महत्वाच्या राजकीय पदावर आणि इतर सर्वच क्षेत्रात महिला आरुढ झाल्याचे आपणास



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College

 ISBN-978-81-951551-8-7

दिसत आहे. म्हणजेच आज महिला समान संधी व समान स्वातंत्र्याचा हक्क उपभोगत आहेत. परंतु यावरुन महिलांचे शंभर टक्के सक्षमीकरण झाले आहे असा निष्कर्ष आपणास काढता येणार नाही. महिलांना संसदेत व राज्य विधिमंडळात आरक्षण देण्याचा प्रश्न तसाच भिजत पडलेला आहे. कारण त्यासंदर्भात सर्वच पुरुष वर्चस्ववादी राजकीय पक्षांनी विधेयक अनेकदा संसदेत मांडले जाऊनही ते संमत होऊ दिले नाही. यासाठी स्त्रियांनी संगठीतपणे मतदानाच्या माध्यमातुन आपली शक्ती दाखवून देऊन राजकीय हक्क प्राप्तीसाठी म्हणजेच कायदेमंडळात आरक्षण मिळवण्यासाठी संघर्षास तयार असले पाहिजे. कायदेमंडळात स्त्रियांना आरक्षण असणे हे महिला सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड/आधारशिला असणार आहे. कारण आज महिला सक्षमीकरणासाठी चाललेल्या प्रक्रियेमुळे महिलांच्या पूर्वीच्या स्थितीमध्ये आमुलाग्र बदल झालेला असला तरी स्त्री-शोषणाच्या पध्दती बदलत आहेत. स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली स्त्रीचे बाजारीकरण केले जात आहे. या उत्तर वसाहतवादी व उत्तर आधुनिक काळातील सत्याकडे डोळेझाक करता येणार नाही.

**संदर्भ (References) :-**


१) शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, मार्च २०१०, पान क्र. ३४४

२) ओम प्रकाश गाबा, राजनीति चिंतन की रुपरेखा, मयुर पेपरबैक्स, नौएडा, २००३, पान क्र. ४००

३) राजीव भार्गव, अशोक आचार्य (संपा.), अनुवादः हेमंत खानझोडे, राजकीय सिध्दांत परिचय, डोरलिंग किंडर्सले (इंडिया) प्रा. लि. लायसेंस ऑफ पिअर्सन एज्युकेशन इन साऊथ एशिया, २०११ पान क्र. १४९

४) श्रीसार्थ मनुस्मृती, अध्याय-२:५५, जोशी ब्रदर्स, पुणे पान क्र. ५३ व ५४

५) कित्ता, अध्याय-९:२, पान क्र. २३९

६) पद्मा पाटील व शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापुर, मार्च २००७, पान क्र. १०४

७) कित्ता, पान क्र. ११८

८) शांता रानडे, सावित्रीबाई जोतिबा फुले, लोकवाङ्मय गृह, मुंबई, मार्च २००९, पान क्र. ७

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८-भाग ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पान क्र. ३४०

१०) उपरोक्त-२, पान क्र. ४०१

११) उपरोक्त-१, पान क्र. ३५२

१२) भारताचे संविधान, महाराष्ट्र राज्य भाषा संचलनालयाद्वारे अनुवादीत आणि भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे, २००६, पान क्र. ५

१३) कित्ता, पान क्र. १७

१४) उपरोक्त-१, पान क्र. ३५५

१५) प्रतियोगिता दर्पण, आग्रा, नोव्हेंबर २००८, पान क्र. ६६९

१६) प्रतियोगिता दर्पण, आग्रा, मार्च २००९, पान क्र. १४२०




T.S.S's Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

PRINCIPAL
T.S.S's Smt V.U. Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# कोरोना महामारी आणि भारत




संपादक

डॉ.वाकणकर जी.बी.
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.टेंगसे एस.ए.

Express Publishing
An imprint of Notion Press

9 781638 734932

# कोरोना महामारी आणि भारत

- संपादक -

डॉ. वाकणकर जी.बी.
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.टेंगसे एस.ए.

T.S.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College, Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

NOTION PRESS

NOTION PRESS

India. Singapore. Malaysia.

Published by Notion Press 2021
Copyright © Wakankar G.B., Devraye S. M., Tengse S. A. 2021
All Rights Reserved.

ISBN 9781-6387-3493-2

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the author. No part of this book shall be used, reproduced in any manner whatsoever without written permission from the author, except in the case of brief quotations embodied in critical articles and reviews.

The Author of this book is solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The Content of this book shall not constitute or be construed or deemed to reflect the opinion or expression of the Publisher or Editor. Neither the Publisher nor Editor endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein and do not make any representations or warranties of any kind, express or implied, including but not limited to the implied warranties of merchantability, fitness for a particular purpose. The Publisher and Editor shall not be liable whatsoever for any errors, omissions, whether such errors or omissions result from negligence, accident, or any other cause or claims for loss or damages of any kind, including without limitation, indirect or consequential loss or damage arising out of use, inability to use, or about the reliability, accuracy or sufficiency of the information contained in this book.

# महाराष्ट्र शासनाची कोरोना विरुद्धची मोहीम : 'माझे कुटुंब ,माझी जबाबदारी 'ते' मी जबाबदार'

**शरद बाबुराव सोनवणे**
राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि.धुळे - ४२४३०४
ई-मेल - sharadpolsci@gmail.com

=====

**प्रस्तावना** संपूर्ण जगभरात कोरोना महामारीने थैमान घातले असतांना त्याचा प्रकोप भारतातही झाला .भारतात कोविड-19 विषाणूचा पहिला रुग्ण मार्च 2020 मध्ये महाराष्ट्र राज्यात सापडला आणि त्यानंतर संपूर्ण राज्यात व देशभरात कोरोना महामारीचा प्रसार सुरू झाला .महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद अशा महानगरांमध्ये तर कोरोना महामारीने कहरच केला .कारण महाराष्ट्रात अनेक राज्यातील लोक कामधंद्यासाठी येऊन राहत असल्यामुळेही महाराष्ट्र राज्यातील कोरोना आपत्ती अधिक गंभीर बनली .या संकटकाळात महाराष्ट्र शासन व प्रशासनाने प्रयत्नांची पराकाष्टा करून कोविड-19 विषाणूच्या प्रसारावर बहुतांशी नियंत्रण मिळवले .त्यासाठी शासनाची सर्व भिस्त ही प्रामुख्याने आरोग्य कर्मचारी व पोलिस प्रशासन यांच्यावर होती, त्यांनी आपले कर्तव्य चोखपणे बजावले .अशा संकटकाळात कोरोना महामारीचा प्रादुर्भाव नियंत्रणासाठी महाराष्ट्र

PRINCIPAL
T.S.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

शासन व प्रशासनाने जी प्रयत्नांची शर्थ केली, त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

**महाराष्ट्रातील कोरोना महामारीचे संकट**

महाराष्ट्रात कोरोनाचा पहिला रुग्ण 9 मार्च 2020 रोजी आढळून आला असला तरी राज्य शासनाने खबरदारीच्या उपाययोजना जानेवारी महिन्यापासूनच सुरू केल्या होत्या . त्यासाठी' एपिडेमिक ॲक्ट 'लागू करण्यात येऊन रुग्णांच्या हिताच्या दृष्टीने या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली .त्याचबरोबर मॉल, चित्रपटगृहे, शाळा, कार्यालये बंद करण्याबाबत टप्प्याटप्प्याने निर्णय घेण्यात आला .पुणे ,पिंपरी-चिंचवड ,नागपूर तसेच मुंबईतही कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर महाराष्ट्रात टाळेबंदी करण्याचा निर्णय झाला आणि मुंबईची जीवनवाहिनी अशी ओळख असलेली लोकल सेवाही बंद झाली . त्यानंतर राज्य शासनाने सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून विविध निर्णय घेतले .रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन खाजगी रुग्णालयातील 80 टक्के खाटा शासनाने ताब्यात घेतल्या [1].मुंबईमध्ये दहा ते पंधरा दिवसाच्या कालावधीत' जम्बो कोविड सेंटर्स 'उभारण्यात आली .तसेच मार्च ,एप्रिल ,मे 2020 याकाळात दररोज राज्याचे मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री ,गृहमंत्री व आरोग्यमंत्री हे सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांशी सतत संपर्कात राहून परिस्थितीचा आढावा घेत होते .तसेच जनतेशी दूरसंचार साधनांद्वारे संवाद साधून लोकशिक्षण करत होते.

दरम्यान केंद्र सरकारच्या नियामक टीमने 5 मे 2020 रोजी मुंबईचा दौरा करून नजीकच्या काळात या शहरांमध्ये हजारो मृत्यू होण्याची भीती व्यक्त केली होती .तसेच काहींनी मुंबई शहर लष्कराच्या ताब्यात सोपवण्याची मागणी केली होती .





परिणामी मुंबईत दहशतीचे वातावरण पसरले होते [2].परंतु या संकटावर महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महानगरपालिका यांनी अत्यंत संयमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने मात करत कोरोना नियंत्रणाचे' धारावी मॉडेल 'विकसित केले .तसेच कोरोना चाचणीसाठी राज्यातील प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यात येऊन राज्यात सर्वसामान्य जनतेसाठी कोरोना चाचणी व मास्क'च्या किंमती देखील माफक करण्यात आल्या .यामुळे महाराष्ट्र शासनाला कोरोना महामारीचा वाढता प्रसार नियंत्रित ठेवणे शक्य झाले.

**'माझे कुटुंब ,माझी जबाबदारी' मोहीम**

राज्यातील कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून' माझे कुटुंब ,माझी जबाबदारी 'योजना राबविण्यात आली .अतिशय सोप्या भाषेत प्रभावी संवादाच्या माध्यमातून ही संकल्पना समाजामध्ये रुजवून सर्वसामान्यांमध्ये आत्मविश्वास जगविण्याचे काम या माध्यमातून झाले .कोणत्याही वैद्यकीय चळवळीचा दीर्घकालीन लाभ मिळवून देण्यासाठी समाजाचा सहभाग अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे लोकांना त्यासंबंधीचे ज्ञान देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे गरजेचे असते . त्यादृष्टीने कोरोना विरुद्धच्या लढाईसाठी समाजात जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने' माझे कुटुंब ,माझी जबाबदारी 'ही योजना सुरु केली .या योजनेच्या माध्यमातून मास्कचा वापर, सुरक्षित अंतर आणि वारंवार हातधुणे या अतिशय मूलभूत दक्षतांची माहिती करून देत कोरोना विरुद्ध लोक लढा उभारला . या योजनेच्या द्वारे सरकारने समाजाला देखील त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली .त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी 'मी जबाबदारी घेतो, तुम्ही खबरदारी घ्या' असे आवाहन जनतेला केले होते .या योजनेच्या माध्यमातून खूप प्रभावीपणे आरोग्य संवाद

साधण्यात येऊन कोरोना विरुद्धच्या लढ्यात प्रत्येक कुटुंब हे एक घटक मानून राज्यात सामूहिक सामाजिक फौज उभारण्यात आली [3].त्यामुळे समाजात एक प्रकारची मानसिक प्रतिकारक शक्ती निर्माण झाली.

'माझे कुटुंब ,माझी जबाबदारी' ही योजना राज्यात दोन टप्प्यात राबविण्यात आली .पहिल्या टप्प्यात 99 टक्के म्हणजे 2.76 कोटी घरांपैकी 2.74 कोटी घरांचे सर्वेक्षण करण्यात आले . त्यामाध्यमातून 12.43 कोटींपैकी 11.92 कोटी लोकांशी थेट संपर्क साधण्यात आला .दुसऱ्या टप्प्यात 98 टक्के म्हणजे 2.70 कोटी घरांशी व 10.01 कोटी) 81 टक्के (व्यक्तींशी थेट संपर्क साधण्यात आला .या दोन्ही टप्प्यांत प्रशिक्षित पथकाद्वारे राज्यातील घराघरांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक व्यक्तीची ताप व ऑक्सिजन पातळी यांची तपासणी करून इतर आजारांची चौकशी करण्यात आली .तसेच त्यांना कोरोना प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण देण्यात आले .या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणानुसार 3.57 लाख ILI / SARI रुग्णांपैकी सुमारे 3.22 लाख रुग्णांची कोविड तपासणी करण्यात येऊन कोविड-19 संसर्ग झाल्याचे आढळून आलेल्या 51 हजार रुग्णांना वेळीच उपचार करण्यात आले .या योजनेच्या माध्यमातून आरोग्य पथकाने घरोघरी भेटी देऊन केलेल्या सर्वेक्षणांमध्ये मधुमेह असलेले 8.70 लाख, उच्चरक्तदाब असलेले 13 लाख, हृदयविकार असलेले 73 हजार, कर्करोग असलेले 17 हजार आणि इतर आजाराचे 1 लाख असे एकूण सुमारे 24 लाख कोमॉर्बीड रुग्ण आढळले .त्यांना आवश्यकतेनुसार पुढील उपचाराची सोय करण्यात आली .याप्रकारे महाराष्ट्र सरकारने राबविलेल्या कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे राज्यात कोरोना'ची दुसरी लाट आली नाही एकीकडे दिल्ली, राजस्थान आणि पाश्चिमात्य देशांत पुन्हा एकदा





कोरोना'चा उद्रेक झाला असतानाही महाराष्ट्रातील दैनंदिन रुग्ण संख्या कमी होत गेली [4].याप्रकारे दोन महिने राबविण्यात आलेल्या' माझे कुटुंब माझी जबाबदारी 'या अभियानांतर्गत 12 हजार आरोग्य कर्मचारी हे राज्यातील जनतेची आरोग्य तपासणी करण्यासाठी दोनदा 35 लाख कुटुंबापर्यंत पोहोचले .त्यानंतर 'नो मास्क नो एंट्री' हे अभियान सुरू करण्यात येऊन बसस्थानके , बसेस ,टॅक्सी ,दुकाने व कार्यालयांमध्ये हा संदेश असलेली भित्तीचित्रे आणि स्टिकर्स चिटकविण्यात आली .तसेच मास्क न घातलेल्या 5 लाखाहून अधिक लोकांना दंड आकारण्यात आला [5].

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीमेस सुरुवात आणि नवीन कोरोना विषाणूचे आव्हान**

देशभरात 16 जानेवारी 2021 पासून प्रथम कोरोना योध्यांसाठी लसीकरण सुरु झाले .याप्रकारे 2021 ,या वर्षाच्या सुरुवातीलाच कोरोनाविरुद्ध भारतात जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम सुरू झाली .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे संतु निरामया' या श्लोकाने या मोहिमेचा शुभारंभ झाला आणि दिल्लीत मनिष कुमार नामक स्वच्छता कर्मचाऱ्याला देशातील पहिला डोस देण्यात आला [6].याप्रकारे ,गेले दहा महिने सुरू असलेले कोरोनासाथी विरोधातील युद्ध जिंकून कोरोनाला हद्दपार करण्याची सुरुवात देशभरात 16 जानेवारी 2021 पासून झाली .लसीकरणाच्या पहिल्या दिवशी देशभरातील एक लाख सहा हजार कोरोना योद्ध्यांना लसीची पहिली मात्रा देण्यात आली [7].महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईतील बीकेसी येथील कोरोना लसीकरण केंद्राचे उद्घाटन होऊन राज्यातील लसीकरणाच्या मोहिमेचा श्रीगणेशा झाला .यावेळी बोलताना ते म्हणाले की ,कोरोनावरील लसीकरणाचा कार्यक्रम हे एक



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

क्रांतिकारक पाऊल असले तरी लस घेतल्यानंतर देखील सर्वांनी 'मास्कचा वापर', 'हात धुणे 'आणि' सुरक्षित अंतर 'या त्रिसूत्रीचा विसर पडू देता कामा नये [8].कारण अजूनही कोरोना विषाणू संपूर्णपणे नाहीसा झालेला नसून ब्रिटन व इतर पाश्चिमात्य देशांमध्ये कोरोनाचा नवीन उतपरिवर्तित विषाणू आला असून तो अधिक घातक असल्याचे पुरले मिळाले असल्याची माहिती ब्रिटनचे पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांनी दिली आहे .या नव्या कोविड- 19 विषाणूच्या प्रकाराचा संसर्ग झालेल्या भारतातील लोकांची संख्या 150 वर पोहोचली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे [9].म्हणून कोरोनावर जरी लस निघाली असली तरी नव्या कोरोना विषाणूचे आव्हान निर्माण झाले असल्याचे दिसते आणि या आपत्तीचे देखील निवारण करण्यासाठी नागरिकांनी शासन निर्देशांचे पालन गरजेचे आहे.

कोरोना लसीकरणाचा दुसरा टप्पा 1 मार्च 2021 पासून देशभर सुरु झाला .या टप्प्यात 60 पेक्षा अधिक वय असणाऱ्या आणि 45 वर्षांवरील गंभीर आजाराने ग्रस्त नागरिकांसाठी लसीकरण सुरु झाले .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत) एम्स (भारतीय औषध निर्माती कंपनी भारत बायोटेक'च्या' कोव्हॅक्सीन'चा पहिला डोस घेतला [10]. यानंतर सर्व वयोगटातील व सर्व थरातील नागरिकांसाठी सरकारी आणि खाजगी दवाखान्यांमध्ये कोरोना प्रतिबंधक लस दिली जाणार आहे .

**' मी जबाबदार 'मोहीम**

देशात व महाराष्ट्रात कोरोना प्रतिबंधक लसीकरण जरी सुरु झाले असले तरी राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ होत असल्याचे दिसत आहे .म्हणूनच राज्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी दि 22 .फेब्रुवारी 2021 रोजी मुख्यमंत्री उद्धव





ठाकरे यांनी सर्व जनतेस स्वयंशिस्तीचे आवाहन करून' मी जबाबदार 'या मोहिमेची घोषणा केली .तसेच' मास्कचा वापर', 'हात धुणे 'आणि' सुरक्षित अंतर 'या त्रिसूत्रीचा अवलंब यापुढेही करत राहण्याचे आवाहन त्यांनी जनतेस केले .नसता राज्यात पुन्हा एकदा' लॉक डाऊन'ची परिस्थिती ओढवू शकते असा इशाराही त्यांनी दिला' .मास्क घाला ,शिस्त पाळा आणि लॉकडाऊन टाळा 'अशी सूचना देखील त्यांनी यावेळी दिली [11].मात्र लॉक डाऊन हा काही पर्याय नाही ,हे जरी खरे असले तरी जनतेने स्वयंशिस्त बाळगून शासन व प्रशासनास सहकार्य करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे .कारण कोरोना लसीकरण सुरु होईपर्यंत मुंबईत दिवसाला 300 ते 400 पर्यंत रुग्णसंख्या कमी झाली होती ,पण काही दिवसांपासून 800 ते 900 रुग्ण दिवसाला आढळत असून राज्यातही दररोज हजार ते दीड हजार रुग्ण वाढत आहेत ,ही बाब गंभीर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले . गेल्या वर्षी कोरोना सुरु झाला तेंव्हापेक्षा आता आरोग्य व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली आहे .तरीपण कोरोनाचा वाढत चाललेला संसर्ग थांबविला नाही तर आरोग्य यंत्रणेवर कमालीचा येईल .म्हणून तिच्यावरचा ताण वाढू नये याची प्रत्येकाने खबरदारी घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली [12].

**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर झालेला कोविड'चा परिणाम**

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन 1 मार्च 2021 रोजी सुरु झाले , त्याचा प्रारंभ राज्यपालांच्या अभिभाषणाने झाला .त्यात कोरोनाच्या संसर्गाचे संकट आणि त्यासाठी कराव्या लागलेल्या उपाययोजनांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडला असल्याचे नमूद केले .त्यामुळे राज्याच्या महसुलात 35 टक्क्यांची घट होणार असल्याची आकडेवारी महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह

क्रांतिकारक पाऊल असले तरी लस घेतल्यानंतर देखील सर्वांनी 'मास्कचा वापर', 'हात धुणे 'आणि' सुरक्षित अंतर 'या त्रिसूत्रीचा विसर पडू देता कामा नये [8].कारण अजूनही कोरोना विषाणू संपूर्णपणे नाहीसा झालेला नसून ब्रिटन व इतर पाश्चिमात्य देशांमध्ये कोरोनाचा नवीन उतपरिवर्तित विषाणू आला असून तो अधिक घातक असल्याचे पुरले मिळाले असल्याची माहिती ब्रिटनचे पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांनी दिली आहे .या नव्या कोविड- 19 विषाणूच्या प्रकाराचा संसर्ग झालेल्या भारतातील लोकांची संख्या 150 वर पोहोचली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे [9].म्हणून कोरोनावर जरी लस निघाली असली तरी नव्या कोरोना विषाणूचे आव्हान निर्माण झाले असल्याचे दिसते आणि या आपत्तीचे देखील निवारण करण्यासाठी नागरिकांनी शासन निर्देशांचे पालन गरजेचे आहे.

कोरोना लसीकरणाचा दुसरा टप्पा 1 मार्च 2021 पासून देशभर सुरु झाला .या टप्प्यात 60 पेक्षा अधिक वय असणाऱ्या आणि 45 वर्षांवरील गंभीर आजाराने ग्रस्त नागरिकांसाठी लसीकरण सुरु झाले .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत) एम्स (भारतीय औषध निर्माती कंपनी भारत बायोटेक'च्या' कोव्हॅक्सीन'चा पहिला डोस घेतला [10]. यानंतर सर्व वयोगटातील व सर्व थरातील नागरिकांसाठी सरकारी आणि खाजगी दवाखान्यांमध्ये कोरोना प्रतिबंधक लस दिली जाणार आहे .

**' मी जबाबदार 'मोहीम**

देशात व महाराष्ट्रात कोरोना प्रतिबंधक लसीकरण जरी सुरु झाले असले तरी राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ होत असल्याचे दिसत आहे .म्हणूनच राज्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी दि 22 .फेब्रुवारी 2021 रोजी मुख्यमंत्री उद्धव





ठाकरे यांनी सर्व जनतेस स्वयंशिस्तीचे आवाहन करून' मी जबाबदार 'या मोहिमेची घोषणा केली .तसेच' मास्कचा वापर', 'हात धुणे 'आणि' सुरक्षित अंतर 'या त्रिसूत्रीचा अवलंब यापुढेही करत राहण्याचे आवाहन त्यांनी जनतेस केले .नसता राज्यात पुन्हा एकदा' लॉक डाऊन'ची परिस्थिती ओढवू शकते असा इशाराही त्यांनी दिला' .मास्क घाला ,शिस्त पाळा आणि लॉकडाऊन टाळा 'अशी सूचना देखील त्यांनी यावेळी दिली [11].मात्र लॉक डाऊन हा काही पर्याय नाही ,हे जरी खरे असले तरी जनतेने स्वयंशिस्त बाळगून शासन व प्रशासनास सहकार्य करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे .कारण कोरोना लसीकरण सुरु होईपर्यंत मुंबईत दिवसाला 300 ते 400 पर्यंत रुग्णसंख्या कमी झाली होती ,पण काही दिवसांपासून 800 ते 900 रुग्ण दिवसाला आढळत असून राज्यातही दररोज हजार ते दीड हजार रुग्ण वाढत आहेत ,ही बाब गंभीर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले . गेल्या वर्षी कोरोना सुरु झाला तेंव्हापेक्षा आता आरोग्य व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली आहे .तरीपण कोरोनाचा वाढत चाललेला संसर्ग थांबविला नाही तर आरोग्य यंत्रणेवर कमालीचा येईल .म्हणून तिच्यावरचा ताण वाढू नये याची प्रत्येकाने खबरदारी घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली [12].

**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर झालेला कोविड'चा परिणाम**

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन 1 मार्च 2021 रोजी सुरु झाले , त्याचा प्रारंभ राज्यपालांच्या अभिभाषणाने झाला .त्यात कोरोनाच्या संसर्गाचे संकट आणि त्यासाठी कराव्या लागलेल्या उपाययोजनांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडला असल्याचे नमूद केले .त्यामुळे राज्याच्या महसुलात 35 टक्क्यांची घट होणार असल्याची आकडेवारी महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह

कोश्यारी यांनी आपल्या अर्थसंकल्पीय अभिभाषणात सादर केली . अर्थसंकल्पीय अंदाजात महसुली जमा 3 लाख 47 हजार 456 कोटी अपेक्षित असतांना प्रत्यक्ष वसुलीचे आकडे 35 टक्क्यांनी कमी आहेत [13].म्हणून राज्याच्या अर्थव्यवस्थेवर अधिक ताण पडून ती कोलमडू नये यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे गरजेचे आहे .

**निष्कर्ष**

महाराष्ट्र शासन व प्रशासनाने राज्यातील कोरोना महामारीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अहोरात्र काम केलेले आहे . राज्याचे मुख्यमंत्री ,आरोग्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी सातत्याने कोरोनासंबंधी माहिती देऊन जनतेस आरोग्य शिक्षणही दिले . त्याचाही सकारात्मक परिणाम जनतेत दिसून आला .कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली आपत्ती हाताळत असताना महाराष्ट्र शासनाने केलेले नियोजन व राबविलेल्या उपाययोजना प्रभावशाली होत्या .त्यामुळेच या कोरोना आपत्तीला हाताबाहेर न जाऊ देता व्यवस्थितपणे हाताळत ती नियंत्रित ठेवणे शक्य झाले . याचे संपूर्ण श्रेय महाराष्ट्राचे शासन व प्रशासन यांचेच आहे. 16 जानेवारी 2021 पासून संपूर्ण देशासह राज्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिम सुरु झाली .तरीदेखील नव्याने आलेल्या नवीन कोरोना विषाणूचा सामना करण्यासाठी राज्यातील जनतेने जागृक राहणे गरजेचे असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी जनतेला कोरोना विषाणूविरूद्धच्या युद्धात जिंकण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेची त्रिसूत्री सांगितली असून त्याचे अनुपालन करणे राज्यातील जनतेचे आद्य कर्तव्य आहे .त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जनतेसाठी" मी जबाबदार "हा जो स्वयंशिस्तीचा मूलमंत्र दिला आहे ,त्याचे अनुपालन प्रत्यकाने केले





तरच कोरोना विषाणूचे समूळ उच्चाटन करणे आपणास शक्य होईल.

**संदर्भसूची**


1. मार्मिक ,दि .26 डिसेंबर 2020, पृ.19
2. बुलेटिन ऑफ युनिक अकॅडमी ,जानेवारी 2019, पृ.9
3. मार्मिक ,दि .26 डिसेंबर 2020, पृ.15
4. कित्ता ,पृ21.
5. बुलेटिन ऑफ युनिक अकॅडमी ,जानेवारी 2019, पृ.9
6. दिव्य मराठी ,दि .17 जानेवारी 2021, पृ.1
7. लोकसत्ता ,दि.17 जानेवारी 2021, पृ.1
8. सकाळ ,दि.17 जानेवारी 2021, पृ.1
9. लोकसत्ता, दि .24 जानेवारी 2021, पृ.4
10. दिव्य मराठी ,दि2 . मार्च 2021, पृ.1
11. सकाळ ,दि22. फेब्रुवारी 2021, पृ.1
12. कित्ता ,पृ8.
13. सकाळ ,दि2 . मार्च 2021, पृ.1


Dr.B.S. Desale Science College Dist.Dhule T.S.S.

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule



*"Let others go where they will. We will follow the path of Jyotiba. We may or may not take Marx with us but we will certainly not abandon Jyotiba's philosophy."*

*- B.R. Ambedkar*

ISBN : 93-91220-02-0

अपूर्व

apoorvjamadhade@rediffmail.com

₹:250/-

r.S.S's.Smt.V.U.Patil Arts

ISBN : 978-93-91220-02-0

AN ISBN BOOK

# The Great Revolutionary Mahatma Phule



EDITED BY

DR. PRASHANT BOBADE

# The Great Revolutionary Mahatma Phule

**Edited by**
**Dr. Prashant Bobade**

**Apoorv Publishing House,**
**Aurangabad**

T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

**The Great Revolutionary Mahatma Phule**

**ISBN- 978-93-91220-02-0**

**Editor**
**Dr. Prashant Bobade**
Mob. 9970518505
E-mail : pbobade150@gmail.com

© **Dr. Prashant Bobade**

**Publisher**
Bharat Jamdhade
Apoorv Publishing House
Aurangabad (M.S.)
Mob. 9049597047

**Cover page**
**Rajendra Mali, Shlok Design, Aurangabad**

**Printing**
**Rudrayani Offset, MIDC, Aurangabad**

**Type Setting**
**Yajuwenra Wankar, Aurangabad**

**First Ediction**
**July 2021**

**Price**
**250/-**

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

Note : The views expressed by the authors in their research articles in this book ar[e] their own. The Editor/Publisher, Editorial/Peer Review Committee is n[ot] responsible for them. Author is responsible all grammatical error.

२४

# महात्मा जोतिबा फुले यांचे बहुजन शिक्षण विषयक विचार व कार्य


**शरद बाबुराव सोनवणे**

सहाय्यक प्राध्यापक - राज्यशास्त्र विभाग,

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व

कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे


प्रस्तावना

महात्मा जोतीबा फुले यांचे शिक्षण पुणे शहरातील स्कॉटीश मिशनरीच्या शाळेत झाले. या शाळेत ते इतर जातीच्या मुलांमध्ये मिसळत असत व त्यात अस्पृश्य जातींची मुलेही होती. तरुण वयातच त्यांनी अहमदनगर येथे अमेरिकन मिशनऱ्यांनी चालवलेल्या मुलींच्या शाळेला भेट दिली तेव्हा ते अतिशय प्रभावित झाले आणि त्यापासून प्रेरित होऊन त्यांनी कनिष्ठ जातींच्या मुलींकरता शाळा काढण्याची प्रेरणा घेतली. त्यावेळी फुले 20 वर्षांचे होते. 1848 मध्ये त्यांनी पुणे येथे बुधवार पेठेत भिडे वाड्यात मुलीसाठी पहिली शाळा सुरु केली. त्याचप्रमाणे 1851 मध्ये अस्पश्यांसाठीही पहिली शाळा पुण्यातच नाना पेठेत सुर केली. त्यानंतर त्यांनी अनेक शाळा सुरु करून त्या शाळांतून महार, मांग आदी अस्पृश्य जातीच्या मुलांना प्रवेश दिला. पाश्चात्य शिक्षण व त्यातील बुद्धीप्रामाण्यवादी दृष्टिकोन यांची कनिष्ठ जातींना त्यांच्या दास्यातून मुक्त करण्यात महत्वाची भूमिका राहणार असून त्याद्वारे ब्राह्मणी सतेचे वर्चस्वही कमी होईल, असे ज्योतीबा फुले यांचे मत होते. महात्मा फुले यांच्या समग्र शिक्षणविषयक विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न या शोध निबंधात केलेला आहे.

ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या काळातील भारतातील शिक्षणाची स्थिती

महात्मा फुले पूर्वकाळात आधुनिक दृष्टीने ज्याला आपण शिक्षण म्हणतो ते अस्तित्वातच नव्हते. कारण ज्याठिकाणी दरिद्र वर्गीयांची बरीच वस्ती असायची तेथे




PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

काही शास्त्री खाजगी पाठशाळा चालवायचे व त्यामध्ये संस्कृत, व्याकरण, न्याय, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, वेदांत, अलंकार आणि धर्मशास्त्र हे विषय शिकविले जायचे. समाजातील कनिष्ठ वर्गीय लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकारच नाही, अशा प्रकारची एक समजूत सर्वत्र होती. त्यामुळे त्यांना शिक्षण देण्याचा विचारच उच्चवर्णीयांनी कधी केला नाही. काही खेड्यांमध्ये मुलांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा असायच्या, पण तेथे पंतोजीकडून केवळ व्यापाऱ्यांच्या आणि श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देण्यात येई. त्याचा उद्देश कारकुनी, कुलकरण किंवा सावकारी चालविता यावी एवढाच मर्यादित होता.

भारतात इंग्रजांचे राज्य सुरुहोण्यापूर्वी प्रजेला शिक्षण देणे हे सरकारी कर्तव्य आहे असे मानले जात नसे. महात्मा फुले पूर्व महाराष्ट्रात राजसत्ता आणि धर्मसत्ता ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे केवळ ब्राह्मणांनाच धार्मिक ग्रंथ वाचण्याचा आणि पठण करण्याचा अधिकार होता.कनिष्ठ वर्गातील ज्या ज्या व्यक्तींनी पवित्र ग्रंथ वटणाचा प्रयत्न केला त्या त्या व्यक्तींना महाराष्ट्रात जबरदस्त शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. तथापि नवीन राज्यकर्त्यांना बरोबर नवीन निर्बंध आले आणि ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या 1813 मधील सनदेनुसार असे ठरले की, भारतातील जमा झालेल्या महसुलाची पैकी प्रत्येक वर्षी कमीत कमी एक लक्ष रुपयांची रक्कम वेगळी काढून तिचा उपयोग भारतातील प्राचीन वांगमया चे पुनरुज्जीवन व वृद्धी करण्यासाठी तसेच पंडित यांना उत्तेजन देण्यासाठी आणि भारतीय जनतेमध्ये शास्त्रांचे ज्ञान सुरू करून त्यांच्या प्रचारासाठी करण्यात यावा. याप्रकारे अठराशे तेराच्या सनदेनुसार भारतात प्रथमच शिक्षण सर्वांसाठी खुले झाले.

**महात्मा जोतीबा फुले यांचे आधुनिक शिक्षणासंबंधी विचार**

महात्मा जोतीबा फुले यांच्या सार्वजनिक कार्यात शिक्षणप्रसाराला अग्रस्थान असल्यामुळे त्यांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवातच पुणे येथे मुलींसाठी शाळा सुरु करण्यापासून झाली होती. दलित, बहुजन व शूद्रातिशूद्र वर्गामध्ये शिक्षणाची ज्योत पेटविण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. शुद्रातिशुद्रांच्या दास्याचे कारण अज्ञान हेच असल्याचे त्यांचे म्हणणे होते म्हणूनच महात्मा फुले म्हणतात,



विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातून साक्षरता विशेषता इंग्रजी शिक्षण हे ब्राम्हणी वर्चस्वाच्या बहुतांशी निर्मूलनासाठी अत्यंत उपयुक्त होते. शिक्षण हे प्रचलित सामाजिक व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याचे सशक्त माध्यम तर होतेच त्याबरोबरच स्त्री-पुरुष विषमता निर्मूलनाचे देखील ते एक साधन होते. या दृष्टीने महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचा अतिशय तळमळीने पाठपुरावा करणारे पहिले राष्ट्रवादी युगपुरुष होते आणि म्हणूनच त्यांच्या पुढाकाराने पुण्यात 1948 मध्ये मुलींसाठी पहिल्या शाळेची स्थापना झाली.

आधुनिक शिक्षणामुळे ब्राह्मणेतर समाज ब्राह्मणांच्या पातळीवर येऊ शकेल असे त्यांना वाटत होते. इंग्रज सरकार भारतात उच्च शिक्षणाला अधिक महत्व देऊन त्यासाठी पारेमाप पैसा खर्च करत होते. ब्रिटिश सरकारचे हे शिक्षणविषयक धोरण ज्योतीबांना मान्य नव्हते. कारण याचा फायदा केवळ मुठभर उच्चजातीय व उच्चवर्णीय लोकांनाच होत असून खेड्यापाड्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनता अजून प्राथमिक शिक्षणापासूनच असल्यामुळे इंग्रज सरकारने त्यांच्या शिक्षणविषयक धोरणाचा फेरविचार करून कष्टकरी, बहुजन व शूद्रातिशूद्र समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी प्राथमिक शिक्षणावर अधिकाधिक पैसा खर्च करावा, अशी ज्योतीबांची मागणी होती. इंग्रज सरकारने 1882 मध्ये शिक्षणविषयक सुधारणा करण्यासाठी शिक्षण आयोग (हंटर कमिशन) नेमला होता. ज्योतिबा फुलेनी त्या शिक्षण आयोगासमोर साक्ष देऊन सरकारने प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करून शेतकरी व इतर मागासवर्गातील मुलांना शिकविण्यासाठी ब्राह्मण शिक्षक न नेमता शेतकरी वगैरे मागास वर्गातीलच प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करण्याची मागणी केली होती. तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये ब्राम्हणांऐवजी इतर बहुजन लोक नेमावेत अशी आग्रहाची मागणी केली होती. कारण त्यांना बहुजनांच्या समस्या अडचणी व दुःखाची जाणीव असल्यामुळे ते अधिक पोटतिडकीने कनिष्ट वर्गाच्या शिक्षणासाठी राबून घेतील असे महात्मा फुले यांचे मत होते.

महात्मा फुलेंनी शिक्षण आयोगाला प्राथमिक शिक्षणासंबंधी सुचवलेल्या सुधारणा

1. सध्या थोड्याफार ज्या सरकारी शाळा चालू आहेत त्यामधून देण्यात येणारे प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील रोजगार प्राप्तीच्या दृष्टिने कुचकामी स्वरुपाचे असल्यामुळे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत आणि अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याची पुनर्रचना करावी.
2. प्राथमिक शाळांमधील शिक्षक हे प्रशिक्षित आणि शेतकारी वर्गापैकीच असले पाहिजेत.
3. शिक्षकी व्यवसायासाठी अधिक पात्र माणसे मिळवीत म्हणून शिक्षकांना वेतन वाढवून देऊन त्यांच्या परीस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात यावी.
4. अभ्यासक्रमात इतर सर्वसाधारण विषयांबरोबरच 'शेती आणि आरोग्य' यांच्या मुलभूत ज्ञानाचा समावेश केला पाहिजे.
5. प्राथमिक शाळांची कमीत कमी दर तीन महिन्यास एकदा 'दुय्यम शाळा तपासणीस' मार्फत तपासणी केली पाहिजे.
6. प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करावी.
7. ज्या एतदेशीय शाळांनी पात्रताधारक शिक्षक नेमले असतील किंवा नेमतील अशा शाळांना सढळ हाताने अनुदान द्यावे.
8. विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे व शिष्यवृत्या, तसेच विशिष्ट अटी (पात्रता) पूर्ण करणाऱ्या शिक्षकांसाठी जास्त वेतनवाढ देण्यात यावी. शाळा चांगल्या कार्यक्षम बनविण्यासाठी या गोष्टी हितकारक ठरतील.

शेतकरी आणि इतर तत्सम वर्गांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेता आलेला नाही. या बहुजनवर्गातील थोडीफार मुलांना प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रवेश दिला जातो परंतु दारिद्र्य व इतर कारणांमुळे ती मुले या शाळांमध्ये टिकून राहात नाहीत. घर काम किंवा दुसरा एखादा काम धंदा मिळाल्यावर स्वाभाविकपणे ही मुले शाळा सोडून देतात. बहुजनांची मुले शाळेत टिकून राहण्याच्या दृष्टीने विशेष प्रलोभने नसल्यामुळे खेड्यांमधल्या शेतकरी वर्गाची बहुतेक मुले शाळेपासून दूरच राहतात. एक तर हा शेतकरीवर्ग पराकोटीच्या दारिद्र्याने गांजलेल्या असतो आणि दुसरे म्हणजे त्याला आपली मुले गुरेढोरे राखण्यासाठी व शेती कामासाठी हवी असतात. म्हणून शाळांच्या



संख्येत वाढ करण्याबरोबरच या वर्गाला आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे आणि त्यांच्यामध्ये विविधतेची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून शिष्यवृत्ती यांची व सहामाही किंवा वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवणे गरजेचे आहे. काही ठराविक मर्यादेपर्यंत किमान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे असे महात्मा फुले यांचे मत होते.

महात्मा फुलेंनी शिक्षण आयोगाला उच्च शिक्षणासंबंधी सुचवलेल्या सुधारणा

ब्रिटिश सरकार उच्च शिक्षणासाठी सढळ हाताने तरतूत करत असल्यामुळे बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे सरकारचे दुर्लक्ष होत चालले आहे अशी हाकाटी सर्व देशभरात चालू आहे, असे फुलेंचे मत होते. उच्च शिक्षणामुळे ज्या वर्गाचे कल्याण झाले त्यांना ही हाकाटी मान्य नसली तरीही त्यातली सत्यता नाकारता येणार नाही, असे असले तरीही सध्या उच्च शिक्षणासाठी सरकार करत असलेली मदत बंद करावी असे कोणताही देशप्रेमी म्हणणार नाही. त्याची एव्हढीच इच्छा असणार की, शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या शेतकरी, बहुजन, शूद्रातिशूद्र वर्ग जो पूर्णपणे दुर्लक्षिला जात आहे, त्यालादेखील अन्य प्रगत वर्गाप्रमाणेच प्रगतीची संधी ही शिक्षण व सरकारी नोकऱ्यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने आस्था दाखविली पाहिजे.

हिंदुस्थानातील शिक्षण अद्यापिही बाल्यावस्थेत असल्यामुळे उच्च शिक्षणासाठी दिले जाणारे अनुदान थांबवल्यास ते एकंदरीत शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल. उच्च आणि श्रीमंत वर्गाच्या बाबतीत होणारी सरकारी मदत क्रमाक्रमाने कमी करता येणे शक्य आहे. परंतु ज्या मध्यम आणि कनिष्ठ वर्गांमध्ये शिक्षणाची म्हणावी तशी प्रगती झालेली नाही, अशा वर्गाचे अनुदान थांबविल्यास ती एक आपत्ती ठरेल. तसेच कोणत्याही पातळीवरची शिक्षण व्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे इस्ट होणार नाही. शाळा महाविद्यालयावरील सरकारी नियंत्रण काढून घेतल्यामुळे त्याचे पर्यवसान शिक्षणाची वाढ खुंटण्याची होईल. शाळा या सरकारीच असाव्यात असे मत महात्मा फुले यांनी शिक्षण आयोगासमोर नोंदविले होते. कारण भरपूर वेतन देऊन ठेवलेल्या प्रशिक्षित पात्रताधारक शिक्षकांवर आणि प्राध्यापकांवर शाळांचे श्रेष्ठत्व अवलंबून असते आणि असे वेतन देणे खाजगी शाळांना परवडणारे नाही, म्हणून शाळा ह्या सरकारीच असाव्या असे फुले यांचे ठाम मत होते.



PRINCIPAL
I.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

शासकीय महाविद्यालयांमधून दिले जाणारे शिक्षण सर्वसाधारण जीवनाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी व व्यावहारिक नसल्यामुळे हे शिक्षण फक्त कारकून आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर निर्माण करणारे आहे. म्हणून विद्यार्थ्यांना भावी आयुष्य स्वतंत्रपणे व स्वतःच्या पायावर जगता यावे यासाठी आवश्यक असणारे व्यवहारिक व व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षणात अंतर्भूत असावे. सरकारी नोकरीच्या पाठीमागे लागण्यापेक्षा ची गरज न पडता सर्वांना उपयुक्त व्यवसाय आणि रोजगार धंदे उभारता येतील असे व्यवसायाभिमुख शिक्षण असले पाहिजे. तसेच सर्वांना सहजपणे उपलब्ध होईल अशा प्रकारची उच्च शिक्षणाची व्यवस्था असायला हवी. विद्यापीठांनी खाजगी अभ्यासाला (बहिस्थ प्रवेश) मान्यता दिल्यास एकंदर देशाचे कल्याण होईल व उच्च शिक्षणासाठी सरकारी खजिन्यावर पडणारा बोजा मोठ्या प्रमाणात कमी होईल.

सध्या सरकारी शाळांमधून सरकारी शिष्यवृत्या देण्याची जी पद्धत आहे ती सदोष आहे. ही पद्धत अशा रीतीने व्यवहारात आणली पाहिजे की ज्या माध्यमातून ज्या वर्गात मुलांची शिक्षणात प्रगती झालेली नाही अशा वर्गातील काही मुलांना त्या शिष्यवृत्ती द्यायला हव्यात. स्पर्धेच्या तत्वांवर शिष्यवृत्या देण्याची पद्धत कितीही योग्य व न्यायपूर्ण वाटत असली तरीही त्यामुळे इतर दुय्यम व कनिष्ठ वर्गातील ज्ञान प्रसाराला हातभार लागणार नाही. शिक्षण आयोगासमोर साक्ष देताना महात्मा फुले यांनी अखेरीस आयोगाला अशी विनंती केली की, स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर करण्यासाठीच्या उपाययोजनांना सरकारने परवानगी द्यावी. एकंदरीत ब्रिटिश सरकारचा भारतीय शिक्षणा संबंधीचा लॉर्ड मेकॉले कृत पाझर सिद्धांत महात्मा फुले यांना मान्य नव्हता. त्यांना बहुजन शूद्रातिशूद्र यांचे शिक्षण उच्चजातीय व उच्चवर्णीय समाजाच्या भरवशावर सोडवणे मान्य नव्हते. म्हणून या सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणासाठी सरकारने पुढाकार घ्यावा अशी विनंती महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला केली होती.

समारोप

महात्मा फुले यांच्या समग्र शैक्षणिक विचाराचा परामर्श घेतल्यानंतर त्यांचे बहुजन शिक्षणाविषयीचे विचार आजही प्रासंगिक असल्याचे दिसते शिक्षण हे केवळ कारकून निर्माण करणारे असू नये तर त्यास कौशल्याची जोड



मिळाली पाहिजे हा महात्मा फुले यांचा विचार आजच्या काळात खूपच आवश्यक बनला आहे.. तसेच मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण ही सरकारची जबाबदारी असली पाहिजे आणि उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी देखील सरकारने उचलली पाहिजे, तरच पात्रताधारक शिक्षकांना चांगले वेतन देऊन उत्तम ज्ञान बहुजन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येईल हे फुले यांचे मत आजच्या शिक्षणविषयक समस्यांवरील उपाय असल्याचे दिसते. म्हणून एकंदरीत महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचाराचा केंद्रबिंदू हा उपेक्षित, शोषित, वंचित घटक असून त्यांच्या शिक्षणाची अबाळ होऊ नये यासाठी त्यांनी कंपनी सरकारकडे आग्रह धरला होता. त्यांचे प्राथमिक व उच्च शिक्षणविषयक विचार वर्तमान स्वदेशी शासनाला देखील तितकेच मार्गदर्शक असल्याचे दिसते.

संदर्भ


1. हरी नरके (संपा.), 'महात्मा फुले साहित्य आणि चळवळ', डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजश्री शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2018
2. हरी नरके (संपा.), 'महात्मा फुले गौरव ग्रंथ, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती', महाराष्ट्र शासन, मुंबई, 2018
3. हरी नरके (संपा.), 'महात्मा फुले समग्र वाड.मय', महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2013
4. हरी नरके (संपा.), 'आम्ही पाहिलेले फुले, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1993
5. नागनाथ कोत्तापल्ले (संकलन), 'महात्मा ज्योतिबा फुले यांचे 101 मौलिक विचार', लोकवाड.मय' गृह, मुंबई, 2010, पृ.77
6. विद्युत चक्रवर्ती आणि राजेंद्र कुमार पांडे, (अनु. चित्रा लेले), 'आधुनिक भारतीय राजकीय विचार : संहिता आणि संदर्भ', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2013, पृ.17


◎◎◎

PRINCIPAL
I.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule




## डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड

एम. ए., नेट, पीएच.डी. (राज्यशास्त्र)
सहयोगी प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला


- पदवी व पदव्युत्तर वर्गाकरिता १८ वर्षे अध्यापनाचा अनुभव
- पीएच.डी. मार्गदर्शक (राज्यशास्त्र) : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
- सदस्य : राज्यशास्त्र अभ्यास मंडळ–संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नल्समध्ये १०० पेक्षा जास्त शोधनिबंधाचे प्रकाशन
- विविध वर्तमानपत्रामध्ये ५० पेक्षा जास्त लेख प्रकाशित
- कॉन्फरन्स प्रोसीडींगमध्ये १५ शोधनिबंध प्रकाशित
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रे व परिषदांमध्ये १२० पेक्षा जास्त शोधनिबंधाचे सादरीकरण

**प्रकाशित पुस्तके :**

१) भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वशासन : सत्र-१
२) भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वशासन : सत्र-१
३) निवडक संविधाने आणि आंतरराष्ट्रीय संबंध


**Aadhar Publications**
New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604
Email - aadharpublication@gmail.com, M.9595560278


# गांधीवादी विचार
## GANDHIAN THOUGHTS



संपादक
डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड


PRINCIPAL
S.S.S. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science

# गांधीवादी विचार

संपादक

प्रा.डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड

सहयोगी प्राध्यापक,

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,

सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला.

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

Late Dr.B.S. Desale Science ... Sakri Dist.Dhule

गांधीवादी विचार

- प्रा.डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड
- प्रथम आवृत्ती – २ ऑक्टोंबर
- प्रकाशक

  आधार पब्लिकेशन, अमरावती.

  हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

  वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

  मो. ९५९५५६०२७८

  email- aadharpublication@gmail.com
- मुखपृष्ठ संकल्पना

  विलास पवार

  सरिता ग्राफिक्स, अमरावती
- अक्षरजुळवणी

  सरिता ग्राफिक्स,

  कठोरा रोड, अमरावती
- Price : 200/-

ISBN-978-93-91305-39-0

PRINCIPAL
T.S.S.'s Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri Tal.Sakri Dist.Dhule

# महात्मा गांधींचे अस्पृश्योद्धार संबंधी विचार व कार्य

डॉ. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग,श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – ४२४३०४भ्र.ध्वनी – ९४०५१०८१३५
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

## प्रस्तावना

महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक सर्वसमावेशक स्वरूपाचे नेतृत्व होते. त्यांनी भारताचा स्वातंत्र्यलढा उभा करत असताना त्यामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नात ते बऱ्याच अंशी यशस्वी देखील झाले. यासोबतच वेगवेगळ्या रचनात्मक कार्यक्रमांची आखणी करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले. याच ध्येयधोरणाला अनुसरून गांधीजींनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी देखील लढा उभारला होता. मात्र तो लढा हिंदू समाजाच्या मनपरिवर्तन घडवून आणण्यावर आधारित होता. त्यामुळे अस्पृश्यता निवारणाची कार्यपद्धती व दृष्टिकोन याबाबत महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये परस्पर वैचारिक संघर्षही झाला होता. प्रस्तुत शोध निबंधात अस्पृश्यता निर्मूलनासाठी महात्मा गांधीजींच्या योगदानाची मीमांसा केली आहे.

## महात्मा गांधींचा अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन

गांधीजींनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभापासूनच हिंदू समाजात अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला होता. अस्पृश्यतेस विरोध हे आश्रम जीवनाचे एक अभिन्न अंग होते.[1] गांधीजी नेहमी असे म्हणत असायचे की, जोपर्यंत हिंदुस्तानी लोक अस्पृश्यतेचा नायनाट करणार नाहीत तोपर्यंत ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवण्याची पात्रता त्यांच्यात येणारच नाही. 1920 व 1930 च्या दशकात त्यांनी सातत्याने या भूमिकेचा पाठपुरावा केला. त्याचा पुरावा म्हणजे त्यांनी 1921 मध्ये अहमदाबाद येथे शोषित वर्गाच्या परिषदेत केलेल्या भाषणातून दिसून येतो. या भाषणात ते म्हणतात की, "हिंदुत्वाने अस्पृश्यतेला मान्यता देऊन घोर पाप केले आहे. अस्पृश्यतेने आपली फार मोठी अवनती केली आहे. साम्राज्यातही आपण वाळीत टाकले गेलो आहोत. दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका, कॅनडा येथे तर हिंदूंच्या बरोबरच मुसलमानांनाही वाळीत टाकले जात आहे. मुसलमानांनीसुद्धा हा रोग आपल्याकडून घेतला आहे आणि हे सर्व अस्पृश्यतेतून उद्भवले आहे. जोपर्यंत हिंदू आपल्याच बांधवांपैकी असणाऱ्या या घटकांना (अस्पृश्यांना) स्पर्श करणे पाप आहे असे मानुन अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा एक अविभाज्य घटक आहे असे मानत राहतील; तोपर्यंत स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे.[2]



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science Colle
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule



भारतातील अस्पृश्यतेच्या अमानवी दुर्गुणास नष्ट करण्यासाठी महात्मा गांधींनी नैतिक बळाचे अनुसरण केले. यास एक अध्यात्मिक अर्थ प्रदान करताना ते म्हणतात की, 'सर्व माणसे ही ईश्वराची लेकरे असल्यामुळे कोणीही अस्पृश्य म्हणून जन्माला येऊ शकत नाही. म्हणून कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जन्मापासूनच अस्पृश्य ठरविणे चुकीचे आहे.' तसेच ते प्रत्येक हिंदू धर्मीय व्यक्तीला उद्देशून असे म्हणतात की, 'अस्पृश्यता हा केवळ हिंदू धर्माचा घटक नाही तर तो हिंदू धर्माला लागलेला एक रोग आहे. म्हणून अस्पृश्यतेचे निर्मुलन करणे हे प्रत्येक हिंदूचे आद्य कर्तव्य आहे.' याप्रकारे गांधीजी अस्पृश्यता निर्मूलनासाठी आग्रही होते. तसेच ते अस्पृश्यांना हिंदू धर्माचे अविभाज्य अंग मानत होते आणि प्रत्येक हिंदूंना असे नैतिक आवाहन करत होते की, अस्पृश्यतेचे उच्चाटन करणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे. मात्र यासाठी वर्णव्यवस्थेवर टीका करणे, त्यामध्ये बदल करणे, अथवा वर्णव्यवस्थाच नष्ट करण्याची गरज त्यांना वाटत नव्हती. याउलट डॉ.आंबेडकर वर्णव्यवस्थेलाच अस्पृश्यतेचे खरे मूळ मानत होते. त्यामुळे मुळावर आघात केल्याशिवाय अस्पृश्यता निर्मूलन होऊ शकत नाही असे डॉ.आंबेडकरांचे मत होते.[3] याप्रकारे गांधी व आंबेडकर यांच्या विचारात वरवर पाहता परस्पर विरोध दिसत असला तरी अस्पृश्यतेचे उच्चाटन करणे हे दोघांचेही ध्येय होते. फक्त दोघांचे ध्येयप्राप्तीचे मार्ग हे वेगवेगळे होते.



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

### जातीय निवाडा आणि गांधीजींचे उपोषण

ब्रिटीशांनी भारतात 'फोडा आणि राज्य करा' हे धोरण सुरुवातीपासूनच अवलंबिले होते. ऑगस्ट 1932 च्या जातीय निवाड्याने ब्रिटिश शासनाची 'फोडा व झोडा' ही नीती पुन्हा एकदा स्पष्ट झाली होती. या निवाड्याने प्रत्येक अल्पसंख्यांक गटाला कायदेमंडळात राखीव जागा देण्यात येऊन त्यांची निवड वेगवेगळ्या विभक्त मतदार संघातून होणार होती. तसेच पददलितांना म्हणजेच आजच्या अनुसूचित जातींना अल्पसंख्यांक ठरवून त्यांनाही विभक्त मतदारसंघ देण्यात आले होते. यामागे त्यांना हिंदूंपासून वेगळे करण्याची ब्रिटिशांची रणनीती दडलेली होती.[4] जातीय निवाड्याच्या प्रसिद्धीनंतर येरवड्याच्या तुरुंगात असलेल्या महात्मा गांधींनी ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांना 18 ऑगस्ट 1932 रोजी पत्र लिहून जातीय निवाड्यात दुरुस्ती करण्याची विनंती केली. तसेच त्यांची ही मागणी मान्य न झाल्यास 20 सप्टेंबर पासून आमरण उपोषण सुरु करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला. 8 सप्टेंबर 1932 रोजी पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी गांधीजींच्या पत्रास पाठविलेल्या उत्तरांत आपल्या योजनेचे समर्थन करून दुरुस्तीस असमर्थता दाखवली. त्यानंतर गांधींनी 9 सप्टेंबर रोजी आणखी एक शेवटचे पत्र पंतप्रधान मॅक्डोनाल्ड यांना लिहिले. परंतु त्याचाही त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. गांधीजींच्या उपोषणाची मुदत जवळ येत असल्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांना मध्ये अस्वस्थता पसरली होती. ए.व्ही.ठक्कर, पंडित मदन मोहन मालवीय, श्रीमती पेरिंग कॅप्टन, बॅ.जयकर व तेजबहादुर सप्रू आदी नेत्यांनी पुढाकार घेऊन मूळ योजनेत बदल करण्यासाठी व गांधीजींचे प्राण वाचवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत तडजोडीची बोलणी सुरू केली. दि.19 सप्टेंबर 1932 रोजी पंडित मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्वेषाने म्हणाले होते की, "हिंदुस्थानातील थोर अशी व्यक्ती महात्मा गांधी यांचा जीव मला प्रिय असला तरी त्यापेक्षा 6-7 कोटी अस्पृश्यांचे हक्क मला कमी प्यारे नाहीत. त्यांचे रक्षण मला प्रथम केले पाहिजे, या हक्कांचे रक्षण करण्याच्या प्रयत्नात तुम्ही सर्वांनी मिळून मला शेजारच्या रस्त्यावरील खांबावर फाशी दिले तरी त्याची मला पर्वा नाही. अस्पृश्यांचा प्रश्न मुख्य प्रधानाच्या निर्णयाने माझ्यापुरता सुटला आहे.





पण तो जर तुम्हाला किंवा महात्मा गांधींना मान्य नसेल तर आपल्याला काय केले पाहिजे हे प्रथम महात्मा गांधींनी सांगितले पाहिजे. त्याचा नीट विचार करून त्यात अस्पृश्यांचे हित कितपत साधते हे मी पाहीन व त्यानंतर आपल्याला उत्तर देईन."[5] अशाप्रकारे डॉ. आंबेडकर दलितांच्या हिताचा दुसरा ठोस पर्याय मिळाल्याशिवाय मूळ योजनेत बदल करायला तयार नव्हते. त्यामुळे ठरल्याप्रमाणे गांधीजींनी 20 सप्टेंबर 1932 रोजी आमरण उपोषणाला सुरुवात केल्यावर गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला. त्यामुळे काँग्रेस पुढारी व डॉ. आंबेडकर यांच्या तातडीने चर्चा व बैठका सुरू झाल्या. 'दलितांना स्वतंत्र मतदारसंघ मिळत असताना देखील त्यांनी ते सोडून द्यावे असे जर गांधीजींचे मत असेल तर दलितांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून अधिक राखीव जागा त्यांना मिळाल्या पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी गांधीजींची भेट घेऊन मांडली'. 23 व 24 सप्टेंबर रोजी पंडित मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उभय पक्षांमध्ये प्रदिर्घ चर्चा झाली. ब्रिटिश सरकारने जाहीर केलेल्या जातीय निवाड्यात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाद्वारे 78 जागा मिळाल्या होत्या. आता त्या बदल्यात डॉ. आंबेडकरांनी 197 राखीव जागांची मागणी केली होती. मात्र अस्पृश्यांसाठी 148 जागा राखीव ठेवण्याचा निर्णय अखेरीस दोन्ही पक्षांनी मान्य केला. .अशाप्रकारे "महात्मा गांधींचे प्राण वाचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कराराचा जो मसुदा 24 सप्टेंबर 1932 रोजी पुण्यात मान्य केला, त्याला 25 सप्टेंबर रोजी मुंबईत भरलेल्या पुढाऱ्यांच्या परिषदेत मंजुरी देण्यात आली. सर्वांच्या संमतीने झालेला हा 'पुणे करार' लक्षात घेऊन पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांनी आधीचा 'जातीय निवाडा' बदलावा अशी विनंती करणारी तार त्यांना पाठवण्यात आली. महात्मा गांधीजींच्या वतीने दिनबंधू सी.एफ. अँन्ड्रयूज यांनी पंतप्रधानांशी संपर्क साधल्यानंतर आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुणे करारास मान्यता देण्यात आल्यावर 26 सप्टेंबरला गांधीजींनी उपोषण थांबवले."[6] यावरून असे दिसते की, गांधीजी कोणत्याही परिस्थितीत दलितांना हिंदूंपासून तुटू देऊ इच्छित नव्हते.

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil ... &
Late Dr.B.S.Desale Science College

महात्मा गांधींचा अस्पृश्यता निवारण कार्यक्र

पुणे करारानंतर गांधीजींनी अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे सविनय कायदेभंगाची चळवळ थंडावली होती. दुसऱ्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी प्रचलित 'अस्पृश्य वर्ग' हे नामाभिधान बदलून इतर कोणतीही संयुक्तिक परिभाषिक शब्दयोजना करण्याची सूचना केली होती. त्या आवाहनानुसार गांधीजींनी अस्पृश्यांसाठी 'हरिजन' हे नवे नामाभिधान केले. तसेच त्यांनी आपल्या 'यंग इंडिया' या साप्ताहिकाचे रूपांतर 'हरिजन' मध्ये केले. 11 फेब्रुवारी 1933 रोजी 'हरिजन' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. याआधीच गांधीजींनी 1932 मध्ये 'हरिजन सेवक संघाची' स्थापना केली होती. 8 मे 1933 रोजी गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नासंबंधी आत्मशुद्धीसाठी 21 दिवसाचे उपोषण सुरू केले. 8 मे या दिवशीच गांधीजींची तुरुंगातून बिनशर्त मुक्तता करण्यात आली. यानंतर गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ एक महिना स्थगित करणार असल्याचे जाहीर केले. तर दुसऱ्या दिवशी म्हणजे 9 मे रोजी गांधीजींच्या परवानगीने कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष श्री.अणे यांनी आंदोलन सहा आठवड्यापर्यंत तहकूब करण्यात येत असल्याचे जाहीर केले. गांधीजींची कारावासातून सुटका करताना, त्यांनी पुण्याच्या हद्दीतच राहण्याची अट सरकारने घातली होती. मात्र सुटकेनंतर गांधीजी ही अट मोडणार हे लक्षात येताच इंग्रज सरकारने गांधीजींना 1 ऑगस्ट रोजी पुन्हा अटक करून एक वर्षाची शिक्षा सुनावली व येरवड्याच्या तुरुंगात ठेवले. तुरुंगातूनच अस्पृश्योद्धाराचे काम सुरू करण्याचा गांधीजींचा विचार होता, परंतु सरकारने त्यास मान्यता न दिल्यामुळे गांधीजींनी 16 ऑगस्ट पासून बेमुदत आमरण उपोषण सुरु केले. उपोषणामुळे गांधीजींची प्रकृती बिघडल्यावर 13 ऑगस्ट 1933 रोजी सरकारने त्यांची सुटका केली. सुटकेनंतर गांधीजी सप्टेंबर 1933 मध्ये वर्ध्याच्या सत्याग्रह आश्रमात राहावयास गेले. कारण स्वराज्य मिळाल्याशिवाय साबरमती आश्रमात परतणार नाही अशी शपथ त्यांनी 1930 मध्ये घेतली होती. "यानंतर 7 नोव्हेंबर 1933 पासून 2 ऑगस्ट 1934 या कालावधीत गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नांसंबंधी लोकजागृती करण्यासाठी 'हरिजन यात्रा' काढली. सतत दहा महिने भारतभर बारा हजार पाचशे मैल प्रवास करून हरिजनांच्या





कल्याणासाठी जवळजवळ आठ लाख रुपये जमा केले."[7] गांधीजींच्या या अदभूत यात्रेच्या प्रभावाविषयी सविस्तर माहिती घेणे आणि अत्यंत बारकाईने समजून घेण्यासाठी केवळ भारतातीलच नव्हे तर लंडनमध्ये स्थित नितीनिर्माते देखील अत्यंत सतर्क होते. अलीकडेच प्रकाशित झालेल्या ब्रिटिशकाळातील गोपनीय दस्तावेजातील माहितीच्या आधारे गांधीजींच्या अस्पृश्यता निर्मूलनासंबंधीच्या या अनोख्या प्रयत्नांच्या अनेक अज्ञात पैलूंवर प्रकाश पडला आहे. या दस्तऐवजामधून कटाक्षाने असे लक्षात येते की, महात्मा गांधीजींनी अत्यंत विषम परिस्थितीमध्ये 'हरिजन यात्रा' काढली होती."[8] "गांधीजींच्या या अस्पृश्यता निवारण यात्रेबाबत सनातन विचाराच्या लोकांबरोबरच अनेक कॉंग्रेसमधील लोक देखील नाराज होते. त्यामुळे दिवसेंदिवस आपण कॉंग्रेसमधील आपल्या मित्रांपासून देखील बाजूला पडत असल्याची जाणीव महात्मा गांधी यांना होऊ लागली होती. महात्मा गांधी यांच्यावर नाराज असणाऱ्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये बहुतांशी पूर्णतः राजकारणी स्वभावाचे लोक होते. त्यांच्या मते, राजकारणाचा अर्थ ब्रिटिश सरकार नष्ट करून त्याजागी स्वदेशी सरकार स्थापन करणे एवढ्यापुरता मर्यादित होता. मात्र इतर राजकारणी आणि महात्मा गांधी यांच्या विचारात खूप मोठा फरक होता. कारण गांधीजी देशासाठी स्वातंत्र्य संघर्षबरोबरच रचनात्मक कार्य देखील करू इच्छित होते."[9]

1930 च्या दशकात सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य समाजाचे प्रवक्ते म्हणून नावारूपाला आले होते. ते गांधींवर आणि कॉंग्रेसवरही अत्यंत कडवट टीका करायचे. त्याला प्रतिक्रिया म्हणून गांधींनी अस्पृश्यता निर्मूलनाचे त्यांचे काम आणखी जोरात सुरू केले होते. याठिकाणी आणखी आणखी एक नोंद घेणे गरजेचे आहे ती म्हणजे, गांधीजींच्या अस्पृश्यता निर्मूलन प्रयत्नांच्या विरोधात फक्त आंबेडकरवादीच उभे होते असे नव्हे, (त्यांना गांधी फार सावकाश चालत आहेत असे वाटायचे) तर सनातनी हिंदू सुद्धा त्यांच्याविरुद्ध होते. (त्यांना वाटायचे की, अस्पृश्यता ही परमेश्वराची देणगी असल्यामुळे त्याला गांधींनी आव्हान देण्याचे काहीच कारण नाही.)[10]

19 जून 1934 मध्ये गांधीजी पुणे शहरात आले आणि त्यांचे अनेक कार्यक्रम झाले. परंतु 25 जून रोजी संध्याकाळी ज्या वाहनातून ते जाणार होते त्या



I.S.S's Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
I.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

वाहनावर काही अज्ञात हल्लेखोरांनी बॉम्ब फेकला. सुदैवाने गांधीजी बॉम्बे फेकलेल्या कारमध्ये नव्हते तर त्या पाठीमागच्या कार मध्ये होते. बॉम्ब हल्ल्यामुळे त्या कारमध्ये असलेले दोन कॉन्स्टेबल आणि एक म्युनिसिपल कर्मचारी सहित सात व्यक्ती जखमी झाल्या. या घटनेच्या या संदर्भात बोलताना गांधी यांनी म्हटले होते की, "मला असे वाटत नाही की आज संध्याकाळी झालेल्या या विकृत घटनेपाठीमागे कोणत्याही समजूतदार सनातनी व्यक्तीचे प्रोत्साहन असेल असे मला वाटत नाही. तरीदेखील मी सनातनी मित्रांना असे सांगू इच्छितो की त्यांनी त्यांच्या बाजूने बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या व्यक्तींच्या भाषेवर अंकुश ठेवावा. आजच्या दुःखद घटनेमुळे निश्चितपणे हरिजन अभियानाच्या उद्दिष्टांमध्ये आणखी वाढ झाली आहे."[11]

**समारोप**

'अस्पृश्यता हा हिंदूधर्माला लागलेला कलंक आहे' असे महात्मा गांधी यांचे मत होते. म्हणून अस्पृश्यता निर्मूलनासाठी हिंदू धर्मियांनीच पुढाकार घेतला पाहिजे, कारण ते त्यांचे कर्तव्य आहे, असे गांधीजींचे ठाम मत होते. मात्र अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवत असताना सवर्णांना दुखावणे हे स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने हिताचे होणार नाही, हे गांधीजींना ठाऊक असल्यामुळे त्यांनी हा प्रश्न सवर्णांच्या मनपरिवर्तनाच्या सहाय्याने सोडवण्यावर अधिक भर दिल्याचे दिसते. मात्र महात्मा गांधींची ही भूमिका डॉ. आंबेडकर यांना मान्य नव्हती. पण गांधीजींनी एकीकडे डॉ. आंबेडकर, दुसरीकडे सनातन मनोवृत्तीचे सवर्ण तर तिसऱ्या बाजुला अनेक काँग्रेस पुढाऱ्यांचा रोष पत्करून, आपल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याला जराही मागे घेतले नाही. यावरून असे म्हणता येते की, अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी गांधीजींची तळमळ ही प्रामाणिक होती आणि ते त्यांनी त्यांचे विचार आणि कृतीतून सिद्ध केले आहे.

**संदर्भ :**


1. तिवारी, विवेकानंद (2019), 'अछूत मतवाद के सच गांधी और अंबेडकर', नई दिल्ली : सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन, पृ.257
2. गुहा, रामचंद्र (अनुवाद- शारदा साठे) (2018), 'आधुनिक भारताचे विचारस्तंभ', पुणे : रोहन प्रकाशन, पृ.189







3. मल, पूरण (2016), 'गांधी अम्बेडकर एवं दलितोद्धार आन्दोलन', खण्ड-1, जयपुर : अविष्कार पब्लिशर्स डिस्ट्रीब्युटर्स, पृ.85
4. तळवळकर, गोविंद (1997), 'सत्तांतर – 1947', खंड-1, मुंबई : मौज प्रकाशन गृह, पृ.158,159
5. निकम, श्रीराम (2008), 'गांधी - आंबेडकर : अस्पृश्यमुक्ती संघर्ष', मुंबई : लोकवाड.मय गृह, पृ.125,126
6. फडके, य.दि. (1993), 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड - 4, पुणे : श्रीविद्या प्रकाशन, पृ.108,109
7. उपरोक्त, तिवारी, विवेकानंद (2019), 'अछूत मतवाद के सच गांधी और अंबेडकर', पृ.300
8. कित्ता, पृ.301
9. कित्ता, पृ.295
10. उपरोक्त, गुहा, रामचंद्र (अनुवाद- शारदा साठे) (2018), 'आधुनिक भारताचे विचारस्तंभ, पृ.191,192
11. उपरोक्त, तिवारी, विवेकानंद (2019), 'अछूत मतवाद के सच गांधी और अंबेडकर', पृ.301


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

स्वतंत्र भारताची निर्मिती झाल्यावर आधुनिक भारताच्या जडणघडणीचा ध्यास ज्या समाजसुधारक नेत्यांनी घेतला होता. त्यात पंडीत जवाहरलाल नेहरुंचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. नवभारताची उभारणी लोकशाही मूल्याद्वारे आणि तिची वाटचाल आदर्श पध्दतीने करून भारताच्या विकासात सिंहाचा वाटा उचलला. स्वतंत्र भारतासमोर अनेक समस्या होत्या. दारिद्र्य, बेकारी, गरीबी, सामाजिक आणि आर्थिक विषमता, अज्ञान, गुलामीची मानसिकता, ब्रिटीशांनी केलेले आर्थिक शोषण यावर पंडीत जवाहरलाल नेहरुंनी आपल्या विचार आणि कार्याद्वारे यशस्वी मात केल्याचे दिसते.

आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात त्यांनी समाजावाद, अलिप्ततावाद, मुलभूत उद्योगांचे राष्ट्रीयकरण, मिश्र अर्थव्यवस्था, राष्ट्रीयीकरण याद्वारे भारताची घडी बसविण्याचा प्रयत्न केला. व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक सुरक्षा, समता, धर्मनिरपेक्षता, बंधुता, शांतता याबरोबरच बहुलधर्मिय, बहुभाषिकतेला एकत्र ठेवण्याचे कार्य केले. आज भारतीय लोकशाहीचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. भारतीय लोकशाहीला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. या लोकशाहीच्या वाटचालीचे आणि यशस्वीतेचे श्रेय पंडीत जवाहरलाल नेहरुंनाच जाते.


Prashant

राजकीय ₹ 160

ISBN 978-93-92425-83-7

Also Available in e-Book

www.prashantpublications.com

prashantpublication.jal@gmail.com


भारताच्या जडणघडणीत पंडीत जवाहरलाल नेहरुंचे योगदान
डॉ. माधव वाघमारे
प्रशांत पब्लिकेशन्स

# भारताच्या जडणघडणीत पंडीत जवाहरलाल नेहरुंचे योगदान



PRINCIPAL
N.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

डॉ. माधव वाघमारे

Prashant

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

# भारताच्या जडणघडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान

संपादक
डॉ. माधव केरबा वाघमारे
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय,
मारवड, ता.अमळनेर जि.जळगाव

Prashant
प्रशांत पब्लिकेशन्स

Prashant
भारताच्या जडणघडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान
© सुरक्षित

प्रकाशक । मुद्रक
रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
3, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,
जळगाव 425001.

दूरध्वनी । वेब । ईमेल
0257-2235520,2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

आवृत्ती । आयएसबीएन । किंमत
नोव्हेंबर 2021
978-93-92425-83-7
₹ 160/-

अक्षरजुळवणी
प्रशांत पब्लिकेशन्स

e-Books are available online at www.prashantpublications.com
Prashant Publications app for e-Books
kopykitab.com • amazon.com • play.google.com

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनःप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच मजकुराची जबाबदारी ही सर्वस्वी लेखकाची राहील. लेखकांनी मांडलेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतील असे नाही.

# जवाहरलाल नेहरू : अलिप्ततावादी चळवळीचे प्रमुख शिलेदार

– डॉ. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे

**प्रस्तावना :**

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व अफ्रिका खंडात वसाहतवादाच्या अस्ताला प्रारंभ होऊन अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली व त्यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचा प्रवेश झाला. पण हा शीतयुद्धाच्या प्रारंभाचा काळ असल्यामुळे ही नवस्वतंत्र राष्ट्रे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारतात याबद्दलही बरेच औत्सुक्य होते. कारण शीतयुद्धाच्या संदर्भात त्याला फार मोठा अर्थ होता. परंतु या आफ्रो-अशियाई राष्ट्रांनी कोणत्याही एका गटात जाणे त्यांच्या हिताचे नसल्यामुळे त्यांनी महासत्तांमधील सत्तासंघर्षापासून अलिप्त राहणे पसंत केल्यामुळे अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचा उदय झाला. नवोदित आफ्रो-अशियाई देशांच्या विकासासाठी स्थापन झालेल्या या अलिप्ततावादी चळवळीच्या उदय व विकासामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मोठे योगदान राहिलेले आहे.

**अलिप्ततावादी चळवळीचा उदय :**

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे पूर्वीचे स्वरुप आमुलाग्र बदलून गेले व पूर्वीच्या पद्धती आणि साधने कालबाह्य वाटू लागली होती. कारण आता शीतयुद्धाचे नविनच राजकारण सुरू झाले होते. संपूर्ण जगाची वाटणी दोन सत्तागटांमध्ये होऊन अमेरिका व सोविएत रशिया या दोन महासत्तांमध्ये सत्तास्पर्धा सुरू झाली होती. सत्तास्पर्धेच्या या राजकारणात स्वतःस गुंतवून न घेता स्वतंत्र धोरण ठेवावे, स्वतःच्या विकासाचा मार्ग स्वतःच ठरवावा व त्यासाठी शांततेचा पाठपुरावा करण्याचा सर्वस्वी स्वतंत्र दृष्टिकोन पंडित नेहरू यांनी मांडला. त्यांनी २ सप्टेंबर १९४६ मध्ये नविन हंगामी सरकारची ओळख करून देत असतांना एका रेडिओ प्रसारणात म्हटले होते की, आम्ही असा निश्चय केला आहे की, आम्ही एकमेकांच्या विरूद्ध संघटीत झालेल्या गटांच्या सत्तेच्या राजकारणापासून स्वतःस दूर ठेवणार आहोत. कारण त्यांनी जगास दोन वेळा महायुद्धाच्या खाईत ढकललेले आहे आणि पुन्हा एकदा अधिकच महाभयानक महायुद्धामध्ये ढकलू शकतात.[१] याच मतांचा त्यांनी एका पत्रकार परिषदेत पुनरूच्चार केला होता. येथूनच खऱ्या अर्थाने अलिप्ततावादाचा उदय झाला असे म्हणता येईल; परंतु अलिप्ततावाद

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

(Non-alignment) हे नाव त्यास पुढे अनेक वर्षानंतर दिले गेले है. सन १९५५ मध्ये नेहरूंच्या सोविएत संघ, पोलंड आणि युगोस्लाव्हिया या देशांच्या दौऱ्याच्या काळात देखील या शब्दाचा उल्लेख झाला नाही. एका युगोस्लाव्ह स्त्रोतानुसार अलिप्ततावाद (Non-alignment) या शब्दाचा प्रथमतः अधिकृतपणे वापर भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९५४ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथील भाषणात केला होता.[२]

अलिप्ततावादी चळवळीच्या (NAM : Non-Aligned Movement) स्थापनेसाठी जगातील पाच महान नेत्यांनी प्रयत्न केले होते. त्यात पंडित जवाहरलाल नेहरू (भारत), जोसेफ ब्रांज टिटो (युगोस्लाव्हिया), अब्देल नासेर (इजिप्त), सुकार्नो (इंडोनेशिया) आणि एन्क्रुमा (घाना) याचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर अलिप्ततावादी चळवळीच्या अधिकृतपणे स्थापनेपर्यंतच्या वाटचालीमधील काही महत्वाचे टप्पे मैलाचा दगड ठरलेले आहेत. त्यामध्ये भारत-चीन यांच्यात १९५४ मध्ये झालेला 'पंचशील करार' व १९५५ मध्ये आफ्रो-आशियाई राष्ट्रांची इंडोनेशियात भरलेली 'बाडुंग परिषद' यांचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**पंचशील :**

अलिप्ततावाद पंचशील सिद्धांतावर आधारीत आहे. बौद्ध साहित्य आणि अशोकाच्या आदेशात पंचशील तत्वांचा उल्लेख सापडतो. आंतरराष्ट्रीय संबंधांना नियंत्रित करण्यासाठी २९ एप्रिल १९५४ रोजी तिबेटच्या संदर्भात भारत-चीन यांच्यात झालेल्या करारामध्ये पंचशील तत्वाचा स्विकार करण्यात आला होता. यामधून अलिप्ततावादी चळवळीच्या स्थापनेचा संकेत मिळत होता. कारण 'पंचशील'मधील पाच तत्वांनाच अलिप्ततावादी चळवळीचे मुख्य अंग मानले गेलेले आहे. 'पंचशील'मधील ही पाच तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे.
२) परस्परावर आक्रमण न करणे.
३) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.
४) समानता आणि परस्पर हिताचे संवर्धन करणे.
५) शांततामय सहजीवन मान्य करणे.[३]

'पंचशील' सिद्धांताचे प्रतिपादन सर्वप्रथम २० जून १९५४ मध्ये चीनी गणराज्याचे पंतप्रधान चाऊ-एन-लाए व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यामधील तीन दिवसाच्या चर्चेनंतर प्रकाशित करण्यात आलेल्या भारत-चीन पंतप्रधानांच्या संयुक्त निवेदनात करण्यात आले होते. यामध्ये असे म्हटले होते की, चीन आणि भारत या दोन्ही देशांच्या संबंधाचे संचालन या पाच सिद्धांताच्या



आधारे केले जाईल. दोन्ही देश आशिया तसेच जगातील अन्य देशांसोबतच्या आपल्या संबंधामध्ये या सिद्धांताचे पालन करतील. जर या सिद्धांताचे पालन आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये केले गेल्यास शांतता व सुरक्षिततेचा आधार मजबुत होईल आणि वर्तमान परस्पर संशय व अविश्वासाची जागा विश्वास आणि परस्पर सहकार्याने व्यापली जाईल. एक देश दुसऱ्या देशात हस्तक्षेप करणार नाही. तसेच विभिन्नता शांतता भंग करून संघर्ष निर्माण करणारी ठरणार नाही. प्रत्येक देशास प्रादेशिक अखंडता, सार्वभौमत्त्व आणि अनाक्रमनाचे आश्वासन मिळाले तर बिभिन्न देशांमध्ये शांततामय सहजीवनाचे तत्व प्रस्थापित होऊन मैत्रिपूर्ण संबंध दृढ होतील. त्यामुळे जगात आज अस्तित्वात असणारा तणाव कमी होऊन शांततेचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.[४]

२३ सप्टेंबर १९५४ रोजी इंडोनेशियाचे पंतप्रधान अहमद सुकार्नो यांचा सन्मान करतांना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील सिद्धांताचा पुरस्कार केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्येक राष्ट्राने आपले परराष्ट्र धोरण संचलित करतांना पंचशील तत्वांचा अवलंब करावा असे स्पष्ट आवाहन त्यांनी केले. १७ ऑक्टोंबर १९५४ रोजी व्हिएतनामचे अध्यक्ष हो-चि-मिन्ह यांनी त्यास मान्यता दिली. डिसेंबर १९५४ मध्ये युगोस्लाव्हियाने देखील त्यास मान्यता दिली. २ एप्रिल १९५५ रोजी भारताच्या लोकसभेत असे स्पष्ट करण्यात आले की, ब्रम्हदेश, चीन, लाओस, नेपाळ, व्हिएतनाम, युगोस्लाव्हिया व कंबोडिया या राष्ट्रांनी पंचशील सिद्धांताचा स्विकार केला आहे. १० एप्रिल १९५५ रोजी नवी दिल्ली येथे भरलेल्या आशियाई परिषदेत २०० प्रतिनिधींनी भाग घेतला होता. त्यात पंचशील सिद्धांताचे समर्थन करण्यात आले. १८ ते २४ एप्रिल १९५५ रोजी बांडुग (इंडोनेशिया) येथे भरलेल्या परिषदेत २९ आफ्रो-आशियाई राष्ट्रांनी पंचशील सिद्धांताचा अर्थ निश्चित करून त्यास मान्यता दिली. एवढेच नव्हे तर संयुक्त राष्ट्र संघाच्या (UNO) अनेक निर्णयात पंचशील सिद्धांताचा आधार घेण्यात आला. सन १९५५ मध्ये ऑस्ट्रेलिया, पोलंड, ऑस्ट्रिया आदी राष्ट्रांनी पंचशील तत्वांप्रती आपली निष्ठा प्रकट केली. अशाप्रकारे अलिप्ततावादामध्ये अंतर्भूत असणाऱ्या मूलभूत भावनेचा प्रसार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यासाठी पंचशील सिद्धांत अतिशय महत्वाचा ठरला.

**बांडुग परिषद :**

सन १९५५ मध्ये इंडोनेशियातील पश्चिम जावामधील एक प्रमुख शहर असलेल्या बांडुग येथे आफ्रो-आशियाई राष्ट्रांची एक महत्वाची परिषद भरली होती. यापूर्वी अमेरिकेने 'सिटो' आणि 'बगदाद करार' या संघटना स्थापन केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ही परिषद भरली असल्याने तिला फार महत्व होते. डिसेंबर १९५४

मध्ये बोगोर येथे झालेल्या भारत, ब्रम्हदेश, श्रीलंका, पाकिस्त... इंडोनेशिया या देशांच्या पंतप्रधानांच्या परिषदेत घेतलेल्या निर्णयानुसार बांडुग परिषद बोलविण्यात आली होती आणि ही परिषद आयोजित करण्यामागे पुढीलप्रकारचे काही प्रमुख उद्देश निर्धारित करण्यात आलेले होते.

१. सद्भावना आणि सहकार्य यामध्ये वृद्धि करणे.
२. आशिया व आफ्रिका खंडातील देशांशी विशेष निगडीत आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवर विचार विनिमय करणे.
३. वर्तमान विश्वव्यवस्थेतील आशिया व आफ्रिका खंडातील देशांच्या स्थितीवर विचार करणे आणि हे देश वैश्विक शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी कोणत्या भूमिका वठवू शकतील यासंबंधी विचार-विमर्ष करणे.

बांडुग परिषदेत आशिया व आफ्रिका खंडातील २९ देशांमधील ३४० प्रतिनिधींनी भाग घेतला होता. या परिषदेचे उद्घाटन १८ एप्रिल १९५५ मध्ये इंडोनेशियाचे राष्ट्रपती डॉ.सुकार्नो यांच्या हस्ते झाले. या परिषदेत आशिया व आफ्रिका खंडातील समस्यांवर व्यापक विचार विमर्ष झाला. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीही या परिषदेमध्ये भाग घेतला होता. परिषदेत सहभागी झालेल्या २९ राष्ट्रांमध्ये इजिप्त, लिबिया, सुदान, इथिओपिया, लायबेरीया व घाना या आफ्रिकन राष्ट्रांचा देखील समावेश होता. अरब राष्ट्रांच्या विरोधामुळे इस्त्राइल या देशाला परिषदेत स्थान मिळाले नाही. तसेच पाश्चात्य राष्ट्रविरोधी परिषद या भूमिकेतून रशिया व चीन यांनी या परिषदेचे स्वागत केले होते.

बांडुग परिषदेत भाग घेणाऱ्या देशांनी असा निश्चय केला होता की, ते आर्थिक विकासासाठी एकमेकांशी विशेषज्ञ, आधुनिक योजना तसेच उपयुक्त साधनसामुग्री या माध्यमातून परस्पर सहकार्य वृद्धिंगत करतील. आर्थिक विकासाचे कार्यक्रम संचलित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने एका विशेष निधिची तरतूद करावयास पाहिजे, आण्विक शक्तिचा विकास आशिया व आफ्रिकन देशांच्या शांततापूर्ण विकास कार्यासाठी झाला पाहिजे, असे काही निर्णय या परिषदेत घेण्यात आले होते. या देशांनी आपला आर्थिक विकास आणि हितसंबंधाच्या रक्षणासाठी आंतराष्ट्रीय परिषदांमध्ये किंवा संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकांमध्ये सहभागी होण्यापूर्वी परस्पर विचार विनिमय करून आपल्या सामान्य हिताचे धोरण निश्चित केले पाहिजे, असा एक महत्वाचा निर्णय या परिषदेत घेण्यात आला होता. तसेच या परिषदेत वंशभेद आणि पृथकत्व (Racial Segregation) या धोरणांवर देखील कठोर टिका करण्यात आली होती. तसेच मध्य-पूर्वेतील तणाव व संकटाचे कारण पॅलेस्टाइनच्या स्थितीस मानण्यात आले. तसेच यास



विश्वशांततेसाठी धो... संबोधण्यात येऊन पॅलेस्टाइन मधील अरब जनतेच्या अधिकारांचे समर्थन करण्यात आले. पॅलेस्टाइनसंबंधी युनोच्या प्रस्तावास कार्यान्वित करून या समस्येची शांततामय मार्गाने उकल करण्यावर भर देण्यात आला. बांडुग परिषदेत निःशस्त्रीकरणाचे समर्थन करण्यात येऊन मानवजातीच्या संरक्षणासाठी अणुचाचण्या आणि शस्त्रास्त्रांच्या वापरावर प्रतिबंध घालण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला होता.

बांडुग परिषदेत वसाहतवादाचे समूळ उच्चाटन करण्याची घोषणा करण्यात आली होती. पण वसाहतवादाच्या विविध रूपांबद्दल परिषदेत सहभागी प्रतिनिधींमध्ये मतभेद दिसून आले. यासंदर्भात प्रतिनिधींमधील मतभेदांचे निराकरण करण्यासाठी दहा सिद्धांताचा प्रस्ताव स्वीकृत करण्यात आला. त्यात पाच तत्वे ही पंचशील सिद्धांतामधील होती व नविन पाच सिद्धांताचा अंगिकार करण्यात आला होता. ही दहा तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. मानवाच्या मूलभूत अधिकारांचा सन्मान करणे.
२. संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टरचे उद्देश आणि सिद्धांताविषयी सन्मानाची भावना बाळगणे.
३. मोठ्या आणि लहान अशा सर्वच राष्ट्रांना समान लेखणे.
४. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.
५. प्रत्येक राष्ट्राच्या वैयक्तिक आणि सामुहिक सुरक्षिततेच्या अधिकारास मान्यता देणे.
६. महासत्तानी स्वहितासाठी सामुहिक सुरक्षितता या व्यवस्थेचा वापर करू नये तसेच दुसऱ्या देशांवर दबाव टाकू नये.
७. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रास युद्धाची धमकी देऊ नये.
८. सर्व आंतरराष्ट्रीय समस्यांची उकल शांततामय मार्गाने करण्यात यावी.
९. राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्परहित आणि सहकार्यास चालना देणे.
१०. न्यायाप्रति आणि आंतरराष्ट्रीय कर्तव्याविषयी आदराची भावना असावी.

याप्रकारे बांडुग परिषदेत वरील दहा तत्वांना मान्यता देण्यात येऊन अलिप्ततावादाच्या संकल्पनेस मूर्त रूप देण्यासाठी कार्यक्रम तयार करण्यात आला.

बांडुग परिषदेविषयी बार्नेट यांनी लिहले आहे की, ही परिषद आशिया व आफ्रिकेच्या पुनरुत्थानाचे प्रतिक होती. या ऐतिहासिक व अभूतपूर्व परिषदेत आशिया व आफ्रिका खंडातील २९ देशांचे प्रमुख नेते पाश्चिमात्य महासत्तांच्या प्रभावापासून मुक्त राहून परिषदेत सहभागी झाले होते. त्यामुळे ही परिषद वैश्विक

Dr.B.S. Desale Science College Sakri Dist.Dhule
PRINCIPAL
I.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

प्रश्नांबाबत पाश्चिमात्य देशांपेक्षा भिन्न देशांचा प्रभाव वाढत असल्याने एकप्रकारे निर्दशक ठरली.[६] बांडुग परिषदेच्या वेळी काही राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात नव्याने प्रवेश केला होता. तसेच परिषदेत सहभागी राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघटनेत संयुक्त आघाडी उघडविण्याचे ठरविले होते. अलिप्त राष्ट्रांची संख्यादेखील वाढत होती व नासेर सारख्या प्रभावी नेत्यांचा या गटात समावेश झाला होता. त्यामुळे बड्या राष्ट्रांना अलिप्त राष्ट्रांचे अस्तित्व व त्यांचे महत्व मान्य करावे लागले. सन १९५५ मध्ये १६ अलिप्त राष्ट्रांना युनो'चे सदस्यत्व मिळाले. सन १९५६ मध्ये नेहरू, नासेर आणि टिटो या अलिप्त राष्ट्रांच्या प्रमुख नेत्यांची ब्रिओनी येथे भेट झाली होती. युगोस्लाव्हियाने कम्यूनिस्ट असूनही अलिप्तता टिकविली होती. टिटोंच्या समावेशामुळे अलिप्त राष्ट्रामध्ये प्रथमच युरोपियन राष्ट्राचा समावेश झाला आणि अलिप्त गट अधिक व्यापक बनला.

अमेरिका आणि सोविएत रशिया या महासत्तांमधील शीतयुद्धापासून व सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून संघटनात्मक पातळीवर चळवळ उभारण्याची इच्छा बांडुग परिषदेत अलिप्त राष्ट्रांनी जाहिर केली. त्यामुळे अलिप्ततावादी चळवळीच्या उदयासाठी बांडुग परिषद आधारशिला ठरली. जसजशी अधिकाधिक आफ्रो-आशियाई राष्ट्रे स्वतंत्र होऊ लागली, त्यांनी अलिप्ततेचे धोरण स्वीकारण्यास सुरवात केली. यातूनच पुढे सत्ता गटांमध्ये सामील होण्यास नकार देणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वायत्त धोरणाचा अवलंब करणाऱ्या राष्ट्रांची एक परिषद आयोजित करण्याची कल्पना पुढे आली.[७] ही कल्पना पुढे येण्यासाठी अनेक घटकांचे योगदान आहे. त्यातील काही महत्वाचे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

१. युगोस्लाव्हिया, इजिप्त आणि भारत यांच्यामधील घनिष्ट संबंध.
२. आंतरराष्ट्रीय राजकारणात १९६० च्या दशकात आफ्रिकन देशांचा झालेला उदय.
३. शीतयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढत असलेला तणाव.[८]

पुढे इजिप्त, युगोस्लाव्हिया व इंडोनेशिया या राष्ट्रांनी अलिप्त राष्ट्रांची परिषद आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला. पण देशांतर्गत होणाऱ्या टिकेमुळे भारताने यासंदर्भात पुढाकार घेतला नसला तरी भारताचा या धोरणास पूर्ण पाठींबा होता. अलिप्त राष्ट्रांच्या पहिल्या परिषदेच्या आयोजनाच्या पूर्वतयारीसाठी २२ देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक जून १९६१ मध्ये कैरो येथे झाली आणि या चळवळीच्या सदस्यत्वासाठी आवश्यक पूर्वअटींची निश्चिती करण्यात आली. या निकषांना अनुसरून सप्टेंबर १९६१ मध्ये अलिप्त राष्ट्राची पहिली शिखर परिषद आयोजित करण्यात आली. याप्रकारे कैरो शिखर परिषदेपासून 'अलिप्ततावादी



चळवळ' स्थापन झाली असे मानले जाते. या चळवळीत स्वतःचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण असणाऱ्या व काही निश्चित सिद्धांताच्या समर्थनासाठी एका व्यासपीठावर एकसंघपणे एकत्र येणाऱ्या राष्ट्रांचा समावेश होतो. शीतयुद्धाच्या कालखंडात या चळवळीने महासत्तांच्या एकाधिकारशाहीला मोठे आव्हान निर्माण केले होते.

**समारोप :**

अलिप्ततावादी चळवळीच्या स्थापनेमुळे नवस्वतंत्र देशांना सत्तागटांपासून दूर राहून आंतरराष्ट्रीय राजकारणात न्यायोचित भूमिका घेण्यासाठी एक सार्वभौम व्यासपीठ मिळाले. तसेच आफ्रो-आशियाई देशांच्या समस्या सोडविण्यासाठी देखील अलिप्ततावादी चळवळीची महत्वपूर्ण भूमिका राहिली. शीतयुद्ध काळात स्थापन झालेल्या अमेरिका किंवा सोविएत रशिया पुरस्कृत सिटो, नाटो, वार्सा पॅक्ट यासारख्या लष्करी करार संघटनांमध्ये सहभागी न होता सर्वस्वी स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखणे अलिप्ततावादी राष्ट्रांना शक्य झाले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सुरुवातीपासूनच अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या या अलिप्ततावादी तात्विक अधिष्ठानामुळे आफ्रो-आशियाई देशांच्या परराष्ट्र धोरणाला दिशा मिळाली व अलिप्ततावादी चळवळीचा जन्म झाला. अलिप्तता या धोरणाचा प्रथम उच्चार पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केला होता. म्हणूनच अलिप्ततावादी चळवळीला योग्य दिशा वळण देण्याचे काम करणाऱ्या प्रमुख शिलेदारांमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नाव अग्रस्थानी आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. कुलश्रेष्ठ के.के., 'आंतरराष्ट्रीय संबंध', एस.चन्द एन्ड कम्पनी लि., नई दिल्ली, १९८९, पृ.५२७
२. कित्ता, पृ.५२७
३. बाचल वि.मा., 'आंतरराष्ट्रीय संबंध', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७७, पृ.१९१
४. वेदालंकार हरिदत्त, 'आंतरराष्ट्रीय संबंध', सरस्वती सदन, दिल्ली, १९७१, पृ.४२७-२८
५. कित्ता, पृ.४२९-३०
६. कित्ता, पृ.४३०
७. The India emerged during Marshal Tito's visit to Egypt in -pril 1961
८. M.Phil. Degree Dissertation entitled, "Non-Alignment in the Seventies', submitted by K.Y. Daud to Dr. BAMU, Aurangabad in 1982

Sakri (Dhule)
प्राचार्य
त्रि.शि.सं.चे श्रीमती वि.उ.पाटील कला
व कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्याल
साक्री, ता.साक्री, जि.धुळे.

# डिजिटल साक्षरता उपक्रम आणि महिला सक्षमीकरण

प्रा.डॉ. वसुमती पी. पाटील
मराठी विभाग प्रमुख,
व्ही.यु.पाटील कला व कै. डॉ. बी.एस.देसले
विज्ञान महाविद्यालय, साक्री
ता. साक्री, जि. धुळे

आज विज्ञान-तंत्रज्ञानाने युग झपाटलेले आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमुळे जग जवळ आले आहे. निकोप समाज निर्मितीसाठी रुढीने जखडलेल्या आपल्या समाजाला विवेकहीन आचारांपेक्षा, तर्कशुध्द आचार-विचारांचे महत्व पटवुन देण्यासाठी भविष्यातील आव्हाने पेलण्यास समर्थ आणि सक्षम होणे आवश्यक आहे. भविष्यातील आव्हान पेलण्यासाठी महिलांनी काही सोपी तत्वे अंगी बाळगणे आज गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगाचे भान प्रत्येक स्त्रीला असावे. संगणक, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचा वापर कसा, केव्हा, किती कोणत्या पध्दतीने करावा याबाबतीत स्त्रीने सज्ञान असणे काळाची गरज झाली आहे. महिला सक्षमीकरणात तिचा सर्वांगीण विकास अपेक्षित असतो. मग सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इ. कोणतेही क्षेत्र असो स्त्रीने चिकित्सकपणे विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत जागरुक असावे.

आज महिला सुरक्षा अत्यंत महत्वपूर्ण बाब ठरली आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर असुनही आज तिच्यावर होणारे अत्याचार वाढत चालले आहे. इतकेच नाही तर घरात किंवा घराबाहेर लहान-लहान मुली देखील सुरक्षित नाही. अशा वेळी महिलांनी स्त्री-पुरुष समान किंवा भेदभाव अशा प्रतिद्वंद्वात्मक व निरर्थक संघर्ष मागे आपली शक्तींचा अपव्यय न करता सार्थक बदल आपल्या व्यक्तिमत्वामध्ये घडवुन आणला पाहिजे.

महिलांनी आपल्या सुरक्षेसाठी स्वतः शारीरिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे त्या बरोबर स्वतः वापरत असलेल्या मोबाईलचा वापर योग्य पध्दतीने करावा जसे की [illegible] हेल्पलाईन, सुरक्षा अॅप, लोकेशन इ. सर्व बाबींची माहिती त्या स्त्रीला असावी अर्थात स्मार्टफोन सोबत आपली सुरक्षा असावी कारण जग हे तंत्रज्ञानाचे आहे. रोजच्या दैनंदिन जीवनातील कामांपासुन ते संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात टेक्नोलोजीचा भरपूर उपयोग करता



Principal
T.S.S's V.U. Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

Scanned by CamScanner

येऊ शकतो. विविध ॲप्स सोबत काही गॅझेट्स पण आज उपलब्ध आहेत. काही गॅझेट्स शरीरावर परिधान करता येऊ शकतात. महिलांना असे गॅझेट्स कपड्यांमध्ये लपविता येऊ शकतात. तर काही गॅझेट्स दागिन्यांमध्येही लपविता येऊ शकतात. जसे की, सेफलेट नावाचे एक ब्रेसलेट सारखे उपकरण आहे. त्यात दोन बटन असतात एक पालकांच्या नेटवर्कशी संपर्क करण्यासाठी असतो. संकटाची स्थिती असल्यास सावधानी बाळगणाऱ्या व्यक्ती किंवा परिवारातील सदस्य या ॲपद्वारे आपत्कालीन नंबरचा संपर्क करु शकतात. त्यामध्ये होणारी ऑडियो रेकॉर्डिंग सरळ उपयोग करणाऱ्यांच्या मोबाईल फोन सोबत जोडलेली असते. तसेच सायरन हे सुध्दा अंगठीत लपवुन त्या ॲपचा वापर केला जाऊ शकतो. त्याचा आवाज पन्नास फुट अंतरापर्यंत जाऊ शकतो तसेच आक्रमण करणारा व्यक्ती देखील सायरनच्या आवाजाने भ्रमित होऊ शकतो. काही सायरनचे उपकरण हे ॲप सोबत जोडलेले असतात. त्या डिवाईसचा वापर सायलेंट मोड मध्ये पण सेट होऊ शकतो जेणे करुन विना आवाज कॉन्टॅक्स असलेल्यांपर्यंत माहिती जाऊ शकते. त्याचप्रमाणे छेड छाड, बलात्कार, एसिड हल्ला अशा अनेक घटनांमुळे महिलांनी आपल्या सुरक्षेसाठी जीपीएस ट्रॅकिंग, इमरजन्सी कॉन्टॅक्ट नंबर, सेफ लोकेशन सारखे फिचर्सचा वापर केला पाहिजे. त्यापैकी काही ॲप सरळ पोलिस कंट्रोल रुमशी जोडलेले असतात. वुमन सेफ्टी, स्मार्ट २४X२४ D रक्षा वुमन सेफ्टी अलर्ट, सेफ्टीपीन, निर्भया बी फिअरलेस ॲप, आय एम शक्ति ॲप अशा अनेक प्रकारे स्त्री जागरुक राहू शकते.

महिलांनी आर्थिक व्यवहार करतांना डिजिटल बँक विषयी जाणून घेतले पाहिजे. कमी वेळात योग्य पध्दतीने व्यवहार करता येऊ शकतो. जेणे करुन ऐन वेळेस आर्थिक संकट, अडचण असल्यास मार्ग सुचतात. ऑनलाईन बुकिंग, ऑनलाईन बिल भरणे, पैसे ट्रान्सफर करणे, एखाद्या वस्तुची प्रत त्याविषयी सखोल माहिती, तिचा भाव कुठे उपलब्ध होईल. घरापर्यंत ती वस्तु पोहचण्यासाठी लागणारा वेळ इ. सर्व माहिती जाणून घेतली पाहिजे जेणे करुन इतरांवर अवलंबून न राहता स्वावलंबी होऊ शकतो. त्याचप्रमाणे इंटरनेटच्या नेटवर्किंग व्यवसाय मध्ये फसव्या गोष्टी ओळखता आल्या पाहिजे कारण जग हे इंटरनेटच्या महाजालमध्ये फसलेले आहे. कधी, कोण कुठे आणि कसा आपणास फसवणार याविषयी सांगणे कठीण त्यात महिला अधिक बळी पडत असतात. वेगवेगळ्या स्कीम, जाहिराती आणि फसवे आकर्षण हे ओळखता आले पाहिजे. अनेक चांगल्या अभ्यासपूर्ण वेबसाईटस आणि युट्यूबवरील व्हिडीओ, ऑडिओ इ. मुळे ज्ञानात भर पडत असते परंतु त्यामध्ये देखील सतर्कता असावी फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलीग्राम, ट्विटर इ. गोष्टींमध्ये

आपल्या विषयी माहिती मिळवुन आपल्या [illegible] किंवा आपण कोणाच्या बनावट संदेश, बनावट फोटो, बनावट ई-मेल, बनावट साईट्सचे बळी ठरणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कारण आपल्या देशांतर्गतच नाही तर परदेशी नेटवर्क मध्ये देखील महिलांच्या फसवणूकीचे प्रकार उघडकीस आले आहेत. अशा वेळी डिजिटल साक्षरता उपक्रम जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा उद्देश देशातील डिजिटल साक्षरता अभियान योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा उद्देश देशातील नागरिकांना डिजिटल साक्षर करणे आहे ३१ मार्च २०२० पर्यंत देशातील ६० टक्के ग्रामीण परिवारांमधील कमीत कमी एक सदस्याला डिजिटल साक्षर करण्याचा ह्या योजनेचा हेतू आहे. त्यासाठी वेबसाईट वर त्याची सविस्तर माहिती दिली आहे.

महिलांनी दैनंदिन व्यवहारासोबतच आपण ज्या-ज्या क्षेत्रात काम करता तेथे वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाशी माहितगार होणे, त्याची योग्य हाताळणी करणे व याद्वारा आपले व्यक्तिमत्व अधिक सक्षम बनविणे आज काळाची गरज आहे.

संदर्भ :-


स्त्री-पुरुष तुलना

स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन

स्त्री संघर्षाची नवी झेप



ताराबाई शिंदे

डॉ. वंदना महाजन

डॉ. नीलम गोऱ्हे


Scanned by CamScanner

# Role of Women as an Environmentalist in Ruskin Bond's Short Stories

**Dr. Nilesh Bhateshwar Malichakar**
Assistant Professor, TSS' Smt. Vimalbai Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College, Sakri

Ruskin Bond presents the role of women as an environmentalist. He is an advocate of ideas of environment conservation. He gives importance to the female protagonists who contribute a lot for the conservation protection of nature. He tries to portray the bond of relationship of women with the nature.

The present research paper is an attempt to study the Role of Women as an Environmentalist in the selected short stories of Ruskin Bond. The researcher has selected two short stories of Ruskin Bond for study. The researcher has studied the short stories like The *Blue Umbrella and* Sita *and the River* for the present study.

Ruskin Bond is a well-known Indian short-story writer. His characters and themes are not borrowed from the life of jungle but also from life of society. Bond handles the range of various themes in his short stories. They are from nature, peaceful co-existence, human values, love for freedom, Positive attitude towards nature, continuity of life, and social problem during period of partition between India and Pakistan. He conveys the message of conservation of environment through his literature. It is the need of an hour to concentrate more on the protection of environment and tribal life around us because it is national heritage of any country. Ruskin Bond is an ambassador of the jungle life. His ideas are completely associated with animals, birds, tribal people, mountain, hills, valleys, wild animals. Ruskin Bond looks at nature as friend, philosopher, teacher, preacher and guide like William Wordsworth.

*The Blue Umbrella* is a beautiful short story of Ruskin Bond. It has different themes. The story deals with the themes like rural people are cooperative and broad minded. Binya is the central character of the short story. She is lover of nature. She is lovely, cooperative, kind, mature, broadminded, obedient, practical and strong girl. Binya possess all the qualities of mountain girls. The narrator presents he character as "Like most mountain girls, Binya was quite sturdy, fair of skin, with pink cheeks and dark eyes and her black hair tied in pigtail. She wore pretty glass bangles on her wrists, and a necklace of glass beads." (Bond, *The Blue Umbrella* 5)



PRINCIPAL
TSS' Smt. Vimalbai U Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

Binya and her members of family are the lovers of the animals. They treat animals as human being. They respect them as their relatives. Even names of the animals are also like human beings. Family of Binya address cows by the human names. Binya calls cow as "NEELU! Neelu!... Neelu-Blue was the name of the blue –grey cow. The other cow, which was white, was called Gori, meaning Fair One." (Bond, *The Blue Umbrella* 1). It shows that people in the mountain regions love animals as human beings which highlight the role of Binya as an Environmentalist. Binya worships nature as a God and considers the organs of animals as good fortune of omen. The narrator presents, "From the necklace hung a leopard's claw. It was a lucky charm, and Binya always wore it." (Bond, *The Blue Umbrella* 5). It shows the message that animals should be protected because organs of animals have also divine qualities. Indians believe in the divinity of nature and its objects through wearing of leopard's claw.

Binya believes in the freedom of animals. She allows her cows to roam freely in the forest on the contrary her brother pulls them forcefully. Cows prefer company of Binya. The narrator remarks that "The cows preferred having Binya with them, because she let them wander. Bijju pulled them by their tails if they went too far." (Bond, *The Blue Umbrella* 3). Animals love those who give them freedom. It presents Binya is true lover and care taker of animals. Some people of urban areas are more dangerous and inhuman than animals. City life is crowded which is far from the peace and tranquility. Binya likes the life of mountain area. Darkness and loneliness of forest is not serious matter for her. On the contrary she is disturbed by the crowd in the market. The narrator presents, "Binya belonged to the mountains, to this of the Himalayans known as Garhwal. Dark forests and lonely hilltops held no terrors for her. It was only when she was in the market town, jostled by the crowds in bazaar, that she felt rather nervous and lost."(Bond, *The Blue Umbrella* 3-4). It indicates forest is safe and convenient for Binya rather than town crowds of town life. Some people in urban areas are selfish and do not like to think about other people.By preferring to live in the forest or mountain life she conveys the message of love for the mountain and forest which is the duty of an environmentalist.

The second short story *Sita and the Rivers* deals with love of Sita for river and natural surroundings.The character of Sita and her life on the island is the dominant factor of the story her love and care for the nature is really appreciable. She is a girl of ten years. She is an innocent, uneducated, bold and an all-rounder. The people who live in the company

of nature always face adversity and even in adversity also they worship nature as their God. Sita matchesherself the nature whatever the circumstances she has. Nature takes away the loneliness of man. Some people accept the adversity of nature and suppose it as a part of the life and Sita is one of them. God is the creator of the. The story also appeals that we should preserve the nature, especially trees. Company of trees makes us strong and happy. They perform a remarkable role in our life. Sita in the story never feels sad and upset because of trees. The narrator states that "And as the tree moved out on the river and the little island was lost in the swirling waters, Sita forgot her fear and her loneliness. The tree was taking her with it. She was not alone" (Bond, *Dust on the Mountain* 231). It means she indirectly conveys the message of love for the trees. Company of nature sometimes provides an opportunity to women to express themselves with nature. They help to make earth firm. If we preserve the trees they are very helpful. The Peepal tree is very useful for all human beings as well as animals and birds. The narrator has presented peepal tree he says that "The peepal tree was about three hundred. It provided shelter for the birds who visited it from the mainland" (Bond, *Dust on the Mountain* 219). The tree is useful for many forces in the society and nature.

Binya and Sita are the true environmentalists presented by Ruskin Bond. Through their activities in the company nature and animals they have proved it. Both have strong sense of attraction for nature. They both are the lover of human values like equality and freedom to the nature. They are against the forceful dragging of animals. They worship nature as the God.

**Conclusion**

As women love and protect her children and other kin and kith in the same way they have potential to love nature around us. They are true environmentalists. Many such women are there who sacrificed their lives in protection of nature. Though Binya and Sita are girls yet they possess the quality of love for nature. Ruskin Bond describes the environment and people around the mountain and rivers basin. The adversities and willing acceptance of adversities by hilly people especially girls are shown by the narrator.

**Works Cited :**

Bond Ruskin. *The Blue Umbrella*. New Delhi: Rupa Publications India Pvt Ltd. 1992. Print.

__________. *Dust on the Mountain*. New Delhi: Penguin Books, 1996. Print.

*****

PRINCIPAL
C.S.'s Smt. U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College



Scanned by CamScanner

# DIGITAL LITERACY
# AND
# WOMEN EMPOWERMENT


**Chief Editor**

Prin. Dr. Ashok P. Khairnar

J.K. Shah Adarsh College,

Nijampur-Jaitane

**Editors**

Dr. Kantilal D. Sonawane

Prof. Atish S. Meshram

Dr. Priyanka P. Sulakhe



T.S.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# Digital Literacy and Women Empowerment

©Reserved

**ISBN : 978-81-951217-4-8**

**Publisher & Printer :** Yogeshwar L. Jalgaonkar

Dnyanpeeth International Publisher

| | | |
|---|---|---|
| **Aurangabad** | : | Banjara Colony, Near Datta Mandir,<br>Bahadarsingpura, Aurangabad<br>Dist. Aurangabad - 431001<br>Contact : 9823724705 |
| **Nandurbar** | : | Manik Chowk, Opp. Hutatma Shirishkumar<br>Smarak, Nandurbar Dist. Nandurbar - 425412<br>Contact : (02564) 220155, 9175510724 |
| **Email** | : | dnyanpeeth.publisher@gmail.com |
| **First Edition** | : | 31 December 2021 |
| **Type Setting** | : | Rudra Creations, Nandurbar |
| **Price** | : | 300/- |


**Disclaimer :** The Authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The Editors or Publishers do not take responsibility for the same in any manner. Errors if any are purely unintentional and readers are requested to communicate such error to the Editors or Publishers to avoid discrepanices in future.

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (xerox copy), recording or otherwise, without the prior permission.

# महिला सक्षमीकरण : ऐतिहासिक-राजकीय सिंहावलोकन

**प्रा. शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक- राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान
महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.(महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

स्त्री-पुरुष यांच्यामध्ये लिंगाच्या आधारावर फरक करुन हजारो वर्षांपासुन लिंगभाव करण्यात येऊन महिलांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून दूर ठेवण्यात आले व पुरुषांना सर्वत्र अधिकचे अधिकार बहाल करण्यात आले. यामुळे स्त्रियांच्या शोषणाची प्रक्रिया ही फार प्राचीन काळापासुन चालत आलेली आहे. आधुनिक काळात स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, स्त्रियांवरील हल्ले, अत्याचार व बलात्कार यासारख्या वाढत्या घटनांमुळे स्त्रियांच्या प्रतिष्ठेवर मोठया प्रमाणात आघात होत आहे. यापुढे जाऊन असे म्हणता येईल की, स्त्री प्रतिष्ठेला, स्त्री अस्मितेला क्रुरपणे गंभीर जखमी करणाऱ्या स्त्रीभ्रुणहत्येच्या घटना आधुनिक सभ्य संस्कृतीवर कलंक ठरत आहे. अशाप्रकारे लिंगभेदामुळे आणि लिंगभावामुळे स्त्रियांना पुरातन काळापासून दुय्यम दर्जाची वागणुक मिळत आलेली आहे. त्यामुळे स्त्रियांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा आणि आर्थिक स्वंयपुर्णता लाभलेली नाही. ह्या सर्व कारणपरंपरेची परिणीती स्त्रिया ह्या अबला होण्यामध्ये झालेली आहे. लिंगभेदामुळे आणि लिंगभावामुळे अबला झालेल्या स्त्रियांना सबला करण्यासाठी १९ व्या, २० व्या शतकात स्त्रीवादी चळवळी उदयास आलेल्या आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेल्या मानव अधिकाराच्या जाहिरनाम्यात महिला अधिकाराचा मानव अधिकार म्हणून समावेश केलेला आहे. परिणाम स्वरुप जगातील इतर देशांप्रमाणे भारतात देखील महिला सक्षमीकरणासाठी समाधानकारक राजकीय प्रयत्न सुरु झाले आहेत. याचाच आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**महिला सक्षमीकरणाचा ऐतिहासिक परामर्श :**

प्राचिन ग्रीक तत्वज्ञ प्लेटो याने सरंक्षक वर्गामध्ये (Guardian Class) स्त्री-पुरुषांना समान स्थान दिले होते. परंतू ॲरिस्टॉटलने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना हीन



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

(Inferiority) लेखुन त्यांचा समावेश गुलामांमध्ये केला होता. २० व्या शतकात जन्मलेल्या जॉन स्टुअर्ट मिल या ब्रिटीश राजकीय विचारकाने आपल्या 'सब्जेक्शन ऑफ वीमेन' या महत्वपुर्ण ग्रंथामध्ये असे मत मांडले की, स्त्री-पुरुषांचे संबंध हे मैत्रीचे असावेत, वर्चस्ववादी स्वरुपाचे नसावेत. यासाठी त्याने विवाह कायद्यामध्ये सुधारण करण्याचे सुचविले. तसेच स्त्री-मताधिकाराचे समर्थन करुन हुशार स्त्रियांना समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे असे मत मांडले.[१] आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला सक्षमीकरणाची सुरुवात पाश्चात्य देशांमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याच्या समर्थकांकडून लोकशाही शासन व्यवस्थेच्या मागणीच्या रुपाने झाली. याबरोबरच स्त्री-शिक्षणाच्या वाढत्या प्रमाणाने यामध्ये महत्वाचे योगदान दिले. परंतु महिला सक्षमीकरणाची जाणिव वैश्विक बनण्यास खरी सुरुवात झाली ती संयुक्त राष्ट्र संघाने जाहिर केलेल्या मानवी अधिकाराच्या घोषणापत्रामुळे "१० डिसेंबर, १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून घोषित करण्यात आलेल्या मानव अधिकाराच्या जाहिरनाम्यात महिला अधिकारांचा मानव अधिकार म्हणून समावेश करण्यात आला. या जाहिरनाम्याच्या सरनाम्यात स्त्री आणि पुरुषांसाठी समान अधिकार म्हणून मानव अधिकारांचा उल्लेख करण्यात आला आहे."[२] म्हणून मानव अधिकाराच्या जाहिरनाम्याकडे स्त्रीमुक्तीचा जाहिरनामा म्हणून देखिल पाहिले जाते. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आंतरराष्ट्रीय स्तरावर पडलेले हे पहिले राजकीय पाऊल होते. संयुक्त राष्ट्र संघटनेने ८ मार्च १९७५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला आणि सन १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून तर सन १९७५ ते १९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक घोषित करुन महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला चळवळीचे रुप दिले. स्त्रियांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून आंतरराष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. स्त्री प्रश्नांची चर्चा करण्यासाठी व त्यावर उपाय शोधण्यासाठी १९८५ मध्ये केनियाची राजधानी नैरोबी येथे प्रथम आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. यानंतर अनेक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केल्या गेल्या. सन १९९५ साली बिजींग येथे झालेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'जगास महिलांच्या दृष्टीने पहा' अशी घोषणा देण्यात आली. एकंदरीत आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने जगातील अनेक देशांमध्ये महिला सक्षमीकरणासाठी जोरकस राजकीय किंवा शासकीय प्रयत्न सुरु असल्याचे दिसते.

**महिला सक्षमीकरणाचा राजकीय परामर्श :**

महिला सक्षमीकरणासंदर्भात भारताच्या प्रयत्नांचा राजकीय आलेख मांडतांना असे म्हणता येईल की, भारतीय संविधानाने सुरुवातीपासुनच याबाबतीत पुढाकार घेतल्याचे दिसते. भारतीय संविधानांच्या तिसऱ्या भागात समतेचा मुलभूत हक्क सर्व नागरिकांना प्रदान करतांना कलम-१५ मध्ये अशी तरतुद करण्यात आलेली आहे की, "राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही."[३] यांबरोबरच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानात अनेक मार्गदर्शक बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत. संविधानाच्या चौथ्या भागात राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांच्या अंतर्गत कलम-३९ (घ) मध्ये संविधानाने राज्याला असा निर्देश दिला आहे की, "पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे."[४] भारताचे संविधान निर्माण करत असतांनाच घटनाकारांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार प्रदान केले होते. असे असले तरी महिला सबलीकरणासाठी शासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार कायदे केले. "सन १९७६ साली भारत सरकारने समान वेतन कायदा करुन स्त्री आणि पुरुष कामगारांना समान वेतन देण्याचे ठरविण्यात आले. तसेच मजुर मंत्रालयाअंतर्गत स्वतंत्र महिला विभागाची निर्मिती केली."[५] "चौथ्या पंचवार्षिक योजनेनंतर महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेमध्ये उल्लेखणीय परिवर्तन झाले, महिला विकासाच्या मुद्दयाची जागा महिला सक्षमीकरणाने घेतली. ७३व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायतराज संस्था तसेच नागरी स्थानिक संस्था यांच्यामध्ये महिलांसाठी १/३ आरक्षणाची व्यवस्था या दिशेने सर्वाधिक क्रांतीकारी पाऊल होते."[६] भारतात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची नोंद घेऊन त्यासंबंधींचा अहवाल शासनाला सादर करुन महिलांवर अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी भारत सरकारने ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. यामुळे वर्षानुवर्षे शोषित, पिडीत, वंचित व उपेक्षित स्त्रियांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर सन १९९४ साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली आहे. हे महिला आयोग दरवर्षी महिलांच्या दर्जाविषयी शासनाला अहवाल सादर करतात. या अहवालाच्या आधारावर केंद्र व राज्य सरकार महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी धोरणे ठरवत असतात किंवा योजना आखत असतात. "२१व्या शतकात पहिल्या दशकात त्रिस्तरीय पंचायत संस्थांमध्ये



PRINCIPAL
C.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

महिलांसाठी ५०% जागा आरक्षित करुन बिहार सरकारने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने क्रांतीकारी सुरुवात केली."[७] सन २००६ मध्ये यासंबंधीचा अध्यादेश काढण्यात आला होता. दि. १४ एप्रिल, २०११ रोजी महाराष्ट्र शासनाने पंचायत संस्थांमध्ये महिलांसाठी बिहारप्रमाणेच ५०% आरक्षण जाहिर करुन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिने महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. अशा रितीने राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने गतिमान वाटचाल सुरु असल्याचे आपणास दिसते.

**निष्कर्ष :-**

स्त्रियांना आज प्राप्त असलेले दुय्यम स्थान हे भेदभावपूर्ण, सामाजिक-सांस्कृतिक मुल्ये तसेच समाजात लिंगभेदाला प्रस्थापित करणाऱ्या संस्थामध्ये कायम आहे. या स्थितीचा जीवशास्त्रीय भेदांशी कोणताही संबंध नाही. स्त्री-पुरुष भेद आणि स्त्रियांचे दुय्यमत्व हे मानवनिर्मित आहे. म्हणून आजच्या काळात स्त्रियांना समान दर्जा, समान संधी, व समान वागणूक देण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरुषांची म्हणजेच पर्यायाने मानवनिर्मित संस्था, संघटनांची आहे. याच तर्कशास्त्राला अनुसरुन महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरु असलेल्या शासकीय व अशासकीय आणि राजकीय व बिगर राजकीय प्रयत्नांमुळे जगातील अनेक राष्ट्रांच्या प्रमुखपदी महिला विराजमान झाल्याचे व होत असल्याचे चित्र आज आपणास पहावयास मिळत आहे. भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्ष नेत्या, लोकसभा अध्यक्ष, मुख्यमंत्री, राजकीय पक्ष प्रमुख, पराराष्ट्र मंत्री, परराष्ट्र सचिव, राजदूत, कॅबिनेट मंत्री अशा अनेक महत्वाच्या राजकीय पदावर आणि इतर सर्वच क्षेत्रात महिला आरुढ झाल्याचे आपणास दिसत आहे. म्हणजेच आज महिला समान संधी व समान स्वातंत्र्याचा हक्क उपभोगत आहेत. परंतु यावरुन महिलांचे शंभर टक्के सक्षमीकरण झाले आहे असा निष्कर्ष आपणास काढता येणार नाही. महिलांना संसदेत व राज्य विधिमंडळात आरक्षण देण्याचा प्रश्न तसाच भिजत पडलेला आहे. कारण त्यासंदर्भात सर्वच पुरुष वर्चस्ववादी राजकीय पक्षांनी विधेयक अनेकदा संसदेत मांडले जाऊनही ते संमत होऊ दिले नाही. यासाठी स्त्रियांनी संगठीतपणे मतदानाच्या माध्यमातुन आपली शक्ती दाखवून देऊन राजकीय हक्क प्राप्तीसाठी म्हणजेच कायदेमंडळात आरक्षण मिळवण्यासाठी संघर्षास तयार असले पाहिजे. कायदेमंडळात स्त्रियांना आरक्षण असणे हे महिला सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड/आधारशिला असणार आहे. कारण आज महिला सक्षमीकरणासाठी चाललेल्या प्रक्रियेमुळे महिलांच्या पूर्वीच्या स्थितीमध्ये आमुलाग्र बदल झालेला असला तरी

स्त्री-शोषणाच्या पध्दती बदलत आहेत. स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली स्त्रीचे बाजारीकरण केले जात आहे. या उत्तर वसाहतवादी व उत्तर आधुनिक काळातील सत्याकडे डोळेझाक करता येणार नाही.

**संदर्भ :**


ओम प्रकाश गाबा, राजनीति चिंतन की रुपरेखा, मयुर पेपरबैक्स, नौएडा, २००३, पान क्र. ४०१

शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, मार्च २०१०, पान क्र. ३५२

भारताचे संविधान, महाराष्ट्र राज्य भाषा संचलनालयाद्वारे अनुवादीत आणि भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे, २००६, पान क्र. ५

कित्ता, पान क्र. १७

उपरोक्त-२, पान क्र. ३५५

प्रतियोगिता दर्पण, आग्रा, नोव्हेंबर २००८, पान क्र. ६६९

प्रतियोगिता दर्पण, आग्रा, मार्च २००९, पान क्र. १४२०



T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule


*****